श्री दासराम महाराज कृत

सम - ओवी - टीकेसह

श्रीज्ञानेश्वरमहाराज प्रणीत

# चांगदेव पासष्टी

आणि

## इतर ग्रंथ

- संपादक -

प्रा. डॉ. के. वा. आपटे

- प्रकाशक -

श्री. सतीश ग. खेडकर

प्रथम आवृत्ति | सांगली | इ.स. २००२

❖ प्रकाशक :

श्री. सतीश ग. खेडकर
पुणे.

❖ प्रकाशन दिन :

श्रावण वद्य ६, शके १९२४
मंगळवार, दि. १३-८-२००२
श्रीदासराममहाराज प्रथम पुण्यतिथि

*(खाजगी वितरणासाठी)*

❖ प्रथम आवृत्ति :

इ.स. २००२

❖ मुद्रक :

श्री. अनिल अ. लोखंडे
श्रीदासराम ऑफसेट
सांगली ४१६ ४१६.

❖ अक्षरजुळणी :

श्री. अनंत अ. लोखंडे
सांगली ४१६ ४१६.

## श्रीसद्गुरु नारायणराव भाऊसाहेबमहाराज
### निंबरगीकर



परब्रह्म हे चालते बोलते जे ।
निंबर्गीमाजी झळके स्वतेजे ॥
कसा हा आला श्रीतुकारामराजा ।
नमस्कार नारायणालागी माझा ॥१॥

–श्री दासराम

# अनुक्रमणिका

प्रकाशकाचे हद्गत
संपादकाचे कथन
पुरस्कार

विभाग - १

१) श्रीदासराममहाराजकृत सम ओवी टीकेसह श्रीज्ञानेश्वरमहाराजांची चांगदेव पासष्टी.

विभाग - २

१) श्रीदासराममहाराजकृत गद्य भावार्थासह श्रीज्ञानेश्वरमहाराजांचा प्रणव (ॐकार अक्षर).
२) श्रीदासराममहाराजकृत गद्य भावार्थासह श्रीएकनाथमहाराजांची प्रकाशदीपिका.
३) श्रीदासराममहाराजकृत गद्य भावार्थासह समर्थ रामदासस्वामींचे सोलीव सुख.

विभाग - ३

१) श्रीदासराममहाराजरचित सोऽहं तत्त्वज्ञान.
२) श्रीदासराममहाराजप्रणीत आत्मविज्ञान.

⌘ ⌘ ⌘

## प्रकाशकाचे हृद्गत

आधुनिक विज्ञानाचा मी एक विद्यार्थी असून, मी संगणकाच्या क्षेत्रात काम करीत असतो. तरी सुद्धा भारतातील अध्यात्मशास्त्राविषयी मला जिज्ञासा आहे. या जिज्ञासेपोटी मी ज्ञानेश्वरमहाराजांचे चरित्र व त्यांची ज्ञानेश्वरी यांचा परामर्श घेणारी काही पुस्तके वाचली. त्यामुळे ज्ञानेश्वरमहाराजांचे बद्दल माझे मनात श्रद्धा निर्माण झाली. त्यामुळे पुढे ज्ञानेश्वरमहाराज आणि त्यांचे ग्रंथ या संदर्भात मला जे जे साहित्य मिळाले ते ते मी वाचण्यास सुरवात केली. ज्ञानेश्वरमहाराजांच्या काही ग्रंथांवर अर्वाचीन संतांनी टीकात्मक - स्पष्टीकरणात्मक - जे लेखन केले आहे, तेही माझ्या वाचनात आले. त्यामध्ये श्रीदासराममहाराजांनी ज्ञानदेव तेहत्तिशी आणि चांगदेव पासष्टी या ग्रंथांवर लिहिलेल्या टीका माझे मित्र श्री. शरद वा. आपटे यांनी माझ्या निदर्शनास आणल्या. त्या वाचून मी भारावून गेलो, आणि श्रीदासराममहाराजांचे दर्शन घेण्याच्या इच्छेने मी सांगलीसही येऊन गेलो. त्यावेळी श्रीदासराममहाराजांचे काही साहित्य प्रकाशित करावे अशी ऊर्मि आली. त्याप्रमाणे इ.स. १९९७ मध्ये ''श्रीज्ञानेश्वर स्तोत्र व अन्य ग्रंथ'' हे पुस्तक मी प्रकाशित केले. त्यानंतर श्रीदासराममहाराजांचे आणखी काही लेखन प्रकाशित करावे अशी मला पुन: प्रेरणा झाली. त्यानुसार इ.स. २००२ मध्ये मी ''श्रीदासराममहाराज-कृत परमार्थसार आणि अन्य ग्रंथ'' हा ग्रंथ प्रकाशित केला. त्यानंतरही श्रीदासराममहाराजांचे आणखी काही लेखन पुस्तकरूपाने प्रकाशित करावे अशी अंत:स्फूर्ति झाली आणि तिचे दृश्य फळ म्हणजे प्रस्तुतचे ''श्रीदासराम महाराजकृत सम-ओवी टीकेसह ज्ञानेश्वरमहाराजप्रणीत चांगदेव पासष्टी आणि इतर ग्रंथ'' हे पुस्तक होय.

''श्रीज्ञानेश्वर स्तोत्र'' या मी प्रकाशित केलेल्या पहिल्या ग्रंथाचे वेळी श्रीदासराममहाराज विद्यमान होते. त्यांनी त्या ग्रंथाला लेखनबद्ध ''आशीर्वाद '' दिला होता. तथापि 'परमार्थसार' व प्रस्तुतचे पुस्तक यांचे प्रकाशनाचे वेळी श्रीदासराममहाराज देहधारी सगुण रूपात उपस्थित नाहीत ही बोच जाणवते आहे. तथापि ते निर्गुण रूपातून या पुस्तकास आशीर्वाद देत आहेत असेच मला वाटत आहे. कारण संत हे जरी सगुण



रूपात उपस्थित नसले तरी ते निर्गुण रूपात असतातच.

श्रीदासराममहाराजांचे चिरंजीव श्री. चंद्रशेखरअण्णा यांनी श्रीदासराममहाराजांचे हे साहित्य प्रकाशित करण्यास परवानगी दिली तसेच प्रस्तुत ग्रंथास पुरस्कारही लिहून दिला, याबद्दल मी त्यांचा कृतज्ञ आहे. माझे स्नेही श्री. शरद वा. आपटे यांचे मार्फत मी केलेल्या विनंतीचा स्वीकार करून, प्रा. डॉ. के. वा. आपटे यांनी प्रस्तुत ग्रंथाचे संपादन करण्याचे कार्य चांगल्या प्रकारे पार पाडले यासाठी मी त्यांचा आभारी आहे. या ग्रंथाची मुद्रणप्रत करणे इत्यादि कामात सौ. माया के. आपटे व श्री. नारायण के. आपटे यांनी केलेल्या साहाय्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. तसेच श्री. बाळासाहेब लोखंडे यांनी मुद्रणाचे काम व्यवस्थित केले त्यासाठी मी त्यांचाही आभारी आहे.

आम्हां सर्व जणांचे हातून घडून आलेली ही अल्पस्वल्प सेवा श्रीदासराममहाराजांनी गोड करून घ्यावी, अशी प्रार्थना करून मी विराम घेतो.

सतीश ग. खेडकर

—※—※—※—

## संपादकाचे कथन

श्रीदासराममहाराजांचे काही पारमार्थिक लेखन एकत्र करून प्रस्तुत पुस्तकात प्रकाशित केलेले आहे. श्रीदासराममहाराज म्हणजेच श्रीरामराय गोविंद केळकरमहाराज होत. ते फार मोठे संत नुकतेच सांगलीत होऊन गेले. त्यांना आपल्या वयाच्या चौदाव्या दिवशी सांगलीचे सद्‌गुरु श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस यांचा दृष्टिद्वारा कृपानुग्रह लाभला. त्यांचे ''राम'' हे नाव ठेवण्यासही श्रीतात्यासाहेबमहाराजांनीच सांगितले. इतकेच नव्हे तर ''हा बाल राम पुढे बालपणापासूनच कीर्तन करू लागेल'' असा आशीर्वादही दिला. तो आशीर्वाद खरा ठरला, आणि श्रीदासराममहाराज हे आपल्या वयाच्या पाचव्या वर्षीपासूनच ब्रह्मविद्येवरची कीर्तने करू लागले. तात्यासाहेबमहाराजांनी श्रीदासराममहाराजांच्या मनात ठसविलेल्या सिद्‌धसाधनाच्या अभ्यासाने श्रीदासराममहाराज हे चिमड संप्रदायाचा कळस झाले. श्रीदासराममहाराजांच्या संदर्भात श्रेष्ठ संत श्रीशंकरमहाराज मिरीकरमहाराज यांनी जे उद्‌गार काढले होते, त्यांची येथे आठवण येते. श्रीमिरीकरमहाराज म्हणाले होते की श्रीरामभाऊ केळकर हे पूर्वजन्मीचे महान् योगी आहेत.

श्रीदासराममहाराजांना आपल्या वयाच्या सातव्या वर्षीच ''आत्मयाची काव्यस्फूर्ति'' झाली, आणि त्यांचे हातून विविध प्रकारचे पारमार्थिक लेखन होऊ लागले. वयाच्या नवव्या वर्षीच त्यांनी ''श्रीरामदासबोध'' नावाचा लघु ग्रंथ लिहिला. आणि त्यानंतर सातत्याने श्रीदासराममहाराजांचे आध्यात्मिक लेखन चालू राहिले. त्यांच्या पारमार्थिक लेखनाचा संक्षिप्त आढावा प्रा. डॉ. के. वा. आपटे यांनी ''श्रीदासराम-गौरव-ग्रंथ''मध्ये घेतला होता. हा ग्रंथ श्रीदासराममहाराजांच्या षष्ट्यब्दपूर्तीच्या निमित्ताने प्रकाशित झाला होता.

श्रीदासराममहाराजांचे पारमार्थिक लेखन हे गद्य आणि पद्य अशा द्विविध स्वरूपात उपलब्ध आहे. या दोन्ही प्रकारच्या लेखनाचे प्रत्येकी आणखी दोन भाग करता येतात :- (१) स्वतंत्र लिखाण (२) इतर ग्रंथावरील टीकात्मक/स्पष्टीकरणात्मक लेखन. उदा.- आत्मविज्ञान हा



श्रीदासराममहाराजांचा गद्यातील स्वतंत्र दीर्घ लेख आहे. तर परमार्थसार हे त्यांचे पद्यातील स्वतंत्र प्रकरण आहे. ज्ञानदेवतेहत्तिशी इत्यादि ग्रंथांवर त्यांचे पद्यात्मक टीकालेखन आहे, तर नासदीय सूक्ताचे स्पष्टीकरण गद्यात आहे. अशा प्रकारचे श्रीदासराममहाराजांचे गद्य-पद्यात्मक लेखन एकत्र करून प्रस्तुतचा ग्रंथ सिद्‌ध झाला आहे. त्याची थोडक्यात माहिती पुढीलप्रमाणे देता येईल.

ज्ञानेश्वरमहाराजांचेबद्दल श्रीदासराममहाराजांना अपार आदर होता. त्यांच्या ज्ञानदेवतेहत्तिशी इत्यादि ग्रंथांवर त्यांनी लिहिलेल्या टीका प्रकाशित झाल्या आहेत. चांगदेवपासष्टीवर एका ओवीस एक ओवी या पद्‌धतीने एक सम-ओवी टीका श्रीदासराममहाराजांनी लिहिली होती. ती प्रस्तुत पुस्तकात समाविष्ट केलेली आहे.

त्र्यंबक हरी आवटे यांनी शके १८३० मध्ये प्रसिद्‌ध केलेल्या ''गाथापंचक'' या ग्रंथात श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या अभंगांची गाथा आहे. त्यांच्या अनेक अभंगात ॐ हा शब्द विविध अर्थांनी कसा वापरलेला आहे याची नोंद करणारा एक लेख ''श्रीज्ञानेश्वरमहाराज आणि ॐकार'' या शीर्षकाखाली प्रा. के. वा. आपटे यांनी लिहिला होता व तो प्रसाद मासिकाच्या मार्च १९६५ च्या अंकात प्रसिद्‌ध झाला होता. त्या लेखात गाळला गेलेला असा ''ॐकार अक्षर'' (प्रणव) असा एक १२६ कडव्यांचा प्रदीर्घ अभंग आहे. त्यात बऱ्याच अंकांचा वापर असून तो बराच क्लिष्ट आहे. या अभंगाचा अर्थ श्रीदासराममहाराजांनी लिहिला व तो सिद्‌धगिरिसंदेश या त्रैमासिकात प्रसिद्‌ध झाला. हा ॐकार अक्षराचा अर्थ येथे 'प्रणव' या शीर्षकाखाली निवडला आहे.

''ज्ञानाचा एका'' या वचनानुसार श्रीज्ञानेश्वरमहाराजांचा अवतार म्हणजे एकनाथमहाराज होत. या एकनाथमहाराजांचेही परमार्थावर विपुल लेखन आहे. त्यात ''प्रकाशदीपिका'' या नावाचा एक लघु ओवीबद्‌ध ग्रंथ आहे. त्याचे गद्यात भाषांतर श्रीदासराममहाराजांनी केले होते व तेही सिद्‌धगिरिसंदेश त्रैमासिकात प्रसिद्‌ध झाले होते. तेही प्रस्तुतच्या ग्रंथात अंतर्भूत केले आहे.

श्रीदासराममहाराज हे चिमड संप्रदायातील संत होत. चिमड संप्रदायात श्रीसमर्थ रामदासस्वामींच्या दासबोध या ग्रंथाला फार प्राधान्य आहे. या दासबोधाचे जणु सारच असा ''सोलीव सुख'' नावाचा एक छोटासा ग्रंथ श्रीरामदासस्वामींनी लिहिला होता. त्याचाही अर्थ श्रीदासरामहाराजांनी लिहिला व तो पुरुषार्थ मासिकात प्रसिद्ध झाला. या संदर्भात जी घटना घडली तिचा उल्लेख येथे करणे आवश्यक आहे. पुरुषार्थ मासिकाच्या संपादकांनी ''समर्थ रामदास स्वामी विशेषांक'' काढण्याचे ठरविले. त्यांनी कोल्हापूरच्या प्रा. डॉ. गं. वि. कुलकर्णी यांना 'सोलीव सुखा'वर लिहिण्यास विनंति केली. प्राध्यापकमजकुरांनी पुरुषार्थच्या संपादकांना कळविले की हे काम करण्यास सांगलीतील संत श्रीदासराममहाराज हेच योग्य आहेत. तेव्हा आपण त्यांना लिहावे. त्याप्रमाणे पुरुषार्थ मासिकाच्या संपादकांनी श्रीदासराममहाराजांना 'सोलीवसुखा'वर लिहिण्याची विनंति केली. त्यांच्या विनंतीला मान देऊन श्रीदासराममहाराजांनी सोलीव सुखाचा अर्थ गद्यात लिहिला व तो पुरुषार्थ मासिकात प्रसिद्ध झाला. हा अर्थही येथे घेतला आहे.

कोल्हापूरला श्री. द. अ. किर्लोस्कर नावाचे एक न्यायाधीश होते. त्यांनी ''सिद्धचरित्र'' या नावाचा एक ओवीबद्ध ग्रंथ संपादित केला आहे. या ग्रंथात घालण्यासाठी किर्लोस्करसाहेबांनी एक लेख श्रीदासराममहाराजांचेकडे मागितला. त्यावेळी ''सोहं तत्त्वज्ञान'' हा एक स्वतंत्र लेख श्रीदासराममहाराजांनी गद्यात लिहिला. परमार्थदृष्ट्या तो फारच महत्त्वाचा असल्याने त्याचाही समावेश प्रस्तुत ग्रंथात केला आहे. हा लेख 'सिद्धचरित्र' या ग्रंथात यावयाचा असल्याने, या सिद्धचरित्राबद्दल काही प्रास्ताविक प्रस्तुतच्या लेखात आहे.

श्रीदासराममहाराजांचे षष्ट्यब्दपूर्तीनिमित्त जो 'श्रीदासरामगौरवग्रंथ' प्रकाशित करण्यात आला होता, त्यामध्ये श्रीदासराममहाराजांचा 'आत्मविज्ञान' नावाचा प्रदीर्घ लेख प्रकाशित झाला होता. श्रीदासराममहाराज हे जेव्हा सिटी हायस्कूलमध्ये शिकत होते त्यावेळी त्यांना 'शरीरविज्ञान' अशासारखे काही विषय अभ्यासासाठी



होते. तेव्हा श्रीदासराममहाराजांना असे वाटले की या शास्त्रांच्या धर्तीवर 'आत्मविज्ञान' या शास्त्रावर आपण लेखन करावे. मग त्यांनी हा आत्मविज्ञान नावाचा प्रदीर्घ निबंध लिहून काढला. हाही एक महत्त्वाचा लेख आहे. त्याचीही निवड येथे केली आहे.

अशा प्रकारे चांगदेव पासष्टीवरील सम-ओवी टीका, प्रणव (ॐकार अक्षर), प्रकाशदीपिका व सोलीव सुख यांचा अर्थ देणारे गद्य लेखन, आणि सोऽहं तत्त्वज्ञान व आत्मविज्ञान हे स्वतंत्र गद्यातील लेख प्रस्तुत ग्रंथात एकत्रित केले आहेत. आणि ते तीन विभागांत प्रस्तुत केले आहेत :-

विभाग १ : पद्य :- श्रीदासराममहाराजकृत समओवी टीकेसह ज्ञानेश्वरमहाराजप्रणीत चांगदेवपासष्टी.

विभाग २ : गद्य :- प्रणव, प्रकाशदीपिका व सोलीव सुख यांचा गद्यातील अर्थ.

विभाग ३ : गद्य :- स्वतंत्र लेख :- सोऽहं तत्त्वज्ञान आणि आत्मविज्ञान.

प्रस्तुत ग्रंथात समाविष्ट करण्यात आलेले काही ग्रंथ हे सिद्धगिरिसंदेश त्रैमासिक व पुरुषार्थ मासिक यांत प्रसिद्ध झालेले होते. या दोन्ही नियतकालिकांच्या संपादकांना श्रीदासराममहाराजांचे चिरंजीव श्री. चंद्रशेखरअण्णा यांनी हे लेख ग्रंथरूपात प्रकाशित करण्यास परवानगी मागितली. ती त्यांनी दिली. या संपादकांचे आम्ही आभारी आहोत.

श्रीदासराममहाराजांचे पितृदेव श्रीमामामहाराज केळकर हे चित्रकलेचे शिक्षक होते. त्यांना आळंदी मुक्कामी श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे साक्षात् दर्शन झाले होते. त्यावेळी त्यांनी जे रेखाचित्र काढले होते त्याचे छायाचित्र प्रस्तुत ग्रंथाच्या मुखपृष्ठावर दिलेले आहे.

मा. सतीश खेडकर हे पुण्यात वास्तव्यास असणारे एक उत्कृष्ट संगणक तज्ज्ञ आहेत. त्यांची श्रीज्ञानेश्वरमहाराज व श्रीदासराममहाराज यांच्यावर नितांत निष्ठा आहे. या निष्ठेपोटीच त्यांनी श्रीदासराममहाराजांचे काही लेखन प्रसिद्ध करण्याचे ठरविले. त्याप्रमाणे इ.स. १९९७ साली

त्यांनी ''श्रीज्ञानेश्वर स्तोत्र व अन्य लघु ग्रंथ'' हे पुस्तक प्रकाशित केले त्यानंतर इ.स. २००२ मध्ये त्यांनी ''परमार्थसार आणि अन्य ग्रंथ'' पुस्तक प्रकाशित केले. आणि याच साली ते पुनः प्रस्तुतचा ग्रंथ प्रसिद्ध करीत आहेत. मागील दोन ग्रंथांच्याप्रमाणे या ग्रंथाचेही संपादन मी करावे असे त्यांनी पुण्यात राहणाऱ्या शरद वा. आपटे या माझ्या बंधूंचे मार्फत मला सुचविले. ते मी मान्य केले. कारण श्रीदासराममहाराजांचे जितके लेखन ग्रंथरूपाने परमार्थप्रेमी वाचकांपुढे येईल तितके मला हवेच आहे या दृष्टीने प्रस्तुत ग्रंथासाठी मी वर सांगितल्याप्रमाणे श्रीदासराममहाराजांच्या लेखनाची निवड केली आहे.

प्रस्तुत ग्रंथाची मुद्रणप्रत तयार करणे इत्यादि कामाचे संदर्भात सौ. माया के. आपटे व श्री. नारायण के. आपटे यांनी जे साहाय्य केले त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. मा. सतीश खेडकर यांचे पुण्यात रहाणारे बंधु श्री. सदाशिव ग. खेडकर, आणि त्यांचे स्नेही श्री. कुमार राजाराम कोळेकर यांनी जी मदत केली त्यासाठी मी त्यांचा आभारी आहे. या ग्रंथास पुरस्कारात्मक लेखन करावे अशी विनंती मी श्रीदासराममहाराजांचे ज्येष्ठ व श्रेष्ठ चिरंजीव श्री. चंद्रशेखरअण्णा यांना केली. ती मान्य करून त्यांनी ''पुरस्कार'' केला. मी त्यांचा कृतज्ञ आहे. श्री. बाळासाहेब लोखंडे यांनी मुद्रणाचे काम व्यवस्थित केले. त्यांचेही आभार. हा ग्रंथ प्रकाशित करण्याचे सर्व श्रेय मा. सतीश खेडकर यांचे आहे. श्रीदासराममहाराजांचे प्रेमी भक्तांना त्यांनी या पुस्तकाद्वारे एक ''पारमार्थिक उपहारच'' दिला आहे. त्यांचे मनःपूर्वक आभार.

सांगली

**के. वा. आपटे**



## पुरस्कार

माझे ती. प. पू. श्रीरामराय गोविंद केळकर तथा श्रीदासराम-महाराज यांचे वाङ्मय प्रकाशित करावे अशी प्रेरणा आमच्या श्रीदादांचे वर आत्यंतिक निष्ठा असलेले मा. सतीश खेडकर यांना झाली. आणि त्या प्रमाणे एक पुस्तक ''परमार्थ सार आणि अन्य ग्रंथ'' या नावे प्रकाशित पण झाले. आमच्या श्रीदादांच्या वाङ्मयातील राहिलेले काही वाङ्मय ''श्रीदासराममहाराजकृत सम ओवी टीकेसह ज्ञानेश्वरमहाराजांची चांगदेव पासष्टी आणि इतर ग्रंथ'' हे पुस्तक प्रकाशित होत आहे. मा. सतीश खेडकर यांनी प्रकाशित केलेल्या या ग्रंथाच्या द्वारे आमच्या श्रीदादांचे वाङ्मय रूप प्रगट झाले आहे.

आमच्या श्रीदादांचे वाङ्मय प्रकाशनासाठी संपादित करणे हे काम सोपे नाही. तो संशोधनाचा व तौलनिक अभ्यासाचा विषय आहे. आणि त्यामुळे हे काम आमच्या श्रीदादांच्या अंतरंगातील एक अभ्यासू प्रज्ञावंत असे प्रा. डॉ. के. वा. आपटे यांनी केले आणि त्यामुळेच ते व्यवस्थितपणे संपादित होऊ शकले. हे सारे संपादित होणेचे कामी प्रा. डॉ. के. वा. आपटे, त्यांच्या सुविद्य पत्नी सौ. माया वहिनी व चिरंजीव श्री. नारायण आपटे यांनी अतिशय परिश्रम घेतले आहेत. पण या परिश्रमामध्ये त्यांना श्रम वाटले नाहीत, याला एकच कारण असे आहे की या सर्वांची श्रीदादांचेवर असलेली अपरंपार निष्ठा हे होय.

प्रा. डॉ. के. वा. आपटे यांचे बंधु व श्रीदादांचेवर आत्यंतिक निष्ठा असलेले श्री. शरदकाका आपटे यांचेमुळे या खेडकर कुटुंबाचा व आमचे श्रीदादांचा संबंध आला. खेडकर कुटुंबातील सर्वांचीच श्रीदादांचेवर निष्ठा आहे, हे खरे विशेष आहे.

आमच्या श्रीदादांच्या या पुस्तकास पुरस्कारात्मक चार शब्द लिहून देणेबाबत आमचे प्रा. डॉ. केशवकाका आपटे यांनी मला सांगितले. या पुस्तकातील विषय पाहिले म्हणजे त्याला पुरस्कार देणारा त्याच तोलामोलाचा पाहिजे अशी माझी धारणा आहे. पण प्रा. डॉ. केशवकाका आपटे यांचे माझेवर असलेले प्रेम व माझ्या काही पूर्व सुकृतामुळे व माझ्या

भाग्याने ती. प. पू. श्रीदादांचे व ती. प. पू. सौ. वहिनींचे पोटी माझा जन्म झाला आणि त्यामुळेच ही सेवा माझे हातून घडली एवढे खरे.

या सर्व दृष्टीने आध्यात्मिक आणि अत्यंत मौलिक अशा या ग्रंथास भगवान् श्रीसद्गुरु श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस व माझे ती. प. पू. आजोबा श्रीमामामहाराज केळकर यांचा आशीर्वाद प्राप्त व्हावा अशी माझे पितृदेव भगवान् श्रीसद्गुरु श्रीदासराममहाराज केळकर यांचे चरणी शतश: प्रार्थना करतो. आणि हे चार शब्द ती. प. पू. श्रीदादा व ती. प. पू. सौ. वहिनी यांचे चरणी अत्यंत नम्रतापूर्वक अर्पण करतो.

या पुस्तकाचे प्रकाशक मा. सतीश खेडकर, संपादक प्रा. डॉ. के. वा. आपटे व मुद्रक श्री. बाळासाहेब लोखंडे ही सारी मंडळी आमच्या श्रीदादांच्या विश्वकुटुंबातीलच आहेत. या सर्वांना शतश: धन्यवाद देतो आणि केळकर कुलाचे कुलदैवत श्रीदेव रामेश्वर व श्रीदेव सोमेश्वर आणि कुलदेवता श्रीदेवी बांदेश्वरी यांना सहस्रश: लोटांगण घालून येथेच थांबतो.

॥ राजाधिराज श्रीसद्गुरुनाथ महाराज की जय ॥

सांगली
६।८।२००२.

श्रीदादांचा कृपाभिलाषी,
चंद्रशेखर

—✻—✻—✻—



श्री रामराय गोविंद केळकर
उर्फ
## श्री दासराममहाराज केळकर



गोविंदस्य सुतं श्रेष्ठं हनुमत्पाद–सेवकम् ।
इंदिरानंद – दातारं रामं वंदे परं गुरुम् ॥

– के. वा. आपटे

# विभाग १

## पद्य

श्रीदासराममहाराजकृत

सम – ओवी – टीकेसह

श्रीज्ञानेश्वरमहाराजांची

# चांगदेव पासष्टी

श्रीदासराममहाराज कृत

सम – ओवी – टीकेसह

श्रीज्ञानेश्वरमहाराजांची

# - चांगदेव पासष्टी -

**स्वस्ति श्री वटेशु । जो लपोनि जगदाभासु ।**
**दावी मग ग्रासु । प्रगटला करी ॥१॥ (मूळ)**

स्वस्ति श्री वटपत्रीचा ईश । हंसरूप लपोनी जगदाभास ।
जो प्रगटल्या लय विश्वास । सहजचि आहे ॥१॥ (टीका)

**प्रगटे तव तव न दिसे । लपे तव तव आभासे ।**
**प्रगट ना लपाला असे । न खोमता जो ॥ २॥ (मूळ)**

तो प्रगटता दृश्य नासे । तो लपता दृश्य आभासे ।
उदयारत्ताविण सूर्यासरिसे । प्रगट ना गुप्त साक्षातचि॥२॥ (टीदा)

**बहु जव जव होये । तव तव काहीच न होये ।**
**काही न होनि आहे । अवघाची जो ॥३॥ (मूळ)**

काही नाही तेचि होये । जव बिंदु बिंदूने दृश्यत्व ये ।
बिंदु अदृश्य आत्मा पाहे । रेषा माया आघवी ॥३॥ (टीका)

**सोने सोनेपणा उणे । न येताचि जाले लेणे ।**
**तेवि न वेचता जग होणे । अंगे जया ॥४॥ (मूळ)**

सोन्यामाजी आहे लेणे । म्हणोनि त्याचे होत दागिने ।
चैतन्याचे प्रवाहीपणे । अस्ति ठायी घडे जे ॥४॥ (टीका)

**कल्लोळ कंचुक । न फेडिता उघडे उदक ।**
**तेवी जगेसी सम्यक । स्वरूप जो ॥५॥ (मूळ)**

अस्तित्व लहरी । गति प्रकाश चिदंबरी ।
तया लहरीचे अंतरी । सम्यक् रूप ॥५॥ (टीका)

**परमाणूंचिया मांदिया । पृथ्वीपणे न वचेचि वाया ।**
**तेवि विश्वस्फूर्ति इया । झाकवेना जो ॥६॥ (मूळ)**

न परता अणूंचा गाभा । जेणे स्फूर्तिये विश्व शोभा ।
नभा परतया स्वयंभा । झाकवेना ॥६॥ (टीका)

**कळांचेनि पांघुरणे । चंद्रमा हरपो नेणे ।**
**का वन्ही दीपपणे । आन नोहे ॥७॥ (मूळ)**

चंद्र नाही जयाचेनी । न हरपे कलांचेनी ।
सोऽहंदीप वैश्वानर वन्हि । आन कैसा ॥७॥ (टीका)

**म्हणोनि अविद्या निमित्ते । दृश्य द्रष्टत्व वर्ते ।**
**ते मी नेणे आइते । ऐसेचि असे ॥८॥ (मूळ)**

सूर्य नेणे अंधार । तै मी नेणे चराचर ।
अविद्येचा जो फेर । जीव भ्रमले ॥८॥ (टीका)

**जेवी नाममात्र लुगडे । येऱ्हवी सुतचि ते उघडे ।**
**का माती मृद् - भांडे । जयापरी ॥९॥ (मूळ)**

जेवी सूतचि लुगड्यात । की मृत्तिका घटात ।
तेवी या विश्वात । अस्तित्वचि असे ॥९॥ (टीका)

**तेवी द्रष्टा दृश्य दशे । अतीत दृङ्‌मात्र जे असे ।**
**तेचि द्रष्टा दृश्य मिसे । केवळ होय ॥१०॥ (मूळ)**

द्रष्टाचि होवोनि दृश्य । नादे दावी त्रिपुटीस ।
तया अतीत सौरस । आत्मा दृङ्‌मात्र ॥१०॥ (टीका)

**अलंकार येणे नामे । असिजे अखिल हेमे ।**
**नाना अवयव संभ्रमे । अवयविया जेवी ॥११॥ (मूळ)**

नामे संभ्रमे सुवर्णाचे । अलंकार नाना रूपाचे ।
जैसे अवयव देहाचे । एकी एक प्रचीती ॥११॥ (टीका)

**तेवी शिवोनि पृथ्वीवरी । भासती पदार्थाचिया परी**
**प्रकाशे ते एकसरी । संवित्ति हे ॥१२॥ (मूळ)**

शब्दरूपातीत शिवापासून । तो देह दृश्याचे जेथ भान ।
संविद् आत्मा होऊन । प्रकाशे ज्ञान एकसरी ॥१२॥ (टीका)

**नाही ते चित्र दाविती । परि असे केवळ भिंती ।**
**प्रकाशे ते संवित्ती । जगदाकारे ॥१३॥ (मूळ)**

आहे म्हणता नाही होय । असा नाही असा होय ।
नाही ते जरी दृश्य जाय । तरी आहे ते आहेचि ॥१३॥ (टीका)

**बांधियाचिया मोडी । बांधा न होनि गुळाची गोडी ।**





**तया परी जग परवडी । संवित्ती जाणा ॥१४॥ (मूळ)**

प्रवाही झाली उपाधी । संविद् आत्माचि आधी ।
साक्षात् जो आदी । भरला गूळगोडीपरी ॥१४॥ (टीका)

**शून्य लहरीचेनि आकारे । प्रकाशिजे जेवी अंबरे ।**
**तेवी विश्वस्फूर्ती स्फुरे । स्फुर्तीचि हे ॥१५॥ (मूळ)**

शून्य लहरीचेनि आकारे । प्रकाशी जइ अंबरे ।
तइ विश्वस्फूर्ती उरे । स्फुरद्रूपी ॥१५॥ (टीका)

**न लिंपता सुखदुःख । येणे आकारे क्षोभोनि नावेक ।**
**होय आपणिया सन्मुख । आपणचि जो ॥१६॥ (मूळ)**

अस्तित्व प्रवाही आकारले । तेथे विकारी सुखदुःख झाले ।
आपणया सन्मुख आपण वहीले । सुखदुःखातीत अलिप्त ॥१६॥ (टीका)

**तया नाव दृश्याचे होणे । संवित्ती द्रष्टत्वा आणिजे तेणे ।**
**बिंबा बिंबत्व जालेपणे । प्रतिबिंबाचेनि ॥१७॥ (मूळ)**

प्रतिबिंबे बिंबा बिंबपण । तयेपरी द्रष्टा दृश्यपण ।
सुप्त अस्तित्व क्षण । तेचि दृश्य ॥१७॥ (टीका)

**तेवि आपणचि आपुला पोटी । आपणया दृश्य दावीत उठी ।**
**द्रष्टा दृश्य दर्शन त्रिपुटी । मांडे ते हे ॥१८॥ (मूळ)**

आपणया ठायी आपण । द्रष्टा दृश्य दर्शन ।
त्रिपुटी योगे करून । मांडणी करी ॥१८॥(टीका)

**सुताचिये गुंजे । आत बाहेर नाही दुजे ।**
**तेवि तीनपणेविण जाणिजे । त्रिपुटी हे ॥१९॥ (मूळ)**

जीवनसूत्राचिया गुंजे । आत बाहेर एकचि जे ।
तेथे तीनवाचोनिया जे । त्रिपुटी निरास ॥१९॥ (टीका)

**नुसंधे मुख जैसे । देखिजतसे दर्पणमिसे ।**
**वायाचि देखणे ऐसे । गमो लागे ॥२०॥ (मूळ)**

चैतन्ये न मोडतया भेद । संवित्ती गमली त्रिधा ।
त्रिपुटी उपपत्ती प्रसिद्धा । ऐसीच असे ॥२०॥ (टीका)

**तैसे न वचता भेदा । संवित्ति गमे त्रिधा ।**
**हेचि जाणे प्रसिद्धा । उपपत्ति इया ॥२१॥ (मूळ)**

दृष्टीचिया दर्पण मिसे । स्वरूप जै विलोकी तसे ।
पहाणे वायाची ऐसे । वाटो लागे ॥२१॥ (टीका)

**दृश्याचा जो उभारा । तेच द्रष्ट्त्व होय संसारा ।**
**या दोहीमाजीला अंतरा । दृष्टी पंगु होय ॥२२॥ (मूळ)**

द्रष्ट्त्व संसरण संसारा । जै दृश्याचा पसारा ।
शोधिता निरंतरी अंतरा । आंधळा होय ॥२२॥ (टीका)

**दृश्य जेधवा नाही । तेधवा दृष्टी घेऊनी असे काई ।**
**आणि दृश्येवीण काही । द्रष्ट्त्व असे ॥२३॥ (मूळ)**

द्रष्टा कैचा दृश्येवीण । दृष्टीचे काय पहाणेपण ।
पूर्ण दृष्टी म्हणून । एक द्रष्टा ॥२३॥ (टीका)

**म्हणोनि दृश्याचे जालेपणे । दृष्टी द्रष्ट्त्व होणे ।**
**पुढती ते गेलिया जाणे । तैसेच दोन्ही ॥२४॥ (मूळ)**

चैतन्यालहरीचेनि शून्ये । आत्मदृष्टि अभावपणे ।
दृष्टी द्रष्ट्त्व होणे । तया अभावे एकचि ॥२४॥ (टीका)

**एवं एकचि झाली ती होती । तीन्ही गेलिया एकचि व्यक्ति ।**
**तरी तिन्ही भ्रांति । एकपण साच ॥२५॥ (मूळ)**

एकचि झाले तीन । तीन गेलिया एकपण ।
तीन ते भ्रमण । एक साच ॥२५॥ (टीका)

**दर्पणाच्या आधी शेखी । मुख असताची मुखी ।**
**माजी दर्पण अवलोकी । आन काही होये ॥२६॥ (मूळ)**

दृष्टी आरंभू शेवटी । एक स्वरूपाची गोठी ।
अलक्ष्य परी लक्ष्य दिठी । जैसे तैसे ॥२६॥ (टीका)

**पुढे देखिजे तेणे बगे । देखते ऐसे गमो लागे ।**
**परी दृष्टी ते वाउगे । झकवीत असे ॥२७॥ (मूळ)**

दृष्टीचेनि योगे । देखत ऐसे गमो लागे ।
परी दृष्टी ही उगे । ठकवीतसे ॥२७॥ (टीका)

**म्हणोनिया दृश्याचिये वेळे । दृश्य द्रष्ट्त्वा वेगळे ।**
**वस्तुमात्र निहाळे । आपणाशी ॥२८॥ (मूळ)**

दृश्य दृष्टी समरसे । आपणचि आपणया पहातसे ।





ज्याचे हे बनले असे । तेचि लक्ष्य ॥२८॥ (टीका)

**वाद्यजातेविण ध्वनी । काष्ठजाते विण वन्ही ।**
**तैसे विशेष ग्रासुनी । स्वयेचि असे ॥२९॥ (मूळ)**

आत्मावायु वाद्येविण ध्वनी । आत्मप्रकाश काष्ठेवीण वन्ही ।
म्हणोनी त्रिपुटी नासोनी । आत्माची असे ॥२९॥ (टीका)

**जे म्हणता न ये काही । जाणो नये कैसेही ।**
**असतची असे पाही । असणे जया ॥३०॥ (मूळ)**

साहित्य साधने जाणता नये । जया काहीच म्हणता नये ।
अस्तित्वेचि असणे इये । जया असे ॥३०॥ (टीका)

**आपुलिया बुबुळा । दृष्टी असोनी अखम डोळा ।**
**तैसा आत्मज्ञानी दुबळा । ज्ञानरूप जो ॥३१॥ (मूळ)**

आपुलिया बुबुळा । जेवी न देखे डोळा ।
आत्मज्ञानी बुबुळीया दुबळा । आप आपणा पहावया ॥३१॥ (टीका)

**जे जाणणेचि की ठाई । नेणणे कीर नाही ।**
**परी जाणणे म्हणोनि काही । जाणणे कैसे ॥३२॥ (मूळ)**

जयाचेनि जाणीव । जयाचेनि नेणीव ।
तो आत्मा स्वयमेव । दोनीपैल ॥३२॥ (टीका)

**या लागी मौनेचि बोलिजे । काही न होनी सर्व होईजे ।**
**नव्हता लाहिजे । काहीच नाही ॥३३॥ (मूळ)**

मौन ब्रह्माचे बोलणे । काही न होनि सर्व होणे ।
काही न होता लाभणे । आत्मस्थिती ॥३३॥ (टीका)

**नाना बोधाचिये सोयरिके । साचपण जेणे एके ।**
**नाना कल्लोळ मालिके । पाणी जेवी ॥३४॥ (मूळ)**

साचपण एकेचिया । सोयरीक बोधाचिया ।
कल्लोळ माळा पाणीया । पाणीच जे ॥३४॥ (टीका)

**जे देखिजतेविण । एकले देखतेपण ।**
**हे असो आपणिया आपण । आपणची जे ॥३५॥ (मूळ)**

चैतन्य ते लहरी पूर्ण । तेथ स्वयंसिद्ध पहाणेपण ।
सहज स्वयं प्रकाशमान । अलक्ष्य लक्ष्य ॥३५॥ (टीका)

**जे कोणाचे नव्हतेनी असणे । जे कोणाचे नव्हता दिसणे ।**
**जे कोणाचे नव्हता भोगणे । केवळ जो ॥३६॥ (मूळ)**

कोणी नाही तरी जे आहे । आहे नाही हे होय जिये ।
दिसणे भोगणे होये । स्वसंवेद्य ॥३६॥ (टीका)

**तया पुत्र तू वटेश्वराचा । रवा जैसा कापुराचा ।**
**चांगया मज तुज आपणयाचा । बोल ऐके ॥३७॥ (मूळ)**

तू तो पुत्र वटेश्वराचा । रवा जैसा चत्वार देहाचा ।
जो विलास वायूचा । आत्मतत्त्वी ॥३७॥ (टीका)

**ज्ञानदेव म्हणे । तुज माझा बोल ऐकणे ।**
**ते तळहातातळी मिठी देणे । जयापरी ॥३८॥ (मूळ)**

श्री ज्ञानदेव म्हणे । तुज माझा चिद् बोल ऐकणे ।
श्रवण जिव्हा वेगळेपणे । दिठीच दिठी ॥३८॥ (टीका)

**बोलेचि बोल ऐकिजे । स्वादेचि स्वाद चाखिजे ।**
**काड जिवडे देखिजे । उजिडा जेवी ॥३९॥ (मूळ)**

चैतन्य बोल आघातेविण । जेथ संवादू शब्देविण ।
अनुवादु दुजेपण । नसता स्वयं उजेडे ॥३९॥ (टीका)

**सोनिया वरकळ सोने जैसा । का मुख मुखा हो आरिसा ।**
**मज तुज संवाद तैसा । चक्रपाणी ॥४०॥ (मूळ)**

सुवर्ण पारख सुवर्णनि । मुखावलोकन मुखदर्पणे ।
आत्म बोलणे ऐकणे । आत्मठायी ॥४०॥ (टीका)

**गोडी ये आपुली गोडी । घेता काय न माये तोंडी ।**
**आम्हा परस्परे आवडी । तो पाडू असे ॥४१॥ (मूळ)**

गोडीने गोडी घ्यावी । तयेपरी हे आवड जीवी ।
आकर्षणे आघवी । चैतन्याची ॥४१॥ (टीका)

**सखया तुझेनि उद्देशे । भेटावया जीव उल्लसे ।**
**की सिद्ध भेटी विसकुसे । ऐसीया बिहे ॥४२॥ (मूळ)**

भेटी सिद्ध तुझी माझी । नामरूपात्मक निजतेजी ।
चैतन्य भेदे सहजी । दोन जरी ॥४२॥ (टीका)

**घेवो पाहे तुझे दर्शन । तव रूपा येवो पाहे मन ।**





**तेथे दर्शना होय अवजतन । ऐसे गमो लागे ॥४३॥ (मूळ)**

दृष्टीद्वारे तुजसी । पहाता भेटी माझी मजसी ।
अलक्ष्य परी उपाधी लक्षी । तरी ते वाया ॥४३॥ (टीका)

**काही करी बोले कल्पी । कान करी न बोले न कल्पी ।**
**ये दोन्ही तुझ्या स्वरूपी । न घेती उमसू ॥४४॥ (मूळ)**

करणे बोलणे कल्पणे । न करणे न बोलणे न कल्पणे ।
आत्मठायी आत्मपणे । कोठोनि व्हावे ॥४४॥ (टीका)

**चांगया तुझेनि नावे । करणे न करणे न व्हावे ।**
**हे काय म्हणो परी न धरवे । मीपण हे ॥४५॥ (मूळ)**

चांगया तव नावे । करणे न करणे न संभवे ।
चैतन्य नुरेचि अस्तित्वे । निरहंकारी ॥४५॥ (टीका)

**लवण पाणियाचा थावो । माजी रिघोनी गेले पाहो ।**
**तव तेची नाही मा काय घेवो । माप जळा ॥४६॥ (मूळ)**

पाणियामाजी मीठ (लवण) गेले । ठाव घेता तेचि झाले ।
ठाव काय बोले उगले । पाणियाचा ॥४६॥ (टीका)

**तैसे तुज आत्मयाते पाही । देखो गेलिया मीचि नाही ।**
**तेथे तू कैचा काई । कल्पावया जोगा ॥४७॥ (मूळ)**

तव आत्म्याते पाहो जाता । चांगदेवा मीच नाही तत्त्वता ।
मीच ना तू कल्पना । येईल कायी ॥४७॥ (टीका)

**जो जागोनी नीद देखे । तो देखणेपणा जेवी मुके ।**
**तेवी तूते देखोनी मी थके । काही न होनी ॥४८॥ (मूळ)**

जो जागृतीये निद्रा देखे । देखता देखणेपणासी मुके ।
अवस्थांतरे देह दृश्य चुके । तूते पाहता तेवीच ॥४८॥ (टीका)

**अंधाराचे ठायी । सूर्यप्रकाश तव नाही ।**
**परी मी आहे हे काही । न वचेचि जेवी ॥४९॥ (मूळ)**

प्राणधारणेचिया ठायी । चंद्र सूर्य प्रकाशू नाही ।
अहंकाराची जाणीव काही । सरेचिना ॥४९॥ (टीका)

**तेवी तू तै मी गीवसी । तेथे तूपण मीपणेसी ।**
**उखते पडे ग्रासी । भेटीची उरे ॥५०॥ (मूळ)**

तूते जैं मी गिवसी । तूपण मीपणेसी ।
छेद जाता जावोनि लयासी । भेटी उरे अखंड ॥५०॥ (टीका)

**डोळ्याचे भूमिके । डोळाचीच होय कौतुके ।**
**आणि तेणेचि तो देखे । न डंडळीता ॥५१॥ (मूळ)**

दृष्टीचिया लहरी । दृश्य येई आकारी ।
दृश्य दृष्टी एकसरी । पहाणे तोचि ॥५१॥ (टीका)

**तैसी उपजता गोष्टी । न फुटता दृष्टी ।**
**मीतूवीण भेटी । माझी तुझी ॥५२॥ (मूळ)**

सर्व ब्रह्म जे नि:शब्दू । भेदाभेद चिदानंदू ।
तयापरीच संवादू । आणि भेटी ॥५२॥ (टीका)

**आता मी तू या उपाधी । ग्रासुनी भेटी नुसधी ।**
**ते भोगिली अनुवादी । घोळघोळू ॥५३॥ (मूळ)**

मी तू उपाधी सहजे सारूनी । भेटू सत्य आत्मपणी ।
अनुभव घोळघोळुनी । तादात्म्य ते ॥५३॥ (टीका)

**रुचतियाचेनी मिसे । रुचिते जेविजे जैसे ।**
**का दर्पण व्याज दिसे । देखते जेवी ॥५४॥ (मूळ)**

पदार्थ रुची जिव्हा रुची । चाखी घेवोनि रुची ।
पहाता पहाणे एकची । दर्पणमिसे ॥५४॥ (टीका)

**जैसी अप्रमेये प्रमेये भरली । मौनाची अक्षरे भली ।**
**रचोनि गोष्टी केली । मेळियेची ॥५५॥ (मूळ)**

ज्ञाने आत्मा की आत्मी ज्ञान । तेवी अप्रमेये प्रमेय जाण ।
म्हणोनि चिदक्षरे मौन । वाङ्मय खोटे ॥५५॥ (टीका)

**इयेचे करूनी व्याज । तू आपणाते बुज ।**
**दीप दीपपणे पाहे निज । आपुले जैसे ॥५६॥ (मूळ)**

दीप दिसे त्याचेनी प्रकाशे । आपआपण जाण निज सौरसे ।
सत् चिदानंद ऐसे । आत्मतत्त्व ॥५६॥ (टीका)

**तैसी केलीया गोठी । तयात उघडिजे दृष्टी ।**
**आपणीया आपण भेटी । आपणामाजी ॥५७॥ (मूळ)**

आपणीया आपण भेटी । आपणाठायी सहज गोठी ।





उघडेल आत्मदृष्टी । आत्मठायी ॥५७॥ (टीका)

**जालीया प्रलयी एकार्णव । अपार पाणियाची धाव ।**
**गिळी आपुला उगम । तैसे करी ॥५८॥ (मूळ)**

प्रलयीचे जळ । गिळी आपुलेचि मूळ ।
पाणीच पाणी निर्मळ । जीवन हे ॥५८॥ (टीका)

**ज्ञानदेव म्हणे नामरूपे । विण तुझे साच आहे आपणपे ।**
**ते स्वानंद जीवनपे । सुखीया होई ॥५९॥ (मूळ)**

श्री ज्ञानेश्वर महाराज म्हणती नामरूपे । वीण साच तुझे आत्मत्वपे ।
अस्तित्व चैतन्य ऐक्यपे । जीवनानंदू ॥५९॥ (टीका)

**चांगया पुढा पुढती । घरा आलिया ज्ञानसंपत्ती ।**
**वेद्यवेदकत्वही अतीती । पदी बैसे ॥६०॥ (मूळ)**

घरा ज्ञानसंपत्ती आलिया । पुढत पुढती चांगया ।
वेद्य वेदकत्व नुरेचि रया । तत्पदी बैसे ॥६०॥ (टीका)

**चांगदेवा तुझेनि व्याजे । माऊलीया श्रीनिवृत्तिराजे ।**
**स्वानुभव रसाळ खाजे । दिधले लोभे ॥६१॥ (मूळ)**

चांगदेवा तुझेनी (उद्देशे) निमित्ते । श्री सद्गुरु माऊली निवृत्तिनाथे ।
रसाळ स्वानुभव खाऊ माते । कृपेचि दिला ॥६१॥ (टीका)

**एवं ज्ञानदेव चक्रपाणी ऐसे । दोन्ही डोळस आरिसे ।**
**परस्पर पहाता कैसे । मुकले भेदा ॥६२॥ (मूळ)**

श्री ज्ञानदेव चक्रपाणी । डोळीया आरसे दोनी ।
अलक्ष्य लक्ष्याचिया पहाणी । मुकले भेदा ॥६२॥ (टीका)

**तियेपरी जो इया । दर्पण करील ओवीया ।**
**तो आत्मा एवढीया । मिळेल सुखा ॥६३॥ (मूळ)**

सूत्र ओवीया दर्पण । त्यापरी करी जो आपण ।
तया होय आत्मज्ञान । आत्मसुख ॥६३॥ (टीका)

**नाही तेचि काय नेणो असे । दिसे तेचि कैसे नेणो दिसे ।**
**असे तेचि नेणो आपैसे । ते की होईजे ॥६४॥ (मूळ)**

नाही तेचि नेणणे असे । दिसे ते कैसे नेणो दिसे ।
अस्तित्वे असे नेणो आपैसे । तेचि हो का ॥६४॥ (टीका)

निदेपणे निदैजणे। जागृती गिळोनी जागणे।
केले तैसे गुंफणे। ज्ञानदेवो म्हणे ॥६५॥ (मूळ)

निद्रावस्थे जागृती। जागृती गिळोनी जे स्थिती।
चैतन्यभान निश्चिती। गुंफणी ज्ञानेश्वर माऊलीची ॥६५॥ (टीका)

चांगदेव पासष्टी गुंफणी। (अंतरी) प्रगटावी म्हणोनी।
प्रार्थिले ज्ञानराजा मनी। प्रेरिले तयानी दासरामी ॥६६॥

## ॥ सम ओवी टीकेसह चांगदेव पासष्टी समाप्त ॥

* * *



विभाग २

गद्य

# प्रणव

# प्रकाशदीपिका

व

# सोलीव सुख

## यांचा गद्यातील अर्थ

श्री दासराम महाराज प्रणीत

भावार्थासह

## श्री ज्ञानेश्वर महाराजांचा

# प्रणव

## (ॐकार अक्षर)

**ॐकार अक्षर बीज रे । अमित्य भुवनी प्रकाशुनि गेले रे ।**
**ते मकाराचे पोटी आहे रे ॥१॥**

अ म्हणजे नाही, क्षर म्हणजे नाश ज्याला, अशा अक्षराचे बीज हा ओंकार असून, ज्याला मिती म्हणजे प्रमाण नाही, जे कोणत्याही प्रमाणाने आपणांस भौतिक दृष्टीने दाखविता येणार नाही, अशा आकाशापेक्षाही सूक्ष्म भुवनांमध्ये प्रकाशून गेले आहे, ते मकाराचे म्हणजे सूक्ष्मतम ध्वनीचे पोटात आहे. (१)

**उकाराचा शेंडा पाही रे । एकविसा मंदराचळा भेदूनि गेले रे ।**
**मा वेदबीज वेगळे परात्पर पाहे रे ॥२॥**

ते बीजतत्त्व उकारात्मक गतीचा शेंडा पहात असून, अचल अशा जीवनाचे मंद्र स्वराला एकवीस टप्प्याने भेद करून आरपार गेले आहे. परंतु परमात्म्याचे नि:श्वासाचे परात्पर बीज तत्त्व वेगळेच असून, सर्वातून वेगळे होऊनच तू ते पहा (२)

**मागे बोलिलो ते ज्ञान रे । चोविसा अक्षरी संध्यावळी जोंग रे ।**
**परि त्या अक्षराचे अमित्य आहे रे ॥३॥**

मागे जे बोललो ते ज्ञान असून, चोवीस अक्षरी चोवीस नामाची संध्यावळी हे त्याचे बाह्य कवच आहे. परंतु त्या अक्षर बीज तत्त्वाचे प्रमाणे हे प्रमाणांचे पलीकडील अप्रमाणच आहे. (३)

**चारी म्हणो तरी न्हवे रे । साही म्हणो तरी भुलली बापुडी ।**
**मा अठरांची दशा ते काई रे ॥४॥**

चार वेद म्हणावेत तर तेही नव्हे. सहा शास्त्रे म्हणावी तर ती बापुडी त्या ठिकाणी भुलून गेली. मग त्या अठरा पुराणांची कथा काय ? (४)

**दाहा श्रुती शिऊ बोले रे । अठरा श्रुति विष्णूचे वचन ।**
**परी कल्पांती अक्षर न सरे रे ॥५॥**

चार वेद, सहा शास्त्रे हे शंकर सांगतात. अठरा पुराणे हे विष्णूचे बोलणे आहे. परंतु कल्पनेचा अंत जेथे होतो, तेथे कल्पांतीही या अक्षराचे अक्षरत्व टिकून राहते. (५)

**पूर्णापूर्ण ऐसे ब्रह्म बोलती रे। तेथे पूर्ण अपूर्ण दोन्ही नाही माते काही बाही अक्षर रे। तया रूप ना रेखा आहे रे ॥६॥**

पूर्ण आणि अपूर्ण असे सर्व ब्रह्म आहे, असे बोलतात. परंतु तेथे पूर्णापूर्ण हे सापेक्ष उरतच नाही. असे ते माझे काही बाही अक्षर आहे, त्याला रूपरेखा काहीच नाही. (६)

**तेथे त्रिकाळ जति गति नाही रे। नाही इंद्र चंद्र आकाश भूमि रे। नाही आप तेज वायो तेथे रे ॥७॥**

त्या ठिकाणी त्रिकाळ तीन अवस्थेत तीन प्रकारची होणारी जाति गति नाही. इंद्र, चंद्र, आकाश, भूमि, आप, तेज, वायु हे काही नाही. (७)

**तरी वेद अक्षर गिवसावे ते कैसे रे। न गणित गुण गेले रे। सिद्धी ना साधक मंत्र ना तंत्र। मा तेथे जटा पद क्रम कैचे रे ॥८॥**

तरी हे वेदप्रणीत अक्षर वेदाचे सारभूत ते कसे सापडावे ? ज्याचे गणितही करता येणार नाही असे गुण ज्यात समाविष्ट आहेत, ज्याची सिद्धि नाही, साधन करून साधावे असे ते साधण्याजोगे साधक नाही. मनाचे पलीकडील अवस्था तशीच तनूचे पलीकडील स्थिती, हे मंत्र, तंत्रही जात नाहीत, मग त्या ठिकाणी जटा, क्रम, पद कोठचे ? (८)

**स्थूल न सूक्ष्म नव्हे रे। धातु नव्हे मातु नव्हे रे। मा काही नव्हे ते अक्षर होये रे ॥९॥**

ते स्थूल नाही किंवा सूक्ष्म नाही. धातु नाही किंवा सर्वांवर मात करावी अशीही गोष्ट नाही. मग जे काहीच नाही तेच ते अक्षर आहे. (९)

**पर नव्हे परतर नव्हे रे। जाति नव्हे अजाति नव्हे। मा काही नहोनिया एक होय रे ॥१०॥**

पलीकडचे नव्हे, पलीकडच्या पलीकडचे नव्हे. ते जातीत जमा होणारे अगर अजातीही नव्हे. पण ते काही न होऊन एकत्र होत आहे, असे ते आहे.(१०)

**बुद्धी नव्हे शुद्धी नव्हे रे। वाट नव्हे घाट नव्हे मा घाटाटीत नव्हे। मवाळा मवाळ नव्हे नव्हे रे ॥११॥**





ते बुद्धि नव्हे, शुद्धि नव्हे, घाट नव्हे, घट किंवा घटातीतही नव्हे. मवाळाहून मवाळ नव्हे (११)

**साच ना दृश्य नव्हे रे। दृश्य नव्हे मा अदृश्य नव्हे रे। वेदी बालिले ते होय रे ॥१२॥**

ते खरोखरीच दृश्य नव्हे. दृश्य नव्हे आणि अदृश्यही पण नव्हे. वेदांनी जसे सर्वापलीकडचे म्हणून सांगितले तसेच ते आहे. (१२)

**सप्त पाताळा तळ नव्हे रे। एकवीस स्वर्गाहोनी आगळेची आहे रे। बाविसाहूनी परते पाही रे।।१३॥**

सप्त पाताळांचा जे तळही नव्हे, एकवीस स्वर्गाहून ते निराळेच आहे. स्वरगामी जीवनाची गति त्या स्वरातून गमन हा स्वर्ग असून त्याचे एकवीस टप्पे आहेत. आणि ही झेप जेथून घेतली जाते, त्यास पाताळ म्हणतात. अर्थात् हे तत्त्व एकवीस स्वर्गाचे पलीकडे जे आत्मत्व आहे, त्याही वर आहे. (१३)

**तेथे नाद बिंदू नाही रे। नाही चक्षू पाद नाही कर देह रे। देहादिक चतुर नाही रे ॥१४॥**

तेथे नाद, बिंदू नाहीत. चक्षू , पाय, हात, देह, हे काही नाही. चत्वार देहाचा जेथे निरासच झालेला आहे अशी ती स्थिती आहे. (१४)

**भ्रमू नाही भूली नाही रे। ते सतराव्याचे कडे प्रकाशले रे। परी तेथे मन होये ठायी रे ॥१५॥**

भ्रम म्हणजे सातत्याने जीवनाचे होणारे परिभ्रमण तेथे नसून, त्याचे आकर्षणही तेथे नाही. ते सतराव्या जीवनकळेने प्रकाशले असून, त्याच परीने मन तेथे ठाय घेऊनच रहाते असे होते. (१५)

**आता सातवे पाचवे बोले ज्ञान रे। तेथे पाचही नाही मा सातही नाही। मा ते अक्षर शतसहस्रावेगळे आहे रे ॥१६॥**

षट्शास्त्रापलीकडील सातवे व चार वेदापलीकडील पाचवे ज्ञान तेथे ध्वनित होत असून, तेथे मा म्हणजे ज्या अधिष्ठानावर हे ध्वनित होते तेथे पाचही नाही व सातही नाही. का ? त्यात ते लयच पावते. मग ते अक्षर शतसहस्रदळाचे वेगळेच आहे. (१६)

**मागे चौदा बोलियली साच रे। ज्ञानारते विज्ञान जाहले। मा शेखी बुडाला तो वाया रे ॥१७॥**

खरोखरीच चौदा विद्या मागे मुखोद्गत केल्या, पण जेथे ज्ञानास अनुभवाचे रूप आहे, त्या दृष्टीने नुसती पोपटपंची करून शेवट तो फुकट बुडाला,

असेच होणार का? अनुभवात शब्दज्ञान हे टिकत नाही. (१७)

**मागे अक्षरे बोलिली बहुते रे । पिंड ब्रह्मांड जयापासून जाहाले ।**
**परगुणी व्यापिले ज्ञान सुख रे ॥१८॥**

मागे पुष्कळ अक्षरे बोलली.पण पिंड,ब्रह्मांड ज्यापासून झाले आणि श्रेष्ठ गुणाने ज्ञानसुख व्यापून टाकले. (१८)

**सुखादी सुख ते म्हणो रे । तरी अमित्य वेदाची वाणी खुंटली ।**
**मा परी लक्षा लक्ष नये परिमाणा रे ॥१९॥**

त्या सुखाचेही सुख ते अक्षर असे आम्ही म्हणू. तेथे तरी अपरिमित वेदाचीही वाचा कुंठित झाली. मग लक्षालक्ष परीने ते तत्त्व परिमाणास येणार कसे ? (१९)

**त्रिदशा त्रिदश पंचदश नेणती रे । ते शतसहस्रांचे शेवटी आहे नाही**
**ऐसे दिसे रे ॥२०॥**

तीन अवस्था ज्यांना आहेत किंवा पाची अवस्था भोगणारे जे त्रिदश किंवा पंचदश जीव आहेत, ते जेथे नेणते होतात, त्यांना ज्याचा पत्ता लागत नाही का ? तेथे जाणीवच मुळी रहात नाही. (२०)

**आत्मा परमात्मा दोन्ही सखे रे । ऐसे चतुरी बोलता लोक भुलविले रे ।**
**परी अनुमाना नये वेगळा आहे रे ॥२१॥**

आत्मा, परमात्मा हे दोन्ही सखे आहेत असे जन/लोक बोलतात.पण अशा चतुरांना ज्याने भुलविले आहे, अनुमानाचे परीने जो जाणताच येत नाही, असा तो प्रणव वेगळाच आहे. (२१)

**पासष्टीपुढे अद्वैत नेमू रे । द्वैत ना अद्वैत भेद ना अभेद**
**अक्षर झेपकू तोचि भला रे ॥२२॥**

चौसष्टांच्या पलीकडे जी पासष्टावी कला आहे, ज्या कलेत कलावान झाले तर पुढे अद्वैताचा नेम आहे, जेथे द्वैताद्वैत, भेदाभेद उरतच नाही, अशा अक्षराची झेप घेण्याचे काम चालू आहे तेथपर्यंत ज्या जीवनाने उंच उडी मारून असे जीवन ज्यांनी आणले उंचावले आहे तो भला. (२२)

**बुझो गेला पाहो गेला रे । तेथे दुस नाव ना तयासी जाहले ।**
**त्या ठका ठक मौन्यामौन्य पडिले रे ॥२३॥**

जो त्याला पाहो गेला तो बुझो गेला असे होते. तेथे पहाणेच सरते. तेथे दुसरे नावच नाही. त्यालाच हे सिद्ध झाले असे होते. त्या ठिकाणी ठकाला ठकविणाऱ्या मौन्यालाही मौन्य पडले. (२३)





**तेथे जाणोनि नेणे पै जाहाले रे । मन इंद्रिया लयो जाहाला ।**
**आमित्य तेज ध्वनि उमटले रे ॥२४॥**

तेथे जाणोन तरी पुढे काय ? का ? द्वैतच नाही म्हणून नेणे अशी अवस्था झाली. मन आणि इंद्रिये यांचा लयच झाला. यामुळे अपरिमित तेज आणि नाद उमटले. (२४)

**गगनापरते अक्षर दिसे रे । दिसोन न दिसे ते वेदांचे देखणे ।**
**तेथे सहासी शुद्ध बुद्ध परते रे ॥२५॥**

आकाशाचा ग्रास झाला की ते अक्षर दिसते. ते दृष्टीत भरले की दिसोन दिसे असे होते. ते वेदांचे देखणे आहे. यामुळेच वेदालाही न इति न इति म्हणावे लागले. शुद्ध, बुद्ध, षट् शास्त्रेही जेथून परततात. (२५)

**नव्या नऊ नव्यासी शून्य रे । ऐसे राधाजंत्र भेदावे कवणे ।**
**ते कृष्णावतारी भेदियेले पुरुषोत्तमे रे ॥२६॥**

अष्टधेच्या पलीकडील जो नऊवा त्या नव्व्या जीवत्वालाही जेथे शून्यावस्था प्राप्त होते असे तेजोयंत्र कोणी लक्षावे ? त्याचे भेदन कृष्णावतारी पुरुषोत्तमाने केले. पुरी म्हणजे देह त्यात जो आहे तो पुरुष, व त्यातही जो उत्तम आहे तो पुरुषोत्तम होय. (२६)

**आता नव्यानऊ भाग करी रे । ते अर्जुनामुखी घालता भागला ।**
**ते अक्षर निराक्षर । अकार उकार मकार माते वळले रे ॥२७॥**

नवाने नवाचा भागाकार करून, एकत्वामधे आणून, अर्जुनाचे मुखात हे तत्त्व प्रतीत करता तो पुरुषोत्तमही भागला. ते अक्षर हे निराक्षर असून, अकार, उकार, मकार रूपाने मातृभावाने अर्जुनाचे ठायी वळले. (२७)

**सात बेचाळीस घाली रे । पंचविसावे तेथे गुणकारी आटले**
**निरालंब ना पावले घटाघटी रे ॥२८॥**

सात आणि बेचाळीस घालून, त्या गुणाशी ऐक्य होऊन, पंचवीस तत्त्वांची आटणी झाली. जेथे आलंब व निरालंब नाही, त्याची प्राप्ती घटाघटात झाली. सप्तविध धातु पंचविसात सतरावी मिसळल्याने तदाकार झाले. (२८)

**ते व्योमाकार रूप नव्हे रे । तेज नव्हे त्रिकूट नव्हे रे ।**
**मा गोल्हाट नव्हे मंडळामंडळी मंडळापरते रे ॥२९॥**

ते व्योमाकार रूप नसून, तेज नव्हे, त्रिकूट नव्हे , गोल्हाट, औटपीठ, भ्रमरगुंफा आणि सहस्रदळ याचे परते आहे. (२९)

**अमित भुवने चाके त्यासी रे । निरालंब अंख घालूनिया बैसे ।**

**ते तुरंगेविण अक्षर कैसे चाले रे ॥३०॥**

अमित भुवने ही त्याचीच चंक्रे असून, निरालंब अंकावर ते अधिष्ठान मांडून बसले आहे. आणि रथ नाही पण ते गतिमान् असे अक्षर आहे. (३०)

**ते नित्य नव्हे अनित्य नव्हे रे । आकारा खूण गुढारु गुढारिले ।**
**परी त्या विवरी न दिसे अक्षर रे ॥३१॥**

ते नित्य नव्हे आणि अनित्यही नव्हे. ते खुणेने आकारले असून, त्याने गूढालाही गूढ केले आहे. परंतु त्या शून्यावस्थेत अक्षर हे न दिसणारे आहे. (३१)

**बारावे भेदूनिया जाये रे । तेराव्याचे अग्राअग्री दिसे ।**
**ते परेहूनी परते आहे रे ॥३२॥**

ते भ्रमर गुंफा भेदून जाते. ब्रह्मरंध्राचे जे अग्र म्हणजे विषय जे सहस्त्रदळ त्याचे अग्राला म्हणजे टोकाला ते दिसते. त्याचे मूळ अधिष्ठान परेचे पलीकडे अनिर्वाच्य वाचेमधे आहे. (३२)

**आठ कोटी लक्षी पाही रे । मुक्त नव्हे रे अमुक्त नव्हे ।**
**मा अक्षरही नव्हे सिद्ध आहे रे ॥३३॥**

यम,नियमादि आठ प्रकाराने लक्ष देऊन ते पहावे लागते. ते मुक्तामुक्त दोन्ही नसून, लौकिकाक्षरही नव्हे. ते सिद्धच आहे. (३३)

**पिवळे नव्हे पांढरे नव्हे काळे नव्हे रे । रंग रंगाकार नव्हे अनंत ध्वनी नव्हे ।**
**अक्षर नि:शब्द निरंजन नव्हे रे ॥३४॥**

ते पिवळे, पांढरे, काळे नसून, रंग नव्हे, रंगाकार नव्हे, अनंत ध्वनि नव्हे. अक्षर निरंजन नि:शब्द हे सापेक्षता नसल्यामुळे काही नव्हे. (३४)

**षष्ठ नव्हे सप्त नव्हे रे । मन नव्हे पर नव्हे रे ।**
**ते बुडाले बुडोनी नव्हे रे ॥३५॥**

षड् विकार नव्हे, सप्त धातु नव्हे, मन नव्हे, त्याचे पलीकडे जे आहे ते नव्हे. ते बुडाले किंवा बुडून राहिले हेही नव्हे. (३५)

**सत्ताविसे एकतिसे दाटूनि पाहे रे । छत्तिसांचा चौभागी भागो तरी अप्रमिता ।**
**अप्रमीत जाहाले रे ॥३६॥**

पंचवीस तत्त्वांत दोन बीजाक्षरे मिसळून त्यात चत्वार देहात जे दाटून पहात आहेत. छत्तीस तत्त्वांचा मूळ श्रीहरी चारी भागी भागाकाराने जाणला तर ते अप्रतिमात अप्रतिम आहे. (३६)

**सहस्र शून्य सहस्रा ठायी रे । बावन्न अक्षरी गुण निवडती ।**





**ते कूटस्थ कुटाकुटी नाही रे ॥३७॥**

सहस्रदळात सहस्राची शून्यभूत स्थिती, त्या ठायी हे तत्त्व आहे. ज्या गुणांची निवड बावन्न अक्षरांनी होते, ते कूटस्थ तत्त्व असून, नुसता काथ्याकूट करून, कुटीकुटी त्रिकूटी श्रीहाटी सापडणारे नाही. (३७)

**मागे बोलिलासी भु:भुकारु रे । स्वर ना भेद सत्य ना वेद रूप बोलियले तू आपणतया नेणता । नेणोनि म्हणविसी ब्रह्म रे ॥३८॥**

मागे भुभु:कारच बोलला असून त्यात स्वर नाही. त्याचा भेद होत नाही. आपल्याला न जाणता सत्य नि:श्वासच हे रूप बोलले, व ते नेणून तेथे जाणीव न राहिल्याने उरले ते ब्रह्मच. (३८)

**विकासले व्योमाकार रे । तीनी देव नीती वेद जाहाले ।**
**मा तरी खूण चुकोनिया माघारी मागूति मुरडले रे ॥३९॥**

व्योमाकाराने ते विकसित झाले असून, तीन्ही प्रकाशरूप देवच नि:श्वसित वेद झाले, आणि अनुभवाची खूण चुकल्याने, अंतर्मुख होऊन, माघारेच मुरडले. तेथे वृत्तीची मुरड साधली. (३९)

**हा अनुवाद नको बोलो रे । नष्टा हाती निजपद दिधले ।**
**ब्रह्म अन्वये सोडू नको बोलो रे ॥४०॥**

हा अनुवाद बोलू नको. का? बोलण्याने प्राप्ति नाही. आपले अस्तित्व ठेवले नाही. त्याच्या हाती ते निजपदच दिले आहे. अन्वय आणि व्यतिरेक जाणून, तू हे ब्रह्म सोडू नको. (४०)

**वाडापरीस वाड आहे रे । एकुणसावे अक्षरी मंत्रा साधु गेलासी ।**
**परि ते काही नाही ऐसे जाहाले रे ॥४१॥**

ते मोठ्यापेक्षाही मोठे आहे. जीवभावाने मंत्र साधु गेलास; पण जीवभावाला त्याची प्राप्ति होत नसल्याने, ते काही नाही असे झाले. (४१)

**रकारी बोध बोलसी रे । तेथे घटीते रे विघटीते के न पडेची ।**
**त्या मंडळामंडळी गुंतलासी रे ॥४२॥**

रकार तेजोरूपाला बोध म्हणतात. तेथे घटी व घटी पूर्ण होण्याची आधीची अवस्था विघटी म्हणजे घटकोघटकी न पडता-तेथे तादात्म्य न होता-वलयाकार दृश्यातच गुंतून राहिलास रे. (४२)

**नकारु रूप शून्य रे । सहस्राचिये वाटे एक फाकले ।**
**माते अक्षरासी भेदु नाही रे ॥४३॥**

वलयात्मक शून्यावस्था हे नकाराचे रूप आहे. त्याला खरे अस्तित्व नाही;

ते सातत्याने दिसते इतकेच. सहस्रदळाचे वाटेत फाळणी ज्याने केली असे जे माझे अक्षर तेथे मात्र भेद नाही. (४३)

**यम नेम काय करिसी रे । गुरुमुखे सांगता वाया भ्रमले ।**
**आपणपा नाही शुद्धि रे ॥४४॥**

यमनियमाची तरी काय जरुरी आहे ? किंवा गुरुमुखाने ज्ञान झाले असताना, जे भ्रमले, ते वायाच नव्हेत का? कारण भ्रमंती सुरूच आहे. गुरुमुखाचे सांगणे हे स्थिरतेकरिता आहे. आत्मशुद्धीच जर स्थिरतेचे अभावी झाली नाही, तर उपयोग काय ? (४४)

**भांबाविले मन बुडवि रे । मार्गु ठावा न पडता उगले ।**
**मध्येचि बुडोनि गेले रे ॥४५॥**

या अवस्थेत जे मन भांबावले, तो मनाचे मनत्वच नाहीसे झाले. उगेपणात आल्याने, मार्ग ठावा पडणेची जरुरीच राहिली नाही ते जीवनाचे मध्य धारेत बुडून मूळ ठिकाणी आले. (४५)

**गति मति वेदु बोले रे । सातवी मातृका सहस्री वाटियेली ।**
**तेथे गुण-लयो जाहाला रे ॥४६॥**

परमात्म-नि:श्वासाने जीवनाची गति व बुद्धि ही ध्वनित केली आहे. पंच मातृकेवर ज्या दोन मातृका आहेत, त्यात जो सोहंमधला मकार आहे, ती ध्वनियुक्त मात्रा सहस्रदळात वाटणीस आली. त्या ठिकाणी जीवनसूत्राचा लयच झाला.(४६)

**दिधले मन पाचा ठायी रे । पाचे पाच भागु विभागु जाहला ।**
**तेथे ब्रह्मरसु रसी मुराला रे ॥४७॥**

पंच मातृकेत मनाचे तादात्म्य झाले. त्यात पंचप्राण मिसळल्याने पंच तत्त्वांचा भागाकार झाला. तेथे जीवनरसात ब्रह्मरस मिसळून राहिला. (४७)

**वासुकीमणी मंथन केले रे । तिही देव तेथे संध्यावळी ठायी बुडाले ।**
**मा तरी सहस्रमुखी लेखा कायसा रे ॥४८॥**

कुंडलिनीचे तोंडातला त्रिकुटीत जाणारा लाल आरक्त वर्ण मणी त्याचे मंथन करता संधिकालात त्रिगुणात्मक तिन्ही देवांचा लय झाला. मग सहस्रमुखी शेष तरी याचा काय लेख करणार ? (४८)

**साहाव्याची गोठी वळोन पाहे रे । अगाध ब्रह्माच्या गोष्टी करिती ।**
**सत्य ब्रह्म त्याच्या पोटी रे ॥४९॥**

पंचतत्त्वापलीकडचा जो सहावा परमात्मा, त्याच्या गोष्टी अंतर्मुख होऊनच





पाहिल्या पाहिजेत. अगाध अशा ब्रह्माच्या गोष्टीतच अस्तिरूप ब्रह्म सद्रूपाने त्याचे पोटी अनुभवास येते. (४९)

**ध्याना कल्पिता न पविजे रे । आपुला आत्मा शुद्ध चैतन्य देखिल्या तेचि ते ।**
**ब्रह्म ब्रह्माकार होय रे ॥५०॥**

ध्यानाची कल्पना करून त्याची प्राप्ति होणारी नाही. कल्पनेचे ध्यान तेथे प्राप्तिही कल्पनेचीच. आपला आत्मा निखळ शुद्ध चैतन्यच आहे, हे जाणताच ब्रह्म हे ब्रह्माकारच होत आहे. (५०)

**मधुर मधुर अनुभव रसु रे । तेथे संवादु ना गोडी तिखट ।**
**ना पैत्य ते अंबर अंबराकार रे ॥५१॥**

मधुरालाही मधुर वाटावा असा हा रस आहे. त्या ठिकाणी संवादाचा गोडवा तिखटपणा नाही. हा दृश्यापलीकडे आकाशाचे ठिकाणी आकाशरूप जीवनरस आहे. (५१)

**हीर म्हणिजे ठकार शून्य रे । पांचवे पुढे बिंदुले दिधले ।**
**ते नववे पुसूनी जाये रे ॥५२॥**

ठकारात्मक शून्य हेच हीर असून, हे बिंदुले पंचमातृकेपुढे दिले. ते जीव पुसून जाते. (५२)

**विधी म्हणसी ध्याना अगोचर रे । एक्याण्णऊ मातृका भेदिल्या ।**
**ते त्रिपुटा फुटोनी जाय रे ॥५३॥**

बुद्धीला ध्यान करणेस ते अगोचर आहे असे म्हणतात. जीवाचे एकाशी तादात्म्य होणाऱ्या मातृकांचे भेदन करुन ते त्रिपुटी निरसनाने जात आहे. (५३)

**योगी मंत्र येकू साधू रे । आटी जनी तेथे उभे राहूनिया ।**
**अकराव्याचे तोंड मारी रे ॥५४॥**

योग्यांचा एक मंत्र आसून, तो साधावा असा आहे. मोठ्या कष्टाने तेथे जीवनाची ऊर्ध्वगामी धारणा स्थिर करून, मनाचे तोंड मारून, मनाचे मनत्व नाहीसे करावे असे आहे. (५४)

**येणे जाणे परी नाही रे । सिद्ध साकार भाविसी काय ?**
**मा अयोगायोगु ते नव्हे रे ॥५५॥**

या ठिकाणी येणे - जाणे हा प्रकारच नाही. सिद्ध सकाराने युक्तच असे ते साकार आहे. त्याला वेगळे काय भावावे ? जेथे सहजच योग आहे तेथे आयोग

योग किंवा योगायोग म्हणावे कशाला? (५५)

**नाङ्गा भाविसी काय रे । नकारशब्दे नामात्मक नाही ।**
**ते न होनी जाय रे ॥५६॥**

सर्व दृश्यास नाट लावणारे, त्यास काय भावावे ? बरे ते नकार शब्दाने नामात्मकही नाही, अशा स्थितीत ते काही न होताच जात आहे, गतिमान् आहे. (५६)

**पराहूनी परता आहे रे । अमित व्योममंडळे भेदूनि ते ।**
**मातृकेचे नाव काय रे ॥५७॥**

जे परेच्या पलीकडे आहे आणि अमित आकाशमंडळांचा ग्रास करुन, जे चालले आहे, त्या मातृकेचे नाव काय ? (५७)

**चेवू आलिया निजसुदा नव्हे रे । नीज चेतविले जागे निजविले ।**
**दमदर्गा फुटी घाली रे ॥५८॥**

चैतन्यास आल्यावर जे निद्रिस्त नव्हे, ज्या ठिकाणी निजत्व चेतविले असून, जागृतावस्थेत जे निजत्वाला आले आहे, ते व्यवहारात जीवन व्यतीत करीत आहेत म्हणजे तेथे जीवनाचाच व्यवहार चाललेला आहे. (५८)

**तेथे बावन्न त्रेपन्न सक म्हणतले रे । त्यासी लावावया मा आणिक बंधु नाही रे ॥५९॥**

तेथे बावन्न किंवा हे जेथून निर्माण झाले ते धरुन त्रेपन्न मातृका आहेत, असे सगळे म्हणतील. पण जे त्रेपन्नावे वर्म आहे, त्याला या जगात दुसरी तोड नाही. (५९)

**यासी उपावो नाही अपावो नाही रे । नाही नाही तेथे काही ते घेवून राही रे ॥६०॥**

त्याला उपाय व अपाय हे दोन्ही नाहीत. "नाही" हे जेथे "नाही होते", तेथे जे काही आहे, ते घेऊन राहावे. (६०)

**तत्त्वातत्त्वा भेदू नाही रे । महातत्त्वाचे सामर्थ्य जाशील ।**
**तेथे आपण नाही काही रे ॥६१॥**

तत्त्वातत्त्वांत काही भेद नसून, महातत्त्वाचे सामर्थ्याने तेथे जाता येईल की जेथे आपण आपले अस्तित्व ठेऊन राहू शकणार नाही. (६१)

**मा तत्त्वा भेदू नाही रे । एका शेंडा येका डिरी रे । एकतत्त्व महत्तत्त्वे तळातळ भेदियेले । वोंकारे भेदियेले परापर ॥६२॥**





एकेका मुळास एकेक शेंडा आहे. एक तत्त्वाने जे महत्तत्त्व आहे म्हणजे जे महत् असून एकच आहे, त्याने तळातळ पाताळाचेही भेदन केले आहे. ओंकाराने आमूलाग्र भेदन केले असून, ते अखंड, अनुस्यूत, सर्वव्यापी आहे. (६२)

**सत्य व्योमा शून्य देई रे । चौदावे बुडवुनि घालूनि पाहे ।**
**मा पुढे वेदबीज सांगेन रे ॥६३॥**

सत्य व्योमरूप ब्रह्माचे ठिकाणी शून्यरूप गाढ अवस्था विलीन झाली पाहिजे. चौदा चक्रांचे पलीकडे पहाता वेद बीज सांगता येईल. (६३)

**जटि ब्रह्मऋषि बोलती रे । पदपदार्थ कर्म खंडी विखंड ।**
**मा त्यासी न कळे त्या अक्षराचे पारु रे ॥६४॥**

ब्रह्मऋषींनी जटा सांगितली, खंडखंडात पदपदार्थ, कर्म विस्तारले तरी त्यास अक्षराचा अंत लागला नाही. (६४)

**कर्मकांडी एक बीज आहे रे । संकल्पी विकल्पी एको विष्णु बोले ।**
**परी ब्रह्मार्पण नाही ठायी रे ॥६५॥**

कर्मकांडात एक बीज आहे. संकल्पात किंवा ज्या ठिकाणी कर्माचे संकल्पात काही विकल्प असतो, त्यास एको विष्णु म्हणतात. परंतु ते कर्म ब्रह्मार्पणच कसे करावे हे ठाऊक नाही. (६५)

**एकु पदार्थ बोले रे । ते चोविसाक्षरी संध्यावळी बीज मिरविले ।**
**एकु आपो नारायण म्हणे रे ॥६६॥**

खरा एकच पदार्थ बोलला जातो. ते चोवीस नामांचे संध्यावळीचे बीज प्रसिद्ध आहे. ते एक तत्त्व आपो नारायणच आहे. श्रीनारायण हेच आपले जीवन आहे. (६६)

**एक ध्रुव ध्रुव म्हणती यजुरि रे । यजन याजन अध्ययन अध्यापन ।**
**दान प्रतिग्रहो नाही रे ॥६७॥**

यज्ञाचे वेळी एक ध्रुव ध्रुव म्हणतात, अढळपद स्वर्गाची इच्छा करतात. यजन, याजन, अध्ययन, अध्यापन, दान, प्रतिग्रह याची मात्र दखल नाही, मग काय ? (६७)

**रुकारु म्हणती मूळ रे । आ ब्रह्म म्हणती परतल्या दृष्टी ।**
**मा साम मागती फळ रे ॥६८॥**

रुकार हे मूळ म्हणतात. हे तेजोरूप आहे. आब्रह्मस्तंबपर्यंत हे म्हणणारी श्रुतीची दृष्टि परतली. परंतु सामगान करून फळाची इच्छा आहेच. (६८)

**सत्यलोकी विरिंचि विचरे रे । शंकरे विश्वाची प्राहुति केली ।**
**हरिकरी ठेवाठेवी रे ॥६९॥**
सत्य लोकात ब्रह्मदेव राहतो. शंकराने विश्वाचा संहार केला; तो संहार करणारा आहे. हरी हा संरक्षण करणारा, हातात आत्मसुखाचा ठेवा ठेवतो, असा आहे. (६९)

**बोध्य म्हणती निजरूप जाणे रे । गण म्हणती सिद्धू पातलिया ।**
**शक्तु म्हणे शक्तिपोटी रे ॥७०॥**
बोध करणारे निजरूप जाणावे असे म्हणतात. सिद्धाचे दर्शन झाले की शक्तीची शक्ति पोटी सामावते, असे गण म्हणतात. (७०)

**कमळे हाती घेऊन उभे रे । उदयो अस्तु नमस्कारु करिती ।**
**माते असंख्यासी न पडे अक्षर ठावे रे ॥७१॥**
कमळे हातात घेऊन भक्तजन उभे राहतात. "उदय असो" म्हणून नमस्कार करतात. तरी असल्यांनाही अक्षराची ओळख होत नाही. (७१)

**एक शैव म्हणती ज्योतिर्लिंग पाहो रे । भगता भगवता न पडेची ठायी ।**
**माते पावले निवृत्तीचे पाय प्रसादिले ॥७२॥**
एक शैव ज्योतिर्लिंग पहावे असे म्हणतात या भक्ताला व भागवतानांही हे आकलन होत नाही. मला मात्र ते श्रीनिवृत्तिनाथांच्या पायाच्या प्रसादाने प्राप्त झाले. (७२)

**निवृत्ती म्हणे सोपाना भला रे । अक्षराचे वर्म अवघे पूर्ण पक्ष जाहाले ।**
**ते अक्षर तुम्हासी भेदले रे ॥७३॥**
सोपानदेव हा परमार्थाचा सोपान म्हणजे जिनाच आहे. हे अक्षराचे वर्म म्हणजे पूर्ण पक्षी ते पूर्णच झाले. त्यानेच तुम्हा सर्वांना भेदले आहे. सर्व ठिकाणी ते प्रविष्ट आहे. (७३)

**मूळ सांडी शेंडा सांडी रे । न घडता घटन घटाघटी केली ।**
**तरी ब्रह्म ब्रह्मी चोखाळले रे ॥७४॥**
याचे मूळ आणि शेंडा सोडा. पण याने न घडताच, प्रत्येक घटाघटात आपले स्वरूपाची घडण केली आहे. आणि ते मुळांपासून शेंड्यापर्यंत देहातून आत बाहेर आणि बाहेरुन आत देहापर्यंत आणि त्याचेही आत देह पूर्वस्थितीत व देहपातानंतरही हे ब्रह्मच ब्रह्मामधे मिसळून राहिले आहे. (७४)

**अचिंतन चिंतन प्याली रे । ज्ञान सोपानाचा निवृत्ति चोढळी ।**





**ते अक्षर त्रिपत्री तिन्ही मोडले रे ॥७५॥**
अचिंत्य स्वरूपाचे चिंतन करून, या रसाचा चित्तवृत्तीने जो आस्वाद घेतला, तो ती तृप्त झाली. ज्ञान आणि सोपान यांना निवृत्तीने चोखाळले. श्रीनिवृत्तिनाथांचे कृपेने ते श्रीज्ञानेश्वरमहाराज व सोपानदेव यांना ते अक्षर प्राप्त झाले. ते बावन्न असे त्रिपत्री होऊन त्रिपत्र झाले. तिनीस म्हणजे त्रिपुटीस ते व्यापून राहिले. आणि त्यानेच ते सर्व व्याप्त असल्याने त्रिपुटीचा निरास केला, त्रिपुटी मोडली. (७५)

**ब्रह्म समुद्र घोटिला रे । तृषेक्षुधेविण पंच प्राण पै खादले रे ।**
**तिसाव्यासी मारीले तुमी रे ॥७६॥**
या अक्षराने ब्रह्म समुद्राचाही घोट घेतला असून, तहान आणि भूक यांचे शिवाय पंच प्राणांचाही ग्रास केला. पंचविसात पंचमातृकात्मक असणारे हे तिसावे अक्षर याचीच तुम्हास विस्मृति झाली आहे. (७६)

**धगधगीत ब्रह्म शस्त्र आहे रे । अमित ब्रह्माचे तेज प्रकाशीत ।**
**तेज तेजा ठायी विरे रे ॥७७॥**
हे अक्षर म्हणजे धगधगीत ब्रह्मशस्त्रच आहे. अपरिमित ब्रह्माचे तेज प्रकाशित झाले असून, हे जीवनाचे तेज त्या ब्रह्मतेजात विलीन होऊन जाते, असे आहे. (७७)

**एक रोम कुणी उगवला रे । त्याचे अनंत गुण मा अनंत पार मा ।**
**तो विष्णू भला भला भला रे ॥७८॥**
एक सूत्र जीवनामधे उदयाला आले असून, त्याचे गुणही अनंत व त्याचा पार कळणे हेही अनंतच आहे. असा तो प्रत्येकाचे हृदयात प्रविष्ट होऊन राहणारा विष्णूच श्रेष्ठ आहे. (७८)

**ते दोघे कर्म धर्म साधक भले रे । ते अमित्य भुवने धांडोळिता भागले ।**
**परी ते निर्गुण अक्षराची न लगे सोय रे ॥७९॥**
हे शिव, विष्णु कर्म धर्म साधक श्रेष्ठ आहेत. ते अप्रमाण भुवने धुंडून दमले. परंतु या निर्गुण अक्षराची सोय त्यांनाही लागली नाही. (७९)

**आदि देवी माया झाली रे । एक वैष्णवी म्हणती अद्भुती म्हणती ।**
**चौथी तिघासी खाय रे ॥८०॥**
आदि शक्ति हीच माया झाली. कोणी हिला वैष्णवी किंवा अद्भुत म्हणतात. अशी ही तुर्यावस्था तीन अवस्थांचा ग्रास करीत आहे. (८०)

**निरंजनी एकी उभी रे । सिद्ध साधक मा वेदांत बोलिजे ।**

**ते रंजना संध्यावळी माया रे ॥८१॥**

हालत नाही, बोलत नाही, चालत नाही अशा निरंजनाचे ठिकाणी ही एकत्वाने उभी असून, सिद्ध साधक असा वेदांत ध्वनित करणारी व जीवांना रंजवणारी, संधिकाळी साधता येणारी संध्यावळी अशी ही माया आहे. (८१)

**आठरा वर्ष आठरा जाति रे । चहूंची वेदी सांगितली संमति । ते निरालंबी नाही स्थिती रे ॥८२॥**

अठरा वर्ण, अठरा जाति यांची वेदांनी संगति सांगितली आहे. तथापि ती स्थिती या निरालंब स्थानात नाही. (८२)

**सुईच्या अग्री दाभण ठेवावे रे । अमित्य ब्रह्मांडे तयावरी जाली । ऐसी निज ब्रह्माक्षरीची न कळे माया रे ॥८३॥**

सुईच्या अग्रावर दाभण ठेवावे, तशी अनंत ब्रह्मांडे ज्यावर झाली ती निज ब्रह्माक्षरीची माया ही न कळणारी आहे. (८३)

**माया कोश आड जाले रे । ते तेजी तेज फोडूनी गेले । सानेते सस्वरुप अक्षर कवणे ठायी रे ॥८४॥**

हे मायाकोशात्मक दृश्य आड आहे. पण त्यालाच आडवे ओढून, हे तेज त्या तेजात कोश फोडून समाविष्ट झाले. असे ते सांगाती असणारे स्वस्वरूप अक्षर कोण-स्थानातच आहे. या अखिल विश्वाचा कोन ज्या एका बिंदूत आहे, जेथून वर्तुळाकार विश्व वर्तुळाकार फिरत आहे, तेच या अक्षराचे स्थान आहे. (८४)

**चौदा चारि चौदा घाली रे । चौदा चौके चौदा वाटूनि गेले । मा ते ब्रह्माची वाट कोण रे ॥८५॥**

चौदा विद्या, चौदा चक्रे, चौदा लोक हे चौदा चार देहांत वाटून गेले. मग ब्रह्मांडात जाण्याची वाट कोणती ? पिंडाचा भेद जे कोणस्थानात साधतात, तो कोणच ब्रह्मांडस्थानात जाण्याची वाट होय. (८५)

**अक्षरामागे अक्षर सहस्र जाले रे । लक्षलक्षाची क्रोडीक्रोडीची अनंत वाटाघाटी । निघंटी पाहिल्या रे ॥८६॥**

अक्षरामागेच सहस्रदळस्थानात घुमणारे अक्षर झाले. लक्षालक्षाचे प्रकाराने ती परी साधनेची वाटाघाटी ही अनंत आहे. नादानुसंधानापलीकडे पाहिल्यावरच हे आकलन होणारे आहे. (८६)





**चतुर बुद्धी सांगवले रे । चतुराननु चौमुखी खोचावला । पंचमुख सहस्रमुख खुंटावले रे ॥८७॥**

चारीतून बाजूला होणारी जी चतुरबुद्धी तिलाच हे सांगता येईल असे आहे. म्हणून सांगता आले. एरवी चार तोंडाचा ब्रह्मादेखील हे बोलताना चूपचाप झाला; त्याला ते सांगता येईना. पंचमुखी शंकराची तीच अवस्था. अनिर्वाच्य वाचेलाही ज्याचा पत्ता नाही, तेथे सहस्रमुख शेषाची काय कथा ? तो तर कुंठितच झाला. (८७)

**तळवा घोटी जानु नाभी वक्षस्थळी कंठ शेंडे गेले रे । शेंडीच्या अग्री चौदा भुवने मावळली । ते विराट लया लक्ष गेला रे ॥८८॥**

तळवा, घोटा, जानु, नाभि आणि वक्षःस्थळ, कंठ येथपर्यंत ज्याची व्याप्ति आहे, ज्याचे शेंड्याचे नुसत्या टोकावर चौदा लोक गडप झाले, असे ते अमित अक्षर जेथे विराट रूपाचे लक्षही लयाला गेले. (८८)

**अटत घाटत घाटिली रे । तेथे नादू नाही स्पर्श नाही । काही नाही ते अवघी लया पाही रे ॥८९॥**

चौदा भुवने,चौदा विद्या, चौदा चक्रे अटत घटत घटली. तेथे नादही नाही आणि स्पर्शही नाही. काही नाही अशी शून्यावस्थाही जेथे नाही, सर्वांचाच लय झाला. (८९)

**ऐसा उत्पत्ति गोळकू । पिंड ब्रह्मांड गोळकू सांगितला रे । ठाऊक नव्हे म्हणोनी बुडाले त्या अवताराचा काय ठावो रे ॥९०॥**

असा उत्पत्ति विचार आणि पिंड ब्रह्मांड विचार आपण सांगितला. ठाऊकच नाही म्हणून पत्ता नाही. जे सर्वात असून बेपत्ता आहे, त्या अवताराचा ठाव-ठिकाणा लागावा तरी कसा ? (९०)

**देवऋषि मुनि शुकादिक रे । साही अंगे बोलोनी गेले । मा त्या चहूंचा गड संदेह पडला रे ॥९१॥**

देवऋषि, मुनि, शुकादिक षट्शास्त्रे बोलून गेले. फार काय पर्वतप्राय चार वेद जेथे संदेहातच पडले.(९१)

**तेथे सत्तावन्ने सहस्र धातु रे । एक ज्यापासुनी मोविता भागले । अमिता मुखी वर्णिता गेले रे ॥९२॥**

ज्या एकापासून मोजताना आणि अमित मुखाने वर्णन करू गेले असता, जे बावन्न मातृकेसह धातु ऊर्ध्वगामी करूनही, विचार करता, सहस्रदळी भागले. (९२)

**शून्य वोढिले निरशून्य भेदिले पाहा रे । देवा देवो दैवते बोलती ते ब्रह्मज्ञान**

**सोपाना कर्णपुटी पेरियेले ब्रह्म रे ॥९३॥**

शून्याची खेज घेऊन, निरशून्याचे आरपार जे गेले, सर्व देव आणि दैवते ज्याचे वर्णन करतात, ते ब्रह्मज्ञानात्मक ब्रह्म सोपानाचे कर्णपुटातच पेरले. (९३)

**श्रवणेविण ऐकले रे । मनेविन मन बुडाले रे ।**
**मागे गिवसिता गिवसिता स्वस्वरूपी आहे रे ॥९४॥**

ज्या नादाचे श्रवण बाह्य कर्णाशिवाय अंत:करणाने घडले, संकल्प विकल्पाशिवाय असणारे मन जेथे बुडून गेले, ज्याने नादानुसंधानात बुडीच दिली, ते परतीच्या पावलाने गिवसिता गिवसिता, स्वस्वरुपाच्या ठिकाणी आहे, असे दिसून आले. (९४)

**निवृत्ती म्हणे ज्ञान सोपाना दोनी भागी राहे । संध्यावळी अजपा मंत्रु साधनु ।**
**त्याने उपदेशे ते ते ब्रह्म पाहे रे ॥९५॥**

वृत्ती जेथे निवृत्त होती अशी निवृत्ति, या वृत्तीने ज्ञान आणि सोपान यांना जीवनाचे दोनी भागात रहाण्यास सांगितले. ज्ञान आणि सोपान हे जीवनाचे दोन भागच आहेत. यास अनुसरून संधिकाळी संध्यावळी अजपा मंत्राचे सहज सिद्‌ध साधन आहे. तेणेकरून होणारा जो उपदेश त्याने सर्वापलीकडे जे तत्ने निर्दिष्ट आहे, ते साक्षात्काराला आले की ते ते ब्रह्मच आहे. (९५)

**म्हणसी मनासी नयन आहे रे । ते मनची नाही मा अवघे ब्रह्मची पाहे ।**
**मा माझा हस्तास्तळी उभे राही रे ॥९६॥**

मन:चक्षु आहे म्हणतो पण जेथे मनच नाही, तेथे ब्रह्मावाचून उरले काय ? सर्व काही ब्रह्मच आहे. माझे जे काही आहे ते माझे साधन हस्त क्रियेतच प्रत्ययास येणारे आहे. (९६)

**अचिंतन चिंतू नये । संध्या रागु मंत्र पंचकरणे मथिला ।**
**त्या अक्षरासी नाही भेदू रे ॥९७॥**

ज्याचे चिंतन करता येणार नाही, असे अचिंत्य संधिकाळी साधन प्रेमाने पंच प्राणाने मनाचे अतीत होऊन, ज्याचे मंथन करून अनुभूति घेतली, त्या अक्षराला भेदच नाही. (९७)

**ते ब्रह्माबह्म सार रे । त्रिकुटाने गळे गोल्हाटा वेगळे ।**
**न चुकत चुकले पाही रे ॥९८॥**

ते ब्रह्माबह्म सार असून, त्रिकूट गोल्हाटा वेगळे जे चुकले होते किंवा ज्याला आपण चुकलो होतो ते न चुकता अचूक पाहिले. (९८)





**रवि सोम माथी माथा बैसले ।**
**ते आधारेविण उदरेविण सामावले आहे रे ॥९९॥**

माथ्याचे माथ्यावर सूर्य, चंद्र सहस्रदळी अधिष्ठित असून, ते आधाराशिवाय व पोटाशिवाय त्या कलेमध्ये समाविष्ट आहे. (९९)

**चिद प्रचिद तेजा तेज नव्हे रे । अमित भुवने जयाचेनि आहारळली ।**
**तेथुनि नि:शब्दापासुनी वेद जाहाले रे ॥१००॥**

चैतन्य तेजाची प्रचीति हे लौकिक तेजापैकी नसून, ज्याच्या योगाने अमित भुवने अनुभवास आली, तेथून नि:शब्दातून परमात्म-नि:श्वास प्रगट झाले, त्यालाच वेद म्हणतात. (१००)

**ब्रह्मवृक्ष व्योमी फुलला रे । त्यासी शाखा ना मूळ ।**
**मा बीज ना अंकुर । ते अक्षर फळेविण फळ देखा रे ॥१०१॥**

ब्रह्मवृक्ष हा आकाशाने फुलून गेला असून, त्याला शाखा, मूळ, बीज, अंकुर हे काही नाहीत. ते अक्षरच फळाविण फलद्रूप झाले आहे. का ? ते स्वयंसिद्‌ध आहे, ते पहा रे. (१०१)

**सहस्र खांडियाचे एक झाड रे । जयाची विश्वपत्रे विश्वशाखा**
**मा त्याचे अंगकूपी एक ब्रह्म फळ रे ॥१०२॥**

हजार फांद्या असलेले एक झाड आहे. ज्याची विश्वपत्रे व विश्वशाखा आहेत, त्याचे अंगभूतच एक ब्रह्म फळ आहे. (१०२)

**यजुरी ऐशा ऐशी शाखा जाहाल्या रे । रुगी सप्त शाखा जाण बोलियेले ।**
**ते अथर्वण राहे शाम फळ रे ॥१०३॥**

मग यजुर्वेदासारख्या ऐशी शाखा झाल्या. ऋग्वेदाच्या सात शाखा बोलल्या असून, त्या ठिकाणी अथर्वण शाम फळाने प्रचीति देत आहे. (१०३)

**ऐसे बोलता अनंत फळ रे । परी त्या अक्षरासी न लगे फूल फळ ज्याची**
**ते निष्कामी निष्कर्मी फळेविण कैसे फळे रे ॥१०४॥**

याप्रमाणे हा विचार आपण नुसता बोललो तरी त्याचे फळ अनंत आहे परंतु त्या अक्षराला फूलही नाही आणि फळही नाही. ज्याची बुद्‌धि निष्काम आणि निष्कर्मी आहे, तेथे ते फलाशेविण फलद्रूप होते. (१०४)

**आणिक एक सांगेन गूढ रे । त्यासी सोळा ना बारा ।**
**नवासी शून्य देता दहा अकराही शून्य मिळे रे ॥१०५॥**

आणि एक गूढ रहस्य सांगतो. त्या ठिकाणी सोळा बारा या चंद्रसूर्यकलाही

नाहीत. जीवभावास शून्यत्व देताच दहा इंद्रिये आणि अकरावे मन हे शून्य-भूतच होतात. (१०५)

**ऐसे छत्तिसा गुणांचे बत्तिसावे वाटा रे। मिळाले पंचीकरणी मिळाले संध्यावळी। परी त्या न कळे अक्षराचा भेदू रे ॥१०६॥**

अशा प्रकारे ते छत्तीस गुणांचे पंचवीस आणि दहा यांचे पलीकडचे, सोळा अधिक बारा अधिक चार चित्तचतुष्टय असे मिळून बत्तिसावे ठिकाणी वाट्यास येते. ते पंचीकरणात व संधिकालात मिळाले. हे जरी आहे तरी त्या अक्षराचे ठिकाणी प्रविष्ट होणे हे कठिण आहे. त्याचा भेद कसा करावा व त्यात कसे शिरावे हे कळतच नाही. (१०६)

**एक्कावन्ने बावन्ने मिळाले सत्तावन्ने रे। परी ते अक्षर निरंजन निराकार निर्गुण। ऐसे गुणिती पै ते शहाणे रे ॥१०७॥**

एक्कावन्न किंवा बावन्नही मातृका, त्यात पंचमातृका मिळवून सत्तावन्न मातृकात अंतर्भूत झाल्या. परंतु ते अक्षर मात्र निरंजन, निराकार, निर्गुण सूत्राने जे गुणिती म्हणजे या गुणाने ओळखतात, त्या सूत्राचे ठिकाणी आपल्या जीवनसूत्राचा गुणाकार करतात, ते खरे शहाणे. (१०७)

**अडतीस पंचविशी पाच मारी रे। निरशून्याकार भृंगा भेदून गेले रे। मा परी निःशब्दाची परा वाटा पाहे रे ॥१०८॥**

छत्तीस तत्त्वात जर रकार-मकारात्मक दोन मातृका मिसळल्या, तर पंचवीस आणि पंचप्राण उरतच नाहीत. पंचवीस तत्त्वे, पंच प्राण आणि अष्टधा प्रकृती पंच मातृकांत उरतच नाहीत. निरशून्याकार भृंगाचे भेदन करून, ते अक्षरच सर्वापार गेले आहे. असे असूनही निःशब्दात जाणेस, त्या निःशब्दाचे ठिकाणी परेचे ठिकाणी स्फुरद्रूप जे स्फुरत आहे, त्याचे पलीकडेच ती वाट आहे. (१०८)

**धगधगीत एक सूरी होती रे। ते व्योमाचे पोटी फोडूनी भेदिली ते अक्षरासी वाहे वाट रे ॥१०९॥**

सूराचे ठिकाणी एक वृत्ति धगधगीत अशी प्रखर आहे. ती आकाशाचे पोट फाडून त्याचा भेद करून गेली आहे. ती वाट अक्षरापलीकडे गेली असून, त्या वाटेने हा जीवनाचा स्वर प्रवाही आहे. (१०९)

**एक आप एक पर रे। पिंड ब्रह्मांडाचे अक्षरी निवडले। सातवे गोल्हाट भेदिले रे ॥११०॥**





एक जीवन असून त्या पलीकडेच असे श्रेष्ठ आहे. या योगाने पिंडब्रह्मांडाची निवड अक्षराने दाखविली आहे. त्याचे ज्ञान झाले की आज्ञाचक्र ओलांडून, त्रिकूट-श्रीहाटापलीकडील गोल्हाटाचा भेद झालाच म्हणून समजावे. या ठिकाणी शाम वर्णाचा साक्षात्कार होऊन, साधक त्याचे परता होतो. (११०)

**तेथे विजया एकी राणी रे। काळाते खाऊनी महाकाळ गिळिला। ब्रह्म वोवरी तिचे नाव रे ॥१११॥**

तेथे विजयपताका फडकवणारी विजया बुद्धि आहे. शामवर्णाचा ग्रास करून, हा शामवर्ण ज्या योगे प्रतीत झाला असा जो शामवर्ण त्याचा ग्रास अभ्यासाने झाला. ही एक ब्रह्माची ओवरी आहे. हिला शून्यावस्था म्हणतात. (१११)

**तेथे एक होता अक्षर सिद्धावळी रे। अंतःकाळ तप्तमुख झाला शब्द न देखे फिरोनी आला रे ॥११२॥**

तेथे एक होताच अक्षर सिद्धकालात प्रचीतीला येते. त्या ठिकाणी जीवनाचा अंतकाळ असून, सर्व चैतन्य एकवटल्याने, साधकाचे मुख म्हणजे स्फुरण प्रकाशरूप होते, स्फुरद्रूप प्रकाशमान होते. या ठिकाणी नुसते स्फुरण आहे असे असून, ते प्रकाशमान आहे हे प्रतीत होते. शब्दाचा ग्रास होऊन, त्या ठिकाणी मूलस्थानात अभ्यासक आला असे होते. (११२)

**आता एक सांगेन अमित व्योमावरी फुलले रे। त्या अक्षरा बांधुनी बंदेविण धरले रे। ज्ञान सोपानासी म्या दिधले रे ॥११३॥**

अपरिमित आकाशावर हे फुलले आहे. त्या अक्षराला बांधून बंधन साधता धरले. हे ज्ञान सोपानदेवांना मीच दिले. (११३)

**ज्ञान ज्ञाने भला म्हणवी रे। सोपान सिदिनिधी ब्रह्म पावला रे। तेणे ज्ञाना ब्रह्मबोध जाला रे ॥११४॥**

ज्ञानाचेही ज्ञान, त्या ज्ञानाने सोपानदेव स्वतःलाच भला म्हणवीत. सोपान हा परमार्थाचा जिनाच आहे अर्थात् तो भलाच आहे. या सोपानाने सिद्धीचा ठेवा जो ब्रह्म याचा साक्षात्कार झाला. या योगाने ज्ञान हे ब्रह्मबोध स्थितीत आले. (११४)

**अद्वैत पंथ कैसा रे। ऐक्यवादू वेद बोल बोलती वचने ते मिळणी ब्रह्मीचे सांगेन त्रिसंध्याकाळी रे ॥११५॥**

अद्वैताचा पंथ कसण्याने कळणारा आहे. हा जो ऐक्यवाद आहे याची वचने वेदबोल बोलत आहेत, ती ब्रह्मस्वरूपाची मिळणी, ती त्रिकाळ संधिकाळी

साधावयाची असते. हेच साधन होय असेच मी सांगेन. (११५)

**ते वर्ण कवणाने घेपवे रे। अनुभविया अटक कुटले।**
**मग ते ज्ञानी म्हणती वाया रे ॥११६॥**

ते कोणासही वर्णाभिमानाने घेण्यासारखे नाही. अनुभवी जे आहेत, ते घटक साधून एकरूपच झाले. मग त्यांचा व्यावहारिक दृष्टीने काही उपयोग नाही. मग या दृष्टीने जे शब्दज्ञानी आहेत, ते यांना वायाच म्हणतात. (११६)

**जेथे मौन्यामौन्य साध्य नव्हे रे। पाच माळनी सस्वरुप होते।**
**मा तेचि ते अनुभवाची खुण रे ॥११७॥**

जेथे ते मौन्यामौन्यालाही साध्य नाही, जे पंच प्राण मावळल्यावरच स्वस्वरूप प्रचीती येते, मग तीच खरी अनुभवाची खूण आहे तेथे व्यवहार राहणार कसा ? (११७)

**मनी शंका धरु नको काही रे। चतुर देहा सहित मन मावळी।**
**मा तरी ब्रह्मबीज तूचि होशी रे ॥११८॥**

मनात काही शंका धरू नकोस. चत्वार देहासह मन विलीन झाले तर ब्रह्मबीज तूच होत आहेस (११८)

**सा सा सा चौदावरी ठेवी रे। हा भेदू कोणी जाणितला म्हणती तरी त्यासी मानू मी देईन म्हणती निवृत्ति रे ॥११९॥**

सः सः सः हीच धारणा चौदा चक्रावर ठेवावी. हे वर्म कोणी जाणले म्हणतील त्यास मी मान देईन, असे निवृत्तिनाथ म्हणतात. (११९)

**आता एक गुह्य परम गुह्य रे। ते अक्षराशेवटी दाही दिशे नाही।**
**ते सहस्र लक्षी गुणी ते आहे रे ॥१२०॥**

आता एक गौप्यातीलही श्रेष्ठ गौप्य आहे. त्या अक्षराचे शेवटी दहा दिशा नाहीत. दिक्, काल आणि आकाश याच्याही अतीत आहे. सहस्रदळाचे ठिकाणी लक्ष व्हावे अशा गुणात ते आहे आणि त्याचे गुणही अनंत आहेत. (१२०)

**हे गुपिता शास्त्र जाले ज्योतिषी रे। ते वेदाच्या पोटी धांडोळीत आहाती।**
**त्या अक्षराचा न कळे अंती अंतु रे आता ॥१२१॥**

हे ज्योतिष्यांचे गुणाकाराचे शास्त्र झाले. ते तरी वेदाचा अभ्यास करून त्या पोटीच शोधीत आहेत. पण त्या अक्षराचा शोधणाराचा अंत झाला तरी अंत लागत नाही. त्यास आदि, अंत दोन्ही नाही. (१२१)

**भडभिंग भडभिंग भयानक जाले रे। परी त्यासी सहस्र सिद्धी सहस्रमुखी**





**बुद्धी। मा बावन्न अक्षरावेगळे ते वाटे रे ॥१२२॥**

भडभिंग भडभिंग असे ध्वनि त्या ठिकाणी भयानक झाले. परंतु तेथे सहस्त्रदळाचे ठिकाणी ज्याची सिद्धी आहे आणि जी बुद्धि सहस्रमुखी आहे, ते मग बावन्न अक्षरापेक्षाही वेगळे आहे असे वाटते. (१२२)

**ऐसे अमित्य भुवनाचे सारे मावळले रे। चंडाहूनि प्रचंड थोटावले ते अक्षराचे न कळे पारू रे ॥१२३॥**

मग असे अपरिमित भुवनांचे साठे जेथे मावळले, प्रचंडाहूनी प्रचंड पण तेही तोकडे ठरले. त्या अक्षराचा पारच लागत नाही, ते कळत नाही. (१२३)

**जे निःशब्द अंकुर फुटे रे। वायूसी मोवणी आपासी भिजवणी व्योमाची ठेवणी कवण ठेवी रे ॥१२४॥**

जे वेळी निःशब्दाचे अंकुर फुटतात, तेथे वायूचा खेळ पहाण्याचे आर्द्रत्व आकाशाची ठेव कोण ठेवत आहे ? (१२४)

**मनासी नाही मारणी रे। तेजासी नाही धरणी।**
**धरू गेला तो वायाविण श्रमला रे ॥१२५॥**

जेथे मनाचा मारा करता येत नाही, तेजाला जे धरता येत नाही, धरू गेला तो फुकट नव्हे पण दमलाच. (१२५)

**परी एक निर्वाण सांगेन रे। आम्ही तिघी मा जेथूनि तुषाकारलो। ते जीवनी जीवन जेसे मिळोनी गेले। मा तैसी परी जाली आम्हा तुम्हा रे ॥१२६॥**

आता एक शेवटचे वर्म सांगतो. (आम्ही तिघी) इडा-पिंगला-सुषुम्नात्मक जेथून उदित झाली ते पाण्यात पाणी जसे मिळून गेले तशीच अवस्था झाली, ज्यामुळे ही अवस्था आमची तुमची झाली आहे. तेच ते प्रणव बीज आहे. (१२६)

---

(रविवार, चैत्र वद्य १, शके १८९०, तारीख १४-४-६८
प्रेरणा माऊलीची, सत्ता महाराजांची, कृपा श्रीतात्यासाहेबांची व प्रेमवात्सल्य कै. प. पू. पितृदेवांचे, ज्यामुळे त्यांनी या अर्भकाकरवी हा भावार्थ आपल्या कृपेने लिहून घेतला. त्यांचे अनन्य भावाने स्मरण करून, व गुरुपरंपरेला आणि गुरुपीठांना प्रणाम करून, हा भावार्थ श्री ज्ञानराजमाऊलीचे चरणी समर्पण करीत आहे).

**॥ श्री ज्ञानेश्वरांचा प्रणव, भावार्थासह संपूर्ण ॥**

***

### श्री दासराम महाराज कृत

#### गद्य अर्थासह

### एकनाथ महाराज प्रणीत

# श्री प्रकाशदीपिका

**श्रीगणेशाय नम: ॥ उद्धव म्हणे श्रीकृष्णासी । प्रणवाभ्यास सांगा आम्हासी । जेणे पाविजे परमात्मरूपासी । सुलभेसी करोनि ॥१॥**

अर्थ :- जड आणि चैतन्य यांनी साधलेल्या उपाधिभूत जीवनात असलेल्या प्रणवाचा अभ्यास कसा व्हावा की जेणेकरून आत्मतत्त्वाची प्राप्ति सुलभ होईल, अशी प्रार्थना भक्तशिरोमणि उद्धवांनी भगवान् श्रीकृष्णांना केली आहे. (१)

**अष्टांगयोग अतिकठिण । आचरिता असे दारुण ।**
**म्हणोनि प्रणवानुसंधान । सहज स्थितीचे सांगावे ॥२॥**

अर्थ :- बहिर्मुख जीवनास निरोधनाने अंतर्मुख करणारा यमनियमादि अष्टांग योग हा आचरण्यास भयंकर व अतिकठिण असल्याने, निचेष्टित देह होणे हीच ज्याची समाधि, ज्यात सहज स्थितीचा अनुभव येणे शक्य नाही. म्हणून सहज स्थितीचे प्रणवानुसंधान कसे असते, हेच, देवा, तुम्ही मला सांगावे, असे उद्धव म्हणतात. (२)

**एथे तव माझे चित्त । अखंडित भोगू पहात ।**
**तुम्ही बोलिले निश्चित । अवकाश पडे ॥३॥**

अर्थ :- या ठिकाणी माझे चित्त हे तुझेच असल्याने, हे चिदांश चित्त निरुपाधिक अखंड आत्म्याचा अखंड भोग घेऊ पहात आहे, आणि त्यांत, देवा, तुमचे बोलणे श्रवणपुटावर नि:संदेहपणे पडले की अवकाश भेदच लयास जातो. (३)

**तृषा लागलिया वेळ । कूप खणोनि प्राशिजे जळ ।**
**क्षुधा लागली प्रबळ । धाविजे सैरु ॥४॥**

अर्थ :- तहानलेल्याने विहीर खणून पाणी प्यावे अगर अत्यंत क्षुधित जीवाने सैरावैरा धावावे असेच होत आहे. म्हणजे तो केव्हा तृप्त व्हायचा ?(४)

**देवा ऐसे न कीजे आता । धीर न धरवे माझिया चित्ता ।**
**मीन जळेविण ठेविता । राहे कैसा ॥५॥**





अर्थ :- जळाशिवाय मासा आणि जगज्जीवनाशिवाय मन राहणार कसे ? व ते पाण्याबाहेर तहानेने व्याकुळ होऊन पहातील, तर त्यांना समाधान होणार कसे ? या कारणामुळे, देवा, तुम्ही आत्मजीवनस्वरूप असल्याने, त्यातच मला मिसळून घ्यावे. कारण चित्त चैतन्याची बहिर्मुख अवस्थेत (भ्रांतावस्थेत) फारकत झाल्याने, या चित्ताला धीरच धरवत नाही. (५)

**पाहूनी उद्धवाची परम स्थिती । विशेष संतोष जाहला चित्ती ।**
**आलिंगोनी परम प्रीती । बोलत असे ॥६॥**

अर्थ :- प्रेमाची पराकाष्ठा हीच भक्ती. या स्थितीत उद्धवाची ही अत्युच्च भूमिका पाहून, भगवंतांना विशेष आनंद वाटला, व चित्त चैतन्याचे आलिंगन होऊन, भगवान् बोलू लागले. (६)

**उद्धवा आमुच्या ह्रुदयीचे गूज । केवी राखू चोरुनी तुज ।**
**सर्व बीजांचे निजगूज । सांगत असो ॥७॥**

अर्थ :- आमच्या ह्रुदयीचे गूज चोरून तुला किंवा तुला चोरून या ह्रुदयीचे गूज मी राखत असतो, हेच, उद्धवा, सर्व बीजांचे निज गूज आहे. (७)

**एथे सर्वांगाचे करोनी कान । आत्मरूप चैतन्यपण ।**
**स्थिर करोनी मन । सावध पाहे ॥८॥**

अर्थ :- ज्यांतून नाक, कान, डोळे, हात, फुटले त्या सर्वांगाचे कान करून, चैतन्यरूपाने शरीरभर उसळणारे (सळसळणारे) हे आत्मरूप जीवनस्वरूप प्रवाहाचे मध्य धारेतील उभा आडवा छेद घेऊन, त्या ऊर्ध्वमुख गतीवर मनाची स्थिरता करून, मोठ्या दक्षतेने लक्ष लावून पहावे. (८)

**आमुचा ऐश्वर्ययोग । जे मत्स्वरूपाचे निजांग ।**
**तयाहोनी नसे चांग । सर्वस्व हे ॥९॥**

अर्थ :- हा आमचा ऐश्वर्ययोग म्हणजे चैतन्याचा विलास आहे की जो विलास म्हणजे माझ्या निजस्वरूपाचे ते अंग आहे की ज्यापेक्षा जगात काही चांगले दाखविताच येणार नाही, असे हे सर्वस्व आहे. (९)

**जेथूनी सर्व घडले असे । परी कवणासीही न प्रकाशे ।**
**विरिंची आदि करोनी आभासे । वांछिताती ॥१०॥**

अर्थ :- ज्याप्रमाणे मनुष्याने केलेला पेहराव त्याला प्रकाशित करू शकत नाही, त्याप्रमाणे ज्या ठिकाणी हे सर्व दृश्य ज्यात घडले आहे पण ज्याकडून हे चैतन्य प्रकाशात येऊ शकत नाही. वायुरूप आत्म्याचे

ठिकाणी उत्पन्न झालेला रजोगुणी ब्रह्माही ज्यावर प्रकाश पाडून, चैतन्यास प्रकाशात आणण्यास असमर्थ आहे. (१०)

**हे गतीची निजगती । येणे परमपुरुषाची प्राप्ती ।**
**याहुनी नसे त्रिजगती । आणिक काही ॥११॥**

अर्थ :- हे त्रैलोक्य गतिमान् असून, गतीने गति वाढविणारे आहे. पण हे चैतन्य गतीची निजगति म्हणजे ती गति निजत्वात आणणारे असल्याने, यानेच परम पुरुषाची प्राप्ति होत असते. (११)

**उद्धवा याचे कारण । सहज स्थितीचे आसन ।**
**ध्वनि अंतर्गत करून । ध्यान लक्षी ॥१२॥**

अर्थ :- जीवोपाधीने ज्या सहज स्थितीचा भंग होत नाही, अशा अकृत्रिम सहजतेचे आसन करून, त्यात होणारे ध्वनि अतंर्गत करून, नादलयाने त्या ठिकाणी प्रगट होणाऱ्या ध्यानावर लक्ष ठेवावे; हेच परमपुरुषाचे प्राप्तीचे कारण आहे. (१२)

**ध्वनि ठेविजे वृत्ती । नाद लावूनि श्रोत्री ।**
**नयनगर्भाप्रती । भ्रूमध्ये लक्षी ॥१३॥**

अर्थ :- सहज वृत्तीवर हा अंतर्गत ध्वनि ठेवून, सर्वांगाचे कान तेथे समरस करून, चंद्रसूर्यात्मक गतिमान् ऊर्ध्व दृष्टीने चंद्रसूर्यांच्या गति ज्या बिंदूवर तिरप्या आदळतात, अशा भ्रूमध्यांतर्गत नयनगर्भावर जीवास लक्ष ठेवावे लागते. (१३)

**ऐसे लक्ष लक्षिता । निज प्रगटले तत्त्वता ।**
**अणुरेणु पूर्ण भरिता । दिसतील सहजी ॥१४॥**

अर्थ :- याप्रमाणे अलक्ष्यच लक्ष्य होत आहे, हे लक्षात घेऊन लक्षिता अस्तित्वरूप निजत्व प्रगट होईल की जे अणूरेणूमध्येही परिपूर्ण भरलेले, जागृतावस्थेत दृश्य, स्वप्नावस्थेत स्वप्नसृष्टी, सुषप्तीत शून्य, त्याप्रमाणे सहजावस्थेत दिसून येईल ॥१४॥

**मुक्त मोती कृश मोठी । तुज पाहता दिसती दृष्टी ।**
**रौप्य तारा-राशी सृष्टी । भरली दिसे ॥१५॥**

अर्थ :- ज्यात जीवदशा बुडून जाते अशा प्रकारे लहान मोठे मुक्त स्वरूप श्वेत व तारकरूपात भरलेली सृष्टीच त्या जीवास दिसू लागते. (१५)

**अनेक घुंगरु तळपती । की नक्षत्रे डळमळती ।**





**असती पुष्पे डोलती । मधुर वाते ॥१६॥**

अर्थ :- जीवनकळेतील मधुर अशा वायुरूपाने नक्षत्रे ही डळमळून जावीत असे घुंगरु अनुहताचा निनाद करीत तळपत आहेत की ज्या योगाने जीवनाची विकसित झालेली व सुगंध परिमळ दरवळून टाकणारी पूर्ण उत्क्रांत पावलेली पुष्पे, वृक्ष, पल्लव नसताही डोलताहेत. (१६)

**इंद्रनीळाची निज ज्योती । राघवा नेत्राची दिसे पंक्ती ।**
**तेज गुंडाळले झळकती । अनेकत्वे ॥१७॥**

सोऽहं स्वरूपात असलेली ज्योति म्हणजे तृतीय नेत्रातील इंद्रनीळ मण्यांची पंक्ति असल्याप्रमाणेच अमर्याद आहे, की जी तेजासही गुंडाळून टाकील अशी अनेकत्वे एकत्वात झळकती आहे. का (= कारण) ती अनंतच आहे. (१७)

**क्षणक्षणा रूप पालटे । झळकता विजू हारणे ।**
**ज्वाळा भासती अपापे । प्रकाशतेजे ॥१८॥**

अर्थ :- चैतन्याचा विलास हा क्षणाक्षणाला नित्य नवीन असून, त्यातील नावीन्यपूर्ण स्वरूप झळकू लागले की नेत्रबाहुली पसरविणारी, सहस्रदळाचे माथ्यावर चमकणारी, पीतप्रभा स्वरूपिणी विद्युल्लता ही हारपून जाती की ज्या तेजाचे प्रकाशाने प्रज्वलित स्वरूपाचा आपोआप साक्षात्कार होतो. (१८)

**चंद्र सूर्य दिसती उगवले । अनेक तेज पाहता फाकले ।**
**ऐसे तेज पाहिले । दृष्टीस भासे ॥१९॥**

अर्थ :- चंद्रसूर्यगतींचे तेज प्रगट झालेले पाहिले की अनेकत्वाचे तेज फाकलेले दृष्टीस भासते. (१९)

**तयाचे ऐकिजे कारण । प्रथम अंधकार निबिडपण ।**
**ते अष्टधा प्रकृती जाण । निश्चयेसी ॥२०॥**

अर्थ :- अनेकत्वाचे कारण शून्यात्मक गाढ अवस्था हीच प्रथम असून, पंचमहाभूतात्मक व त्रिगुणात्मक अशी अष्टधा प्रकृति चंचळत्वाने बनली आहे, हे निश्चित होय. (२०)

**जे प्राणिया होयं गतीं । ते इये अंधकारे पडती ।**
**तया मत्स्वरुपाची प्राप्ती । नव्हे येणे ॥२१॥**

अर्थ : प्राणधारी प्राण्यांस ही गती प्राप्त झाली की ते द्वैताच्या काळोखात पडतात की त्यांना सत्यासत्याचा निवाडाच होत नाही. व अशा भ्रमणाने भ्रांत

झालेल्या भ्रमित जीवांना स्वरूपाची प्रातीच होणे शक्य होत नाही. (२१)

**सूक्ष्मपणे सुवर्ण रज । तया प्रकाशे दिसे तुज ।**
**ते मूळमाया हे गूज । ओळखिजे तुवा ॥२२॥**

अर्थ :- आत्मप्रकाशानेच सूक्ष्म अशा पीत प्रभेचा साक्षात्कार होत असतो, तीच मूळमाया होय, हे तू गौप्य ओळखून घे. (२२)

**येणेची जीव शिव होये । सूक्ष्मपणे कळोन आहे ।**
**सर्वेंद्रिया व्यापक होये । गती तेही ॥२३॥**

अर्थ :- पीत प्रकाशरूप मायेचे सूक्ष्म भेदानेच जीवाशिवांची उत्पत्ति होते की जे गतिरूप असून, सर्वेंद्रियांत व्यापक होतात. हे सूक्ष्मत्वातच कळोन येणारे आहे. (२३)

**जे का दिसे मुक्ताकार । तोची ब्रह्मा निर्धार ।**
**अनेक रूपासी परपार । भरोनी ॥२४॥**

अर्थ :- जे का दृष्टीसी दिसणारे दृश्य तो रजोगुणी मुक्ताकार ब्रह्मदेव असून, अनेकत्वाने तो भरून राहिला आहे. (२४)

**तारा दंडाकार दिसती । तोची विष्णू सुनिश्चिती ।**
**सर्व पालनाची स्थिती । निजगती कर ॥२५॥**

अर्थ :- सत्त्वगुणाने धारणा उत्पन्न करणारे दंडायमान तारक स्वरूप हे विष्णूचे असून, त्याचे गतीनेच कोणत्याही दृश्यास स्थिती येते, व त्याचे पालनपोषण होते. (२५)

**नाना तेजाचे गुंडाळे । लक्षिता तरंगिसी फळे ।**
**तोची शेषशायी विमळे । भ्रांती नाही ॥२६॥**

अर्थ :- भ्रमणरहित भ्रांतीचे पैल नाना तेजांचे गुंडाळे पाहिले की ती पंच प्राणांची धारणा आणि शुद्ध स्वरूपात शेषशायीचा होणारा घोर स्वरूप साक्षात्कार होय. (२६)

**तेज दिसे वर्तुळाकारेसी । चक्र चक्रात प्रवेशी ।**
**तोची सदाशिव निश्चयेसी । ओळखी तू ॥२७॥**

अर्थ :- आधार चक्रापासून तो सहस्त्रदलापर्यंत चक्राचक्रात दिसणारे परिपूर्ण वर्तुळाकार तेज हेच सदाशिवाचे स्वरूप आहे, ते तू ओळख. (२७)

**आणिक एक अर्धचंद्राकार । तोची जाणिजे ईश्वर ।**





**जया स्वरूपाचा परपार । न कळे कोणा ॥२८॥**

अर्थ :- शीत श्वेत गतिरूप अर्धचंद्राकार चैतन्य म्हणजेच अस्तित्वरूप निजत्वात अनुभवास येणारा ईश्वर होय की ज्याचा कोणासच अंत लागला नाही. (२८)

**जो इंदू भास्करापरी भासे । दृष्टी लावोनी समरसे ।**
**स्थिर करोनी मानसे । निश्चळ पाही ॥२९॥**

अर्थ :- चंद्राप्रमाणे थंड पण सूर्याप्रमाणे दैदीप्यमान स्वरूप दृष्टिद्वारा मनाचे केंद्रीकरण करणाऱ्या जीवाला निश्चळत्वाने प्रचीतीस येते. (२९)

**तयाही देखुनी । मयूरपिच्छ नीलपाणी ।**
**ऐसे दिसे निज नयनी । स्वरूप एक ॥३०॥**

अर्थ :- चैतन्याचे गतिमान् चंद्रसूर्यदृष्टीने पहाता, सहस्रदलस्थानात मयूरपिच्छ नीलपाणी स्वरूपाचाच एक अनुभव येतो. एक स्वरूपच तेथे रहाते की ज्यायोगे सर्व दृश्यादृश्याची प्रचीति एकच येते. (३०)

**तया खोविजे दृष्टी । तया भ्रूमधे होय भेटी ।**
**ते येऊनी नेत्रसंपुटी । होतसे स्थिर ॥३१॥**

अर्थ :- त्या ठिकाणी दृष्टीचे तादात्म्य झाले की भ्रूमध्यस्थानी त्या स्वयंप्रकाशाची भेट होऊन तो नेत्रसंपुटात स्थिर होतो व द्वैतात अद्वैताची मजा लुटून दुसरे दृश्य त्या प्रकाशात दिसतच नाही. (३१)

**त्याने निजदृष्टीचा प्रवेश । सहज उन्मनी सौरस ।**
**मग निजतेजाचा प्रकाश । ब्रह्मरूप ॥३२॥**

अर्थ :- सहज स्थितीत निजदृष्टीचा चैतन्यात प्रवेश म्हणजेच उन्मनी अवस्था असून, त्यात पसरणारा निजतेजाचा प्रकाश म्हणजेच ब्रह्मरूपता आहे. (३२)

**ऐसी ब्रह्मस्वरूपाची पेटी । पाहता उघडेल दृष्टी ।**
**तटस्थाची वृत्ती । कोण सांगे ॥३३॥**

अर्थ :- हा ब्रह्मानुभव ज्या सहस्रदलाच्या पेटीत समाविष्ट आहे, तेथे खेचरी मुद्रा लागताच, चंद्रसूर्यात्मक गति एका बिंदूवर आदळताच, गतीचे डोळे होऊन ते उन्मीलित होतात, व दृष्टीचा डोळा उघडून पहाणारास त्याचे यथार्थ ज्ञान होते. मग जो तेथे तटस्थच होऊन गेला आहे, त्याची वृत्ती कोणी सांगावी ? ''तुका म्हणे मग नये वृत्तीवरी'' अशीच त्याची स्थिती होणार. (३३)

**तेथे ब्रह्मतेज प्रगटले । साध्य साधन खुंटले ।**
**आप आपण झाले । स्वस्वरूप ॥३४॥**

अर्थ :- त्या ठिकाणी ब्रह्मतेज प्रगट झाले की साध्य-साधन हे एकच होते व जीव हा आपण स्वस्वरूप होतो. (३४)

**ऐसा मदैश्वर्य योग । सागितला तुज सांग ।**
**हे माझे निजांग । निश्चयेसी ॥३५॥**

अर्थ :- असा हा माझा ऐश्वर्ययोग तुला पूर्णत: सांगितला असून, हेच माझे (निश्चयपूर्वक) निजांग आहे, हे तू निश्चित जाण. (३५)

**पाषाण देव देऊळा । अंतर्बाह्य एकचि शिळा ।**
**तैसा प्रकाशिला अवलीला । हृदयस्थ जो ॥३६॥**

अर्थ :- पाषाण देव आणि देऊळ म्हणजे अंतर्बाह्य एक शिळाच आहे. त्याप्रमाणे नाक, कान, डोळा,जिव्हा व टाळू या पाच छिद्रांनी जोडलेले अंतराकाशात्मक हृदयात वास्तव्य करणारा आत्माच सर्व शरीरात अंतर्बाह्य प्रकाशमान झाला आहे. (३६)

**ऐसा विष्णू आत्मलिंग । बोधा आलिया सांग ।**
**तेथे कैचे सांगोपांग । स्वयंज्योती ॥३७॥**

अर्थ :- लिंगाकृति आत्मा हाच विष्णु बोधरूप झाल्यावर, सांगोपांग स्वयंज्योतीचाच अनादिसिद्ध अनुभव जीवाला येतो. (३७)

**घरी कामधेनू असता । तक्र मागो जाय दीनता ।**
**ठेवणे वडिलांचे घरी असता । मागे भिक्षा ॥३८॥**

अर्थ :- कामधेनु घरी असून, ताकाचे लोटके घेऊन दीनपणाने घरोघर हिंडावे, व वडिलांनी घरी ठेव ठेवली असता, भिकेचे डोहाळे व्हावेत, अशी जीवाची स्थिती आहे. (३८)

**मृत्तिका जळ विचित्र प्रतिमा । तेथे दैवत ऐसी सीमा ।**
**सकळ आत्मया रामा । व्यापक विश्वी ॥३९॥**

अर्थ :- विश्वव्यापक आत्माराम असता, जीव माती, पाणी व प्रतिमा यांनाच देव मानतो. (३९)

**ऐसा हृदयस्थ मनोरम । सर्व सुखाचे निजधाम ।**
**भ्रांती येणे सम विषम । मानितु असे ॥४०॥**

अर्थ :- हृदयस्थ मनास रमविणारा, सर्व सुखाचे माहेरघर आत्माराम





असता, पृथ्वीच्या परिभ्रमणाने दिवस-रात्र, त्याप्रमाणे जीवाच्या परिभ्रमणाने समविषम स्थिति जीव भ्रांतीने मानीत असतो. (४०)

**भ्रमरी कीटक न्याय । झाला जरी उपाय ।**
**तरी स्वरूपाची सोय । आपरूपाची ॥४१॥**

अर्थ :- आळी ज्याप्रमाणे ध्यासाने भृंगी होते, तसा उपाय झाल्यास, आत्मानुसंधानाने जीव स्वरूपाकार सहजच होतो. (४१)

**मग प्रत्यक्ष तत्त्व दिसे । चक्षुरग्नि मणिमय प्रकाशे ।**
**जो पूर्णत्वची असे । सर्वसाक्षी ॥४२॥**

अर्थ :- पूर्णत्वाने पूर्ण असलेला आत्मा सर्व साक्षित्वाने भ्रूमध्यांतर्गत चक्षु, आधारचक्र, नाभिकमल-गत, मणिपूरादीकांना प्रकाशित करतो, असे मग प्रत्यक्ष अनुभवास येते. (४२)

**तयाआड अंधार आहे । ते माया स्वरूप सिद्ध आहे ।**
**तटस्थ खुंटली प्रवाहे । स्वरूप दिसेना ॥४३॥**

अर्थ :- शून्यात्मक मायास्वरूपाने प्राणधारणेत सर्व प्रवाह खुंटल्यामुळे स्वरूप साक्षात्कार होत नाही. (४३)

**ऐसे चक्षुमाजी गुह्य जे । अंगुष्ठपर्व मणी हे ।**
**तयावरी पर्वार्ध पाहे । कारण जे का ॥४४॥**

अर्थ :- दृष्टीमध्ये चमकणारे आत्मस्वरूप हेच स्थूळाचे व सूक्ष्माचे मूळ आहे. (४४)

**तयावरी वर्तुळ बिंदु ज्योती । श्रोती अन्यथा न मानावे चित्ती ।**
**मसूरप्रमाण तेजस्थिती । तया अंतरदृष्टी पीत भासे ॥४५॥**

अर्थ : स्थूळ-सूक्ष्म-कारण शरीरापलीकडे जे उपाधिभूत जीवनात आकाशरूप जीवन ऊर्ध्वमुख झाले की नाद-बिंदूचे अनुभव साधकास क्रमश: येतात व मसूरप्रमाण तेजस्थितीत अंतर्दृष्टीने पीतप्रभेचा लखलखाट होतो. (४५)

**नील सुनील अमल । देव साळी शुक केवळ ।**
**तयाहूनी अतिनिर्मळ । सूक्ष्म ज्योती ॥४६॥**

अर्थ :- अत्यंत निर्मळ अशा नीलप्रकाशयुक्त सूक्ष्म ज्योतीचा अनुभव सोहंधारणेत येतो. (४६)

**चक्षूचिया दशांश भागी । तेथे पहाती जे योगी ।**

**स्वयंतेज निजांगी । स्वतेजे असे ॥४७॥**

अर्थ :- नील बिंदूच्या दहाव्या निराळ्या भागात जे योगी तादात्म्य होतात, त्यांना निजत्वाचे स्वयंतेज प्रचीतीस येते. (४७)

**अचळ निर्मळ शांत । निज असे दिसत ।**
**विमल विमल दिसत । स्वरूप शून्य ॥४८॥**

अर्थ :- स्वरूप शून्य स्थितीत शुद्ध, अचल व शांत असे अस्तिरूप निजत्व प्रत्ययास येते. (४८)

**ऐसे ते निरंजन । शुद्ध स्फटिक प्रमाण ।**
**प्रकाशमान मणी शुभ्रपण । विराजले असे ॥४९॥**

अर्थ :- अशा प्रकारे शुभ्र व स्वच्छ असे स्फटिकाप्रमाणे प्रकाशमान, निरंजन स्वरूप निश्चळत्वाने विराजमान झालेले असते. (४९)

**तेजोराशी परब्रह्म असे । धारणेसी समरसे ।**
**प्राणलिंग प्रत्यक्ष दिसे । सत्‌चिदानंद ॥५०॥**

अर्थ :- सोहंरूप सत्‌चिदानंद परब्रह्माचे तेजाचे धारणेत समरस झालेल्या जीवास स्पंदनरूप प्राणलिंग प्रत्यक्ष दिसते. (५०)

**ऐसेनी सर्वांगे पाहता । परमात्मा दिसेल तत्त्वता ।**
**हे निरामय कर्ता । विरुळा जाणे ॥५१॥**

अर्थ :- अशा प्रकाराने सर्वांगाने पहाणारालाच परमात्मा दृगोचर होईल व हे जाणणाराही विरळाच सापडेल. (५१)

**ऐसी वस्तू चर्मचक्षू जो लाहे । ज्ञानदृष्टी करूनि जो पाहे ।**
**चिद्‌ज्ञानू होऊनी राहे । निजवस्तू पूर्ण ॥५२॥**

अर्थ :- चैतन्यरूप झालेला जीवच पूर्ण वस्तूची ओळख अंतर्बाह्य दृष्टीने घेऊ शकतो. (५२)

**एका जनार्दना शरण । झाले उद्धव श्रीकृष्णाचे संभाषण ।**
**ते निरुपिले देशभाषेकरुन । श्रोती अन्यथा न मानावे ॥५३॥**

अर्थ :- श्रीजनार्दनस्वामींना शरण जाऊन, उद्धव-श्रीकृष्णाचे संभाषण श्री एकनाथमहाराजांनी प्राकृत भाषेत निवेदन केले. ते काहीतरी आहे असे न मानता, श्रोत्यांनी अभ्यासपूर्वक त्याचा अनुभव घ्यावा, अशी श्रीएकनाथमहाराजांची इच्छा आहे. (५३)

**॥ गद्य अर्थासह श्रीप्रकाशदीपिका समाप्त ॥**

* * *



### श्रीदासराममहाराजकृत

#### गद्य अर्थासह

# समर्थरचित सोलीव सुख

सोलीव सुख हे श्रीसमर्थांचे एक छोटे प्रकरण आहे. दासबोधाचा हा सोलीव अर्थ आहे, असे खुद्द श्रीसमर्थांनीच या प्रकरणाचे शेवटी म्हटले आहे. त्यामुळे या लघु ग्रंथात समर्थांनी काय सांगितले आहे, या प्रश्नाचे सहजच उत्तर मिळते.

श्रीज्ञानेश्वरमहाराज यांची श्रीज्ञानदेवतेहत्तिशी व श्रीसमर्थांचे सोलीव सुख ही एकमेकांशी जुळती मिळती आहेत, असे आपणांस या ग्रथांच्या अंतरंगात प्रविष्ट झाल्यास स्पष्टपणे दिसून येईल.

श्रीज्ञानेश्वरांचा अमृतानुभव व श्रीसमर्थांचा आत्माराम तत्त्वज्ञानाच्या दृष्टीने पाहिले असता, एकच आहेत असे म्हणावे लागेल.

आत्माराम व सोलीव सुख हे दोन्ही छोटे ग्रंथ श्रीसमर्थांचे लाडके ग्रंथ आहेत, असे दिसून येते. श्रीज्ञानदेवतेहत्तिशीच्या ओव्या तेहतीस आहेत, तर सोलीव सुखही अवघ्या पन्नास ओव्यांचे आहे. या ओव्या श्रीसमर्थांचे निस्सीम भक्त नित्य नेमाने वाचत असतात. या ओव्या म्हणजे श्रीसमर्थांनीच लिहिलेला दासबोध नित्यपाठ आहे. किंबहुना श्रीदासबोधाचे ते एक विहंगम दर्शन आहे.

सुप्रसिद्ध कै. लक्ष्मण रामचंद्र पांगारकर यांनी जो दासबोध प्रसिद्ध केलेला आहे,त्याचे प्रारंभीच हे सोलीव सुख त्यांनी दिलेले आहे. काही जणांच्या मते, हा ग्रंथ श्रीकल्याणस्वामींनी लिहिला असे आहे, तर श्री. पांगारकर आदिकरून काहीजण हा ग्रंथ श्रीसमर्थांचाच आहे, असे म्हणतात. आपल्याला असे येथे स्पष्ट दिसते ते म्हणजे हा श्रीसमर्थ-कल्याणांचा संवाद आहे. श्रीकृष्णार्जुन-संवाद म्हणजेच श्रीभगवद्‌गीता, त्याप्रमाणे या गुरुशिष्यांचा हा परमोच्च संवाद म्हणजेच सोलीव सुख होय. यावरून श्रीकल्याणांच्या मनोगताप्रमाणे, श्रीसमर्थांनी श्रीदासबोधाचे सारच काढून श्रीकल्याणांचे व तदनुषंगाने समस्त समर्थ-भक्तांचे हाती दिले आहे, याची उकल होते. नित्य नियमाने या ओव्या पठण केल्यास, ग्रंथराज श्रीदासबोध

दृष्टीसमोर उभा राहून, श्रीसमर्थदर्शन वाचकांस सहजच व्हावे, असे सामर्थ्य या सोलीव सुखात आहे; अध्यात्माचा हा सोलीव गाभाच आहे.

या ठिकाणी प्रारंभी श्रीकल्याणस्वामींनी श्रीसमर्थांचे नमन व स्तवन केलेले आहे. श्रीकल्याणस्वामी श्रीसमर्थांना उद्देशून म्हणतात :-

**जय जयाजी सद्गुरुवर्या । पूर्ण ब्रह्म प्रताप सूर्या ।**
**तुज नमोजी आचार्या । करुणासिंधो ॥१॥**

श्रीसमर्थांचा ग्रंथराज दासबोध हा सात हजार ओव्यांचा वीस-दशकी ग्रंथ आहे; पण त्याची सुरवात नमनाने अगर स्तवनाने म्हणजे मंगलाचरणाने न होता, ''श्रोते पुसती कोण ग्रंथ'' या प्रकाराने झालेली आहे. येथे मात्र ज्यांनी हा दासबोध सर्वांगाचे कान करून श्रवण केला, त्यांनी त्याचे सार आपल्यास कळावे म्हणून समर्थांची प्रार्थना केली. या दृष्टीने या श्रीकल्याणांच्या भावना या प्रारंभीच्या ओव्यांतून सहजच साकार झाल्या आहेत.

श्रीकल्याणस्वामी म्हणतात :- प्रतापी सूर्याप्रमाणे आपण करुणाकर पूर्ण ब्रह्मरूप आचार्य असे श्रेष्ठ सद्गुरु आहात. त्या आपणा समर्थांना माझे नमन असो. (१)

श्रीकल्याणस्वामींना जीवमात्रांच्या दृष्टीने नेमके काय म्हणावयाचे आहे की ज्यासाठी पुन: काही विवेचनाची जरुरी आहे, हे स्पष्ट करताना श्रीकल्याणस्वामी खालील ओव्यांतून समर्थांना विनंति करतात.

**जे भवसमुद्री पोळले । विषयमदे अंध जाहले ।**
**चौऱ्यांशीत वाहू लागले । मार्ग सुचेना तयासी ॥२॥**
**ऐसे विश्व बहुत बुडाले । मी जीव म्हणोनी धावू लागले ।**
**मुळीचे स्मरण विसरले । मी कोण ऐसे ॥३॥**
**तयासी मुक्त करावया पूर्ण । तुवा उतरलासी ज्ञानघन ।**
**रोगिया औषधी देऊन । भवमोचन करिसी ॥४॥**

भू म्हणजे होणे; भव म्हणजे झालेले. जे काही अनंत अनंत असे झालेले आहे की जे ठाकठीक करून घेतले, तरच क्षणभर सुख व्हावे, नाहीतर दु:खच पदरी यावे आणि बहुधा असेच व्हावे, या योगाने या भव-समुद्रात जे





पोळले गेले आहेत, विषयांमुळे सुख होण्यापेक्षा त्याचा कैफच जास्त, यामुळे जे सुखाच्या दृष्टीने आंधळेच झाले आहेत; आणि ज्यांना या चौऱ्यांशीच्या प्रवाहात वहातच चालल्यामुळे पुढे रस्ताच सापडत नाही (२); याप्रमाणे विश्वातले सारे जीव ज्या भवसमुद्रात बुडून, ''मी जीव'' या भ्रमाने धावताहेत; आपले मूळ रूप काय आहे व मी कोण आहे, याचा ज्यांना पत्ताच लागत नाही (३); अशा जीवांना पूर्णत: मुक्त करण्यासाठी तू मूर्तिमंत ज्ञानरूपच येथे अवतरलेला आहेस; म्हणून अशा भवरोग्यांना औषधी देऊन त्यांना भवातून मुक्त कर. (४)

**ऐसे औदार्य तुझे सघन । म्हणोनी आलो मी शरण ।**
**दयार्णवा कृपा करून । मज दातारे तारावे ॥५॥**

असे तुझे फार मोठे औदार्य आहे. म्हणून हे दयासागरा, तू कृपा करून, माझा उद्धार कर. (५)

**आपण आपणा ते पावे । ऐसे माझे मनी बोलावे ।**
**ते दातारे गोचर करावे । रोकडे ब्रह्म ॥६॥**

आपले स्वरूपच आपल्याला खरे खुरे जेणे करून प्राप्त होईल ते रोखठोक ब्रह्मस्वरूपच स्वामींनी मला गोचर करावे, असेच मला सांगावेसे वाटते. (६)

**ऐसा शिष्याचा प्रश्न ऐकोनी । ज्ञानाचे भरते आले स्वामीलागोनी ।**
**आसन सोडोनिया तये क्षणी । कडकडोनी भेटले ॥७॥**

असा हा शिष्याचा प्रश्न ऐकून, स्वामींना ज्ञानाचे भरते येऊन, त्याच क्षणी आपले आसन सोडून, श्रीसमर्थ कल्याणस्वामींना अगदी कडकडून भेटले, कल्याणांना आलिंगन दिले. (७)

यापुढे श्रीसमर्थ कल्याणस्वामींना म्हणतात :-

**रे बाळका ऐक निर्धार । तुझा प्रश्न तो वाक्-दोर ।**
**माझे कंठी बैसला साचार । बरे घेई निजवस्तु ॥८॥**

अरे बाळा, तुला निर्धारपूर्वक सांगतो. तुझा प्रश्न हा अगदी वाक्-दोरच असून, तो माझ्या गळ्यालाच लागला आहे. तू अगदी खोचक आणि वेचक असाच प्रश्न केला आहेस; तर ही तू निजवस्तुच घे बरे. आपले निजत्व ऐसे

म्हणजे ज्यावर आपले खरे अस्तित्व आहे असे जे आपले असणेपण आहे, ज्या असणेपणाने काही होणे आणि न होणे, हे दोनी घडते, ती वस्तूच तू घे. (८)

**मग स्नेहाळे नवल केले । वोसंगासी शिष्या घेतले ।**
**अर्धमात्रा रस काढिले । पूर्ण फुंकिले कर्णरंध्री ॥९॥**

मग प्रेमळ सद्गुरुंनी फारच आश्चर्य केले. शिष्याला अगदी जवळ घेऊन, ऊर्ध्वगामी जीवनातील वायुरूपिणी ॐकाराची जी अर्धमातृका आहे, त्यात असणारे रस-रूप जीवन नादाने नादानुसंधान प्राप्त व्हावे असा जो नादरूप कर्ण, त्या रंध्रात हा जीवन रसच ओतला. (९)

**खडतर औषधी दिव्य रसायन । नयनी झोंबले जाऊन ।**
**डोळियाचा डोळा फोडून । चित्सूर्य भेदिले ॥१०॥**

खडतर असा वायुरूप जीवन-रस आकाशाला भिडून शून्याचा शेवट असा जो डोळ्याचा डोळा त्याचा भेद करुन सहस्रदळी असणारा परम प्रकाशरूप जो चित्सूर्य तेथेच दृष्टि तादात्म्य झाली. (१०)

**पूर्ण अंश गगनी भेदिला । अर्क तो पिंडीमाजी उतरला ।**
**त्रिकुट श्रीहाट चुराडा केला । सेखी भरला गगनगर्भी ॥११॥**

पूर्णांशाने आकाशाचा भेद करून, निरशून्य गगनी असणारा चित्सूर्य श्वसनद्वारा पिंडामधे समाविष्ट झाला. आणि उपाधिभूत जीवनाच्या ठिकाणी तादात्म्य होऊन, अनावश्यक भाग बाजूला करून, जीवन सूक्ष्मतर सूक्ष्मतम झाल्याने, मनपवनाचा वारु जेथे स्थिर होतो, त्या आरक्तवर्ण त्रिकूट स्थानाचा व श्वेतवर्ण श्रीहाटाचा भेद करून, चिदंश हा चिदाकाशाचे गाभ्यात स्थिर झाला. (११)

**उग्र तेज लखलखाट । तेथे झाला चौदेहाचा आट ।**
**भ्रांती पडली बळकट । तेव्हा बाळ निचेष्टित पडे ॥१२॥**

उर्ध्वगामी अग्रावर चैतन्याचा लखलखाट चौदेहाच्या आटणीने झाल्यामुळे, यापूर्वी अनुभविले ते खरे, "की आता या स्थितीत अनुभवितो ते खरे" असे काही मनाला चाटून गेल्याने, हा जो बाळ काही हालचाल न करिता, त्या अवस्थेतच पहुडला. श्रीकल्याणांची येथे अशी अवस्था झाली. (१२)





**पाहोनी सद्गुरुनाथ । पद्महस्त मस्तकी ठेवीत ।**
**वत्सा सावध त्वरित । निजरूप पहा आपुले ॥१३॥**

असे पाहून श्रीसमर्थांनी श्रीकल्याणांच्या माथा आपला अमृतहस्त ठेवून सावध केले, आत्मानुसंधानात आणले, व आपले निजस्वरूप पहा, असे सांगितले. (१३)

**जागृत करोनी ते वेळी । अजपाची दोरी देऊनी जवळी ।**
**विहंग डोल्हारी तये वेळी । अलक्ष्य लक्ष्यी बैसविले ॥१४॥**

आत्माराम घोररूपाने प्रगट झाला की प्राणी बिनघोर होतो, परंतु तेथेच जागृतावस्था निर्माण करून, ''सोऽहं हंस:'' हे जे जीवनाचे सूत्र आहे, ते हाती देऊन, व आकाशस्थ करून स्वस्थ झाल्याने, अलक्ष्य हेच तेथे लक्ष्य होऊन राहिले. लक्ष्यात अलक्ष्य झाले की अलक्ष्यात लक्ष हेच त्याचे समीकरण आहे. (१४)

**धैर्याचे आसन बळकट । आणि इंद्रिये ओढुनी सघट ।**
**धरे ऊर्ध्वपंथे वाट नीट । अढळपदी लक्ष लावी ॥१५॥**

तेथे धीरोदात्तपणे कुठल्याही प्रकारची आशाच राहिली नाही, व हीच धारणा बळकट झाल्याने, इंद्रियांचा सहजच निरोध होऊन, ऊर्ध्वगामी जीवन हे अगदी आधारचक्रापासून नीट सहस्रदळी स्थिर होत राहिल्याने, तेथे असणारे जे अढळ स्वरूप की जेथे चंचलत्व रहातच नाही, तेथेच लक्ष्य लावावे. (१५)

**पुढे करोनिया जाणीव । मागे सारोनी नेणीव ।**
**जे जे जाणीव अभिनव । ते तू नव्हेसी दातारा ॥१६॥**

चैतन्याला पुढे दृष्टीसमोर ठेवून, देहाला विसरून, जे ज्ञान जाणीवेमध्ये येईल तेही पण तुझे खरे स्वरूप नव्हे. (१६)

**तै मार्गाची करू नव्हाळी । प्रथम घंटानादाची नवाळी ।**
**दुसरी किंकिणीची मोवाळी । तिसरी अनहत कोल्हाळ ॥१७॥**

चैतन्याला पुढे पहात चालले असताना, त्या मार्गाचा विचार करण्यासारखा आहे. प्रथम सूक्ष्म घंटानादानंतर किंकिणीसारखा सूक्ष्म नाद व नंतर प्रचंड

अनहत म्हणजे संघाताशिवाय होणारा चैतन्याचा ध्वनि होऊ लागतो. (१७)

**आता अग्री लक्ष्य लावी । काय दिसेल ते न्यहाळी ।**
**चंद्रज्योती प्रकाशली । व्यूह बांधिला बळकट ॥१८॥**

आता तू स्थिर बिंदु हा जो तुझा चैतन्यात्मक विषय आहे, तेथेच लक्ष लावून काय दिसेल ते आवर्जून पहात रहा. तेथे चंद्रकला ज्योतिरूप होऊन प्रकाशित झालेली आहे. त्याच्या भोवतीच हा बळकट असा स्थूल दृश्यात्मक व्यूह रचला आहे. (१८)

**ते सुख अंतरी घेऊनी । पुढे चाल करी संगनी ।**
**तेथे विजू ऐसा कामिनी । चमकताती सुवर्णरंग ॥१९॥**

ते सुख अंतर्यामी अनुभवून, तेथे जो ऊर्ध्वगामी जीवनाचा संगम आहे, तेथे उन्मनी अवस्थेत पीतवर्ण विजा चमचम करून लखलखाट होत आहे. (१९)

**तेही जाणोनी मागे सारी । पुढे सूर्यबिंब अवधारी ।**
**ज्वाला निघती परोपरी । डंडळू नको कल्पांती ॥२०॥**

अशाप्रकारचा अनुभव घेऊन, त्याची जाणीवही मागे टाकून, सहस्रदळी जी सूर्यकला आहे, जिला चैतन्याचा प्रकाश प्राप्त झाला आहे, अशाप्रकारचे पूर्ण बिंब तू पहा. त्यात नाना रंगांच्या प्रकाशरूप ज्वाला सारख्या बाहेर पडत आहेत. तेथे कल्पना चालतच नाही. म्हणून कल्पनेचा जरी अंत झाला - म्हणजे कल्पांत झाला - तरी तू अंतराळी होऊ नकोस. तेथे तादात्म्यच होऊन रहा. (२०)

**वायो मुख करोनी तेथे । गिळी वेगे सूर्यकिरणा ते ।**
**मग देखसी आनंद मार्तंडाते । तेजोमय मम पुत्रा ॥२१॥**

श्रीसमर्थ म्हणतात :- अरे पुत्रा कल्याणा, अशा ठिकाणी वायुमुखाने ते सूर्यकिरण वेगाने गिळून, तेजोरूप आनंद-सूर्याचे तू दर्शन घे. यालाच "आनंद ब्रह्म" म्हणतात. (२१)

**अनंत भानुतेज अद्भुत । खदिरांगार ज्वाला उसळत ।**
**धारिष्ट तेथे न भीत । दुर्घट व्यूह तेथीचा ॥२२॥**





अनंत सूर्य लुप्त होतील अशा प्रकारचे आत्मसूर्याचे अद्भुत तेज असून, त्यात अग्निज्वाला सारख्या उसळत आहेत. तेथील व्यूह हा अभेद्य आहे. याचा तेथे अनुभव घेताना तू मुळीच भिऊ नको. (२२)

**तेथे हुशारीचे काम । अग्री लक्ष लावोनि नेम ।**
**तीरे लावोनि सुगम । मागे सारी सूर्याते ॥२३॥**

तेथे खबरदार राहून, त्या बिंदुरूपात लक्ष ठेवण्याचा नेम करून, त्याचेही सहजत्वाने तीर गाढून, सूर्यकलेचा ग्रास करून, तू परतीराला जा आणि परपार हो. (२३)

**पुढे दिसेल जे नवल । ते पाही हंस मेळ ।**
**चंद्रकिरण शीतळ । पाहसी तू मम वत्सा ॥२४॥**

औटपीठ जे सहस्रदळ स्थान आहे, जेथे ऋषिमुनि तादात्म्य झाले आहेत, अशा सप्तर्षी-मंडळ स्थानात ''हंस'' स्वरूपाचा अनुभव घेऊन, त्यातील चंद्रामृत जे अति शांत आहे त्याचे तू दृष्टीने प्राशन कर. (२४)

**तेव्हा मागील दाह शमेल । शीतलाई सर्वांग होईल ।**
**चंद्राची प्रभा सुढाळ । फडफडीत चांदणे ॥२५॥**

येथे देहात्मतेने मागील झालेला त्रिविध ताप नाहीसा होऊन, सर्व अंगच शीतळ होईल. चंद्रप्रभा आणि चांदणे दिसू लागेल. (२५)

**तोचि डोळियाचा डोळा पाही । देहातील वर्म विदेही ।**
**चिन्मय सुखाची नवलाई । भोगी आपुले की गा ॥२६॥**

हाच डोळ्यांचा डोळा असून, देहातीत विदेहीपणाचे खरे वर्म येथेच असल्याने, आपल्या चैतन्यसुखाच्या नवलाईचा तू अनुभव घे. (२६)

**अनुभवाची शीग भरली । अग्रापरी उसळली ।**
**भूमंडळी प्रभा पडली । कर्पूरवर्ण नभ जाले ॥२७॥**

असा अनुभव पराकाष्ठेला गेला की चैतन्यप्रभा एकसारखी उसळू लागते. यानेच देहावर कांति निर्माण झाली असून, भूमंडळी हीच प्रभा पसरली आहे व आकाश हे कापरासारखे दिसू लागले आहे. (२७)

**तया मध्यभागी सघन । अढळपद दैदीप्यमान ।**

**उर्वरित ब्रह्म जाण । ध्रुव बैसला अढळ ते ॥२८॥**

त्याच्या मध्यभागी देदीप्यमान तेज:पुंज अढळपद असून, त्यालाच ब्रह्म ही संज्ञा आहे. तेथेच अढळपणाने अचल स्थिति अनुभवाला येते. ध्रुव येथेच अढळ पदावर बसला आहे. (२८)

**ते तुझे स्वरूप नेटे बोटे । जेथे समस्त जाणणे आटे ।**
**ऐके जालासी धिटे । बळकटपणे बलाढ्य ॥२९॥**

जेथे सर्व जाणीवच नाहीशी होते, ते तुझे खरे स्वरूप असून, खंबीरतेने तू तेथे बलाढ्य होऊनच राहिला आहेस. (२९)

**ऐसे सुख योगिया लाधले । तेव्हा देहाचे मरण गेले ।**
**सांगणे ऐकणे मुराले । एकत्वपणे एकचि ॥३०॥**

असे सुख जेव्हा योग्याला प्राप्त झाले, वियोग नाहीच असा चैतन्य-योग ज्याने साधला, तेव्हा सांगणे आणि ऐकणे .हे तेथे उरेलच कसे ? तेथे एकपणाने एकच शिल्लक राहिले आहे; यालाच 'एकमेवाद्वितीयं' असे म्हणतात. (३०)

**शांती येवोनी माळ घाली । अलक्ष्य सेजे निजली ।**
**हंसपदे ऐक्य जाली । सुख सुखाते निमग्न ॥३१॥**

अलक्ष्य स्थानी निजत्वात आलेली शांतिच जेथे येऊन अशा जीवाला माळ घालते. तेथे अहं स: या पदांचे ऐक्य होऊन सुख सुखालाच भेटून निमग्नता प्राप्त होते. (३१)

**तेथील अनुभव घेऊनी । स्वानुभव पाहे कलटुनी ।**
**आला मार्ग ते क्षणी । दिसेनासी जाला की ॥३२॥**

तेथील अनुभव घेऊन, जीवनाला कलाटणी मिळाल्याने, कुठल्या मार्गाने आपण आलो, हे त्या क्षणाला कळण्यासारखीही स्थिति राहिली नाही. (३२)

**त्रिकूट श्रीहाट गोल्हाट । बुडाले ते औटपीठ ।**
**इडा पिंगला सुषुम्ना तट । विराले ते स्वात्मसुखे ॥३३॥**

त्रिकूट, श्रीहाट, गोल्हाट, औटपीठ हे आणि इडा, पिंगला, सुषुम्ना या स्वात्मानंदात विरून गेल्या. (३३)





**स्थूल सूक्ष्म कारण । नेणो काय जाले महाकारण ।**
**इंद्रिये चुबकली जाण । धाव मोडली तयांची ॥३४॥**

स्थूल, सूक्ष्म, कारण आणि महाकारण देहांचे येथे काय झाले हे कळलेच नाही. आणि धावाधाव करणारी इंद्रिये पण स्वस्थच झाली. (३४)

**पंचभूतांचे खवले । तयांचे ठावचि पुसले ।**
**अपरमित आनंदले । निमग्न जाले सुखात ॥३५॥**

पंचमहाभूतात्मक दृश्याचा येथे ठावठिकाणाच राहिला नाही, आणि अप्रमाण आनंद होऊन, सुखात निमग्न होऊनच राहिले. (३५)

**सखोल भूमिके ऐसे आले । सुख सुखासी घोटले ।**
**स्वये आत्मरूप प्रगटले । माझे देही रोकडे ॥३६॥**

अशी स्थिति झाल्याने, येथे श्रीकल्याणस्वामींनी श्रीसमर्थांना पावतीच दिली आहे. ते म्हणतात :- या परमार्थाच्या सखोल अशा भूमिकेने सुख हे सुखाला भेदून माझ्या शरीरात आत्मतत्त्वाची रोखठोक प्रचीतीच आली. (३६)

**मग सहज समाधि जिरवून । शिष्य उठला घाबरा होऊन ।**
**हे सद्गुरूचे देणे । काय उत्तीर्ण म्या व्हावे ॥३७॥**

मग सहज समाधि अवस्थेतून उत्थान झाल्यावर, शिष्य घाबरा होऊनच उठला, व हे सद्गुरूंचे जे देणे आहे त्याचे उतराई कसे व्हावे, असे म्हणू लागला. (३७)

**जरी स्तुती तयाची करावी । माझी मती नाही बरवी ।**
**अनिर्वाच गती बोलावी । परा वाचा कुंठित ॥३८॥**

जर त्या महात्म्याची स्तुति करावीच म्हटले तर माझी तशी तल्लख बुद्धीच नाही. ती एक अनिर्वाच्य गति आहे असे म्हणावे तर परा वाचा कुंठितच होत आहे. (३८)

**आता जी मी लडिवाळपणे । तुमचे कृपेने करितो स्तवन ।**
**सूर्यापुढे खद्योत जाण । तैशापरी बोल हे ॥३९॥**

आता जी मी लाडकेपणाने तुमची स्तुति करीत आहे, हे बोलणे म्हणजे सूर्याला काजव्याने दाखवण्यासारखेच आहे. (३९)

**जय जयाजी करुणासिंधु । जय जयाजी भवरोगवैदु ।**
**जय जयाजी बाळबोधु । कृपाघना समर्था ॥४०॥**

हे करुणासमुद्रा, हे भवरोगवैद्या, अगदी सोप्या भाषेत बोध करणाऱ्या कृपाघन श्रीसमर्था, आपला जयजयकार असो. (४०)

**जय जयाजी अविनाशा । जय जयाजी परेशा ।**
**जयजयाजी अध्यक्षा । दयार्णवा ॥४१॥**

हे अविनाश-रूपा, परेशा, अध्यक्षा, दयासागरा, तुझा जयजयकार असो. (४१)

**जय जयाजी पूर्णचंद्रा । जय जयाजी अलक्ष्य-विहारा ।**
**जय जयाजी भवसिंधू भास्करा । आनंद प्रभु ॥४२॥**

हे परिपूर्ण चंद्रा, अलक्ष्यस्वरूपी विहार करणाऱ्या समर्था, आनंदाचे धणी, भवसिंधूतून परपार करण्याचे सामर्थ्य ज्याचे आहे अशा श्रीसूर्यनारायणा, आपला जयजयकार असो. (४२)

**तुझी स्तुती करिता सांग । वेद स्तुती जाले अव्यंग ।**
**तेथे प्राकृतासी काग । वर्णावया योग्य नव्हे ॥४३॥**

आपली यथासांग स्तुति करताना, वेदंही तोकडे पडतात, त्या ठिकाणी मी प्राकृत सामान्य जीव आपले वर्णन करण्यास योग्य नाही हेच खरे. (४३)

**कल्याण म्हणे जी श्रीरामदासा । माझा मुकेपणाचा ठसा ।**
**ते मोडोनी वसोसा । मज आपण ऐसे केले ॥४४॥**

माझे मुकेपण मोडून तुम्ही मला आपल्यासारखे केले, असे श्रीकल्याणस्वामींनी श्रीसमर्थांना या ठिकाणी म्हटले आहे. श्रीसमर्थांनी कल्याणांना साममय केले, असा म्हणण्याचा येथे भावार्थ आहे. (४४)

**ऐकोन मृदु वचन । कुर्वाळले तयालागून ।**
**गुरुशिष्य हे बोलणे । उरले नाही ते वेळी ॥४५॥**

हे अंतःकरणाचे कोमल बोल श्रीसमर्थांनी ऐकले मात्र गुरुशिष्य ही भाषाच तेथे राहिली नाही. (४५)





**एकपणे एकचि जाले । ऐक्यरूपी सम मिळाले ।**
**करूनिया सुख उसळले । नाहीपण जाऊनी ॥४६॥**

समत्वाने ऐक्य होऊन, एकपणाने एकच जाहल्याने, नास्तिभाव नाहीसा होऊन चित्सुख हे उफाळूनच आले. (४६)

**सुगरणीचा पाक जाहला । नभा भाजनी वाढिला ।**
**अलक्ष्यपदी सुगरावला । संत जेविती स्वानंदे ॥४७॥**

सुगरणीने चांगला स्वयंपाक करून, तो आकाशाच्या ताटात वाढला, व अलक्ष्यपदी त्याचा आस्वाद संतजनांनी मनमुराद घेतला. (४७)

**अनिर्वाच्य बोल बोलिले । साधकाचे उपेगा आले ।**
**सिद्ध तरी डोलो लागले । बद्ध मुमुक्षु होताती ॥४८॥**

हे समर्थांचे अनिर्वाच्य बोल शब्दांकित झाल्याने, साधकांच्या उपयोगी आले. हे ऐकून सिद्ध पुरुष तर डोलूच लागले. आणि याच्या श्रवणाने बद्धांना मुमुक्षुत्व प्राप्त झाले. (४८)

**यापरते आन नाही बोलणे । श्रीराम दाशरथीची आण ।**
**एकपत्नी तो सुजाण । आपुले पद दे दासा ॥४९॥**

दाशरथी रामाची शपथ घेऊन सांगतो. यापेक्षा आता बोलावयास काही राहिलेच नाही. तो एकपत्नी सर्वांचा जाणता असून, आपले पदीच अनिर्वाच्य स्थितीत दासाला स्थानापन्न करतो. (४९)

**इतिश्री दासबोध ग्रंथ । त्यातील हा सोलीव अर्थ ।**
**श्रोते ऐकला यथार्थ । समाधिस्थ होती ॥५०॥**

असा हा श्रीदासबोध ग्रंथ असून, त्यातील सोलीव गाभ्यासारख्या हा गूढार्थ ऐकून, श्रोते तरी समाधि अवस्थेतच तादात्म्य होऊन रहातात. (५०)

**॥ गद्य अर्थासह सोलीव सुख समाप्त ॥**

---

(या श्रीसमर्थ-कल्याणांच्या संवादावरून या ग्रंथाचे महत्त्व साहजिकच स्पष्ट होत आहे. श्रीदासबोधाचा सोलीव अर्थ

श्रीकल्याणस्वामींच्या प्रश्नावरून, त्यांनाच निमित्त करून, श्रीसमर्थांनी येथे प्रगट केला आहे. यातील रहस्य जर आपण गुरुकृपेने जाणून घेतले, तर श्रीदासबोध ग्रंथ आलोडन करणे सुलभ होईल, हे निश्चितच आहे.

आमचे चिमड संप्रदायातील कळस झालेले, सांगलीचे भगवान् श्रीसद्गुरु श्रीहणमंतरावजी ऊर्फ श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस यांचे, व त्यांचे शिष्य माझे वडिल ती. प. पू. श्री बापूरावजी केळकर यांच्या वाचनात हा ग्रंथ होता. अनेक संतसज्जन याचे पठण करतात. या दृष्टीने याचे मनन होणे हे अगत्याचे आहे, असे मन:पूर्वक वाटते).

***



# विभाग ३

## गद्य

(स्वतंत्र लेख)

# सोऽहं तत्त्वज्ञान

आणि

# आत्मविज्ञान

# सोऽहं तत्त्व-ज्ञान

सिद्धचरित्र हा परमपावन अपूर्व असा ग्रंथ आहे. कित्येक साधक या ग्रंथाचे भक्तिभावे पठण करीत असतात. स्वामी स्वरूपानंद यांची परंपरा श्रीमच्छेंद्रनाथापासून अधिकाराने चालत आहे. त्यातील सिद्धपुरुषांची पावन चरित्रे आणि त्याच ओघाने परंपरेचे तत्त्वज्ञान गंगौघाप्रमाणे अखंड वाहत असताना पुन: पुन: वाचत रहावे असेच वाटत राहते, मनाची तृप्ति होते. आणि कितीही वाचले तरी या ग्रंथाची गोडी अवीटच राहते. अखंड वाचन आणि अखंड तृप्ति असा अनुभव देणारा हा अखंड अमर ग्रंथ आहे.

या संदर्भात सोऽहं तत्त्वज्ञान लिहिण्याची संधि माझे परमप्रिय परमगुरुभक्तिपरायण श्री. द. अ. किर्लोस्कर यांनी मला प्राप्त करून दिली; हे माझे परम भाग्य मला माझ्या वाडवडिलांच्या पुण्याईने लाभले आहे, असे मला वाटते. '' तुका म्हणे मज घडो त्यांची सेवा । तरी माझ्या दैवा पार नाही '', या श्रीतुकोबा उपनिषदाचा साक्षात्कार येथे घडतो.

श्री. द. अ. किर्लोस्कर यांचे वडिल याच परंपरेतील महान् सिद्धपुरुष होते. साक्षात दत्तगुरुच ते. 'श्रीदत्तगुरु' या महामंत्राने त्यांनी अनेकांना संकटातून मुक्त केले आहे, असा त्यांचा अधिकार. श्री दत्तोपंत हे या महापुरुषांचे चिरंजीव. '' आत्मा वै पुत्रनामासि '' हे श्रुतिवचन सार्थ करून दाखवणारे, त्यांचाच अनुग्रह लाभलेले असे भाग्यवान. असे भाग्य क्वचित्च लाभते. चेहराही अगदी वडिलांच्या सारखा, दृष्टीतील तेजही तसेच, तोच बाणेदारपणा, तीच वृत्ति, तीच भक्ति, सारे काही तेच. त्यांना पाहिले की श्रीकिर्लोस्करमहाराज डोळ्यासमोर उभे रहातात. त्यांनी हे सिद्धचरित्र संपादिले आहे. त्याची गोडी अवीट आणि महत्त्व हे त्रिकालाबाधित आहे. म्हणून सोऽहं तत्त्वज्ञानाच्या दृष्टीने पूर्वकालीन संतांची या विषयावरील थोडी पार्श्वभूमि घेऊन त्याचा परामर्ष घ्यावा असे येथे योजिले आहे.

सोऽहंचा संपूर्ण आविष्कार आणि साक्षात्कार म्हणजेच हे सिद्ध चरित्र आहे.ज्या महापुरुषांचे हे भव्य, दिव्य आणि उदात्त असे चरित्र आहे ते सारे सोऽहं सिद्ध पुरुष आहेत. सोऽहं पुरुषाचे चरित्र हे सोऽहं चरित्रच

खरे, असे मला परमपूज्य स्वामी स्वरूपानंदांनी सांगितले आहे आणि ते वाक्य तर माझ्या हृदयात कोरले गेले आहे. तात्पर्य हे सिद्ध चरित्र म्हणजे सोऽहं चरित्रगाथाच आहे. हे सारे विश्व सोऽहं विश्व आहे, हे दाखवणारे महात्मे सोऽहं गुरु आहेत. सोऽहं गुरुनी कृपा केली तर ज्या स्वरूपाचे आकलन होते, ते सोऽहं स्वरूप आहे. ज्या साधनेने ते प्रत्ययाला येते, ती सोऽहं साधना आहे. सोऽहं ध्यान ही सोऽहं साधना आहे. येथे सोऽहं भाव जागृत होतो. या सिद्धांचा उपदेश तो सोऽहं हाच आहे. येथे सोऽहं ब्रह्म अनुभवास येते. सोऽहं ज्योतीचे दर्शन घडते. ज्या समाधि अवस्थेत हे महात्मे रहातात ती सोऽहं समाधि आहे. तात्पर्य सोऽहं शिवाय येथे दुसरी भाषाच नाही. सोऽहं हा सिद्धमंत्र आहे. हा अनुभव मागे अनेक संतांनी अनेक प्रकारे घेतला आहे.

'' सोऽहं हंस: '' या एकाच साधनेने हे सारे थोर महात्मे परमहंस झाले आहेत. सोऽहं गायत्री हा तर साऱ्या परमार्थाचा गाभा आहे. हा गाभा साऱ्या तत्त्ववेत्यांच्या तत्त्वज्ञानाचा गाभा असून भौतिक ज्ञानाच्याही कसोटीवर तो घासून त्याचा पडताळा कोणीही घ्यावा, इतका तो मौलिक आहे. या सोऽहं मध्येच ब्रह्म-माया, शिव-शक्ति, पुरुष-प्रकृति, चैतन्य-जड, अध्यात्म-आधिभौतिक दडलेले आहे. आणि यावर प्रकाशाचा झोत प्राचीन संतांनी टाकला आहे. म्हणून हा सारा विषय प्रकाशात येणे अत्यावश्यक आहे. आपण प्रकाशात आलो, तर अंधार हा राहणारच नाही.

सोऽहं तत्त्व स्वयंसिद्ध, स्वयंपूर्ण, स्वयंचलित, स्वसंवेद्य, स्वयंतंत्र असे असल्याने कुठल्याही कालखंडात त्याचेच महत्त्व आहे. सर्व विश्व यातूनच निर्माण झाले; त्याची स्थिति आणि लय यातच होत असतो. कळत वा नकळत सर्वांची खेच तेथेच आहे. आपण सारे एकाच ठिकाणाहून आलो आणि आपल्याला एकाच ठिकाणी जावे लागणार हे निश्चित आहे. या दृष्टीने आपण सारे एकच कसे आहोत, हे खऱ्या अर्थाने समजले, तर एकावाचून येथे दुसरे काही नाहीच, हे ज्ञान निश्चित प्राप्त होते. आणि मग आत्मविश्वास, आत्मसमाधान, आत्मतृप्ति, आत्मसाक्षात्कार आत्मज्ञानाने घडतो. म्हणून आत्मज्ञान हेच खरे तत्त्वज्ञान आहे. येथे आत्मा देखील सोऽहं हेच आपणास दिसून येईल. सोऽहं आत्मा हाच सर्व ज्ञानाचा आत्मा





आहे आणि म्हणून आत्म्यामुळे ज्ञान आहे. '' नायमात्मा बलहीनेन लभ्य:'' हे श्रुतिवचन तर स्पष्टच आहे. आत्मबलाने जो बलिष्ठ झाला त्याला आत्मप्रत्यय येतो. ''येथे प्रत्ययोचि प्रमाण प्रत्ययो पहावा,'' हेच खरे. दृश्य नव्हे तो आत्मा, आणि आत्मा नव्हे ते दृश्य.

हे सारे विचित्र असणारे चित्रमय जगत् हे चिन्मय, चैतन्यमय आहे. यात चैतन्याशिवाय दुसरे काही नाहीच. चैतन्याची ओळख नाही, म्हणूनच केवळ जड बुद्धीने आपण याला जड म्हणतो. पण हा जड शब्द आपण जो वापरतो तोही चैतन्याचे अभावी वापरता येणार नाही. दृश्यातील कोणताही पदार्थ स्पंदाशिवाय नाही. श्वसनाशिवाय स्पंद नाही. जीवाशिवाय श्वसन नाही. म्हणजे निर्जीव असे काहीच नाही. याचा अर्थच असा की हे सारे चैतन्य आहे म्हणजे जड नाहीच. चैतन्य अंशभूत झाले की त्याला आपण जड म्हणतो व जड हे अंशभूत झाले की चैतन्याचा साक्षात्कार होतो.

सोऽहं स्मरणाचा एक तंतु आहे. म्हणून सोऽहं स्मरण हे महत्त्वाचे आहे. '' एकचि तंतू सोऽहं स्मरणाचा । वाजतो जैसा चंग '', असे श्री रंगनाथ स्वामी म्हणतात. हा तंतु नाभीचे मूळ जे आधारचक्र आहे, तेथून सहस्रदलापर्यंत जाऊन पोचला आहे. तेथेच तो निवांत, स्थिर असा होतो. '' आधारी नाभी मुळी तीही एकचि तंतू । सहस्रदलावरी स्थीर राहे निवांतु'' असे श्रीमुकुंदराय यांनी स्पष्टपणे सांगितले आहे. या सोऽहं स्मरणाने भक्ति दृढ होते. श्रीनिवृत्तिनाथांनी आपल्या एका पदात अध्यात्म दृष्टीने बागेचे सुंदर वर्णन केले आहे. त्यात सोऽहं भक्तीचा निर्देश आहे. ते म्हणतात '' गुरुरायाने नवलाव केला । देही अपूर्व बाग दाविला ॥ ध्रु ॥ यया बागेचे नवल सांगू काई । साडे तीन चाहुर बाग शाही । त्यात पेरीली पंचरंगी जाई । धन्य कर्त्याची कारागिरी बाई ॥ १ ॥ तया बागेमध्ये एक असे विहीर । मोट सत्रावी वाहे निरंतर ॥ मन पवनाचे लावूनीया दोर । सोऽहं भक्तीचे बळ असे फार ॥ २ ॥''. ही अपूर्व अशी बाग देहामध्ये आहे. अपूर्व म्हणजे पुढे कधी न दिसणारी. मागे वळून पहाताच प्रत्ययास येणारी आहे. साडेतीन हात आपला देह असल्याने ही साडेतीन चाहुर बाग आहे. त्यात पंच प्राणांची पंचरंगी जाई पेरली आहे. ती जाई म्हणजे

राहणारी नसून जाणारी असल्याने ती ''जाई'' आहे. अशी ही परमात्म्याची मोठीच कारागिरी आहे. त्यात एक विहीर असून सत्राव्या जीवनकळेची मोट सारखी वहात आहे. याला मनपवनाचे दोर लावलेले असून येथे निर्माण होणारे सोऽहं भक्तीचे बळ अपार आहे. या सोऽहं भक्तीने संपन्न असणाऱ्या श्रीमुक्ताबाई श्रीज्ञानेश्वरमहाराजांना प्रश्न करतात. '' सोहंमासी दृष्टी कैसी ठेवू''आणि''कैसी करु दादा सोऽहंमासी गोष्टी । नासाग्रीही दृष्टी कैसी ठेवू ?'' म्हणजे येथे आता सोऽहं शिवाय दुसरी कोणती गोष्टच न राहिल्याने नासाग्री सोऽहं दृष्टि कशी ठेवावी, ही विचारणा श्रीमुक्ताबाईनी केली आहे. सोऽहं दृष्टीला सोऽहं स्वरूप दिसते; ही दृष्टीच वेगळी. ही दृष्टि मुक्ताबाईना असल्याने त्यांनी नाजूक प्रश्न केला आहे. श्रीज्ञानेश्वरांची सनद ही या दृष्टीने फार महत्त्वाची आहे. संतांनी हा सोऽहंचा एकच विषय प्रत्यक्ष कसा हाताळला आहे आणि त्या अनुभवाने ते कोणत्या अवस्थेत गेले आणि त्यांनी हे तत्त्वज्ञान जगापुढे ठेवले, आणि वाचा आणि मन या पलीकडे असलेले वाङ्मय जगाला दिले हे महत्वाचे आहे. '' मनवाचातीत तुझे हे स्वरूप । म्हणोनीया माप भक्ती केले'', हा श्रीतुकाराममहाराज यांचा विचार येथे अत्यंत महत्त्वाचा आहे. सोऽहं हा शब्दच अवाङ्मय आहे आणि म्हणून ते ज्ञानही मन आणि वाचा यांच्या पलीकडे संपादन करावे लागते, '' तो शब्द अवाङ्मय तो मी तो मी ऐसा'', असे सुप्रसिद्ध पंचदशीकार वेदांती श्रीबाबा गर्दे यांनी एका ठिकाणी म्हटले आहे. हे सूत्रही या तत्त्वज्ञानाचे महत्त्व दाखवणारे आहे.

परमात्मा हा हंसरूपानेच नटलेला आहे. तिकडे आपली दृष्टी गेली पाहिजे. श्रीज्ञानेश्वरमहाराज उत्तरगीतेच्या टीकेत लिहितात :- ''अगा सर्वा जीवांचे शरीरी । परमात्म हंस पदाची थोरी । अखंड असतसे गोचरी । परी नेणती अज्ञान''॥ सर्व जीवमात्राच्या ठिकाणी हंसरूप अखंड गोचर होत आहे. अनाहत रूपाने ते सतत नादब्रह्म उसळत राहिले आहे. याचे अनुसंधान हेच नादानुसंधान किंवा आत्मानुसंधान होय. पण या अवस्थेत कोण असते असा प्रश्न आहे. ''सोऽहं सोऽहं चौदा चक्रे दावी अनुहत । नि:शब्दासी ठाव नाही कैचा गहिनानाथ'', असा श्रीगहिनीनाथांनी येथे नाथपंथातील एक गौप्य स्फोट केलेला आहे. या ठिकाणी जी वृत्ति उठेल





तिला अनुवृत्ति म्हणतात; यावर प्राणवृत्तीचे विचरण होत असते. त्यात असणारी गति हाच प्राण असून त्याला आत्मा अशी श्रुतींनी संज्ञा दिली आहे. ''प्राण एव आत्मा'', हेच ते सूत्र आहे. श्रीनाथमहाराज म्हणतात ''सोऽहं हंसाच्या अनुवृत्ती । ज्यांच्या प्राणवृत्ती विचरती ॥ तद्गत प्राण त्याते म्हणती । हे योगस्थिती अतिगुह्य.'' हा जो हंस आहे, यावर आत्मारामाचा साक्षात्कार होत असतो. आमचे भगवान् श्रीसद्गुरु श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस आपल्या एका पदात म्हणतात :- ''हंसावरती राम बैसुनी चालिले हो पुढती । हंस कसा बघ उड्डाण करितो खाली आणि वरती''. या हंसाचे रात्रंदिवस उड्डाण चालूच आहे. त्याला खळ नाही. ही हंसगति अतर्क्य आहे. प्राणी झोपी गेला, तरी हा हंस आपली निजस्थिति सोडत नाही. चिदाकाशातील मुक्तांच्या माळा हा हाती आणून देतो. यात तारे चमकतात व नाना रंगांच्या ज्योतींचा साक्षात्कार होतो. डोळे झाकून पाहिले तर याचा अनुभव गुरुकृपेने येतो. हे त्या महात्म्यानी स्वानुभवाने सांगितले आहे. याला फार मोठे महत्त्व आहे. हा सारा विषय पहाता आमचा चिमड संप्रदाय आणि सिद्ध चरित्रातील नाथ संप्रदाय हे दोन्ही एकच असल्याची खात्री होते. या हंसाकडे लक्ष जात नाही, हीच खरी मोठी चूक असल्याने जीवाला आत्मसाक्षात्कार होत नाही.'' बहुत दिवस चुकले सखे ग बहुत दिवस चुकले । राजहंस पाखरू माझे मजला सापडले ॥ बसुनी एकांती पाहू सखे ग बसुनी एकांती पाहू । उडोनी जाईल म्हणूनी तयासी डोळ्यात साठवूनी ठेवू ॥ घडोघडी अनुभव घेऊ सखे ग घडोघडी अनुभव घेऊ । ज्याचे सुख त्याने भोगावे नये दुसऱ्याला देऊ'', हे श्रीमहिपतींचे वचन येथे मोठे चिंतनीय आहे. या स्वरूपाचा योग येणे हाच येथे महत्त्वाचा भाग आहे. राजविद्या राजगुह्य ते हेच.'' जीवा शिवाचा संयोग । हाचि माझा राजयोग'' असे स्वामी स्वरूपानंद याच दृष्टीने म्हणतात. हे सोऽहं स्वरूप सद्गुरुवांचून कळत नाही. गुरुचरणाच्या उपासनेने जीवन उजळून निघते, कृतार्थ होते. '' सोऽहं स्वरूप ते जाण । न कळे सद्गुरुवाचून '', असे श्रीतुकाराम महाराज म्हणतात आणि '' गुण निर्गुण आटले । सोऽहं रूप जे मिळाले '' असा निर्वाळा देतात. येथे सर्व वृत्तींचे मौन होते. '' नामी रूप ते बिंबले । सर्व वृत्ती मौनावले'', हे श्रीतुकाराम महाराज यांचे वचन चिंतनीय आहे. सोऽहं

रूप हेच आत्मरूप आहे. '' सोऽहं आत्मा स्वानंदघन । अजन्मा तो तूचि जाण॥''. सोऽहं हा स्वानंदघन असा अजन्मा आत्मा आहे. त्याच्यामुळेच प्राणिमात्र जन्म घेतात. त्यांना प्रकर्षाने अस्तित्वाची व दृश्याची जाणीव होते.''जव या वायुचा प्रकाशु । तव या भांडियाचा विश्वासु ॥ वायु निघोनिया गेला तव तो झाला उदासु रया''. वायूमुळे देहाची, दृश्याची, अस्तित्वाची जाणीव व जाणीवेने ज्ञान होते. तो निघून गेला तर ग्रंथ आटोपलाच. या ठिकाणी प्राप्त होणाऱ्या समाधि अवस्थेचे ध्यान चार वेद, सहा शास्त्रे करतात. '' चार सहा करती ध्यान । सोऽहं समाधी लागून'', ही श्रीतुकोक्ति चिंतन करावी इतकी रहस्यमय आहे. सद्गुरु प्रसन्न झाले म्हणजे सोऽहं ब्रह्माचा साक्षात्कार सोऽहं भाव जागृत झाल्यावर घडतो. ''सोऽहं तोचि सद्गुरुराव । त्याचे चरणी माझा भाव ॥ सोऽहं ब्रह्म विटेवरी । बरवे शोधावे अंतरी'', असे भागवतधर्माचे कळस श्रीतुकाराममहाराज यांनी स्पष्ट केले आहे. येथे भाव तोही सोऽहं भाव, हे ध्यानात घेणेसारखे आहे. '' जैं सोऽहं भाव प्रतीती '' तैं शरीर भाव नासती । इंद्रिये विषय विसरती ॥ । प्रगट होय,'' इतके याचे महत्त्व श्रीज्ञानेश्वरमहाराज यांनी स्पष्ट केले आहे. सोऽहं भावाने गुरु सर्वत्र व्याप्त आहेत. '' सोऽहं भावे मुकुंदरायी। भरला निजगुरु सर्वा ठायी'', असे श्रीमुकुंदराज यांचे वचनावरुन अभिप्रेत होते. या साधनेने, अभ्यासाने चारी वाचां कुंठित झाल्या की सोऽहं ज्योति प्रगट होते. ''चारी वाचा कुंठित झाली । सोऽहं ज्योती प्रकाशली''. संतांच्या उपदेशाचे सार एकच '' ॐ सोऽहं हंस:.''ज्ञानदेव मुक्ताईशी त्रिधा उपदेशी । ओहं कोहं सोऽहं साक्षी केले'', असे श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात तर ''प्रणववाचक श्वासोच्छ्वास। तोचि तारक उपदेश'', असे श्रीतुकाराममहाराज स्पष्ट करतात. आणि याचे सर्व श्रेय '' परि हे गुरुकृपेचे देणे '' असे सांगूनच थांबतात. '' स्वामी म्हणे माझे कृतार्थ जीवन । सद्गुरुचरण उपासिता'', हे श्रीस्वामी स्वरूपानंदांचे वचन या सर्व विवेचनाचा निष्कर्ष आहे.

श्रीरेवणसिद्ध, श्रीमरुळसिद्ध, श्रीकाडसिद्ध व श्रीहालसिद्ध यांच्यापासून चालत आलेल्या भगवान् श्रीसद्गुरु श्रीनिंबरगीकरमहाराज यांच्या परंपरेतील आमच्या चिमड संप्रदायात प्राणोपासनेचेच खरे महत्त्व





आहे. या दृष्टीने '' अहं अहं स: । गुरु पादुका या महा'', या शब्दांत माझे परमपूज्य पितृदेव श्रीमामा केळकर यांनी स्वानुभवाने आपल्या अभंगात निर्दिष्ट केले. त्या परमश्रेष्ठ पवनात्मज सोऽहं स्वरूप श्रीगुरुपादुकांना अनेक प्रणाम करुन या लेखणीस येथेच विराम देत आहे.

॥ सोऽहं तत्त्वज्ञान समाप्त ॥

* * *

# आत्मविज्ञान

अर्थात्

॥ सर्व ब्रह्म ते नि:शब्द । भेदाभेद चिदानंद ॥

आजपर्यंत शरीरविज्ञान, पदार्थविज्ञान यासारखे अनेक ग्रंथ बाहेर पडले आहेत. ज्याप्रमाणे शरीरविज्ञान, पदार्थविज्ञान ही शोधपूर्णरीत्या अभ्यासलेली शास्त्रे आहेत, त्याप्रमाणे आत्मविज्ञान हे भरतभूमीतील साधुसंतांनी अभ्यासपूर्ण संशोधन करून, परिपूर्ण विकसित केलेले सखोल शास्त्र आहे. अमृताच्या सागरात कितीही बुड्या मारल्या असता, मनुष्य गटंगळ्या खाऊन बुडून मरण्याची मुळीच भीति नसते तर तो अमरच होऊन जातो व कितीही बुड्या मारून अमृत प्राशन केले, तरी ते गोडीला अवीट असून, त्याचे अनंतत्व हे अमर्याद असल्याने दृष्टीच्या टप्प्यात येऊच शकत नाही, तद्वत् आत्मविज्ञानाचा जसा अधिकाधिक अभ्यास करावा तसे परिपूर्ण समाधान पटीपटीने वाढत जाते. त्याची एकदा का गोडी लागली की मनुष्य तद्विषयापासून परावृत्त होऊच शकत नाही. आणि जसजसा सखोल अभ्यास करावा तसतसे त्याचे विशालपण बुद्धीला पटत जाते.

शरीरविज्ञान हे शरीराचे ज्ञान करून देते. पदार्थविज्ञान हे पदार्थशास्त्राचे ज्ञान करून देते. तसेच आत्मविज्ञान हे आत्म्यासंबंधाने ज्ञान करून देते. आत्मा हा द्रष्टा असून, तो दृश्य स्वरूपाला पहाणारा, दृश्यांतील सर्व नाद श्रवण करणारा, दृश्यातील सर्व परिमळांचा सुगंध घेणारा, मुखाने सर्व शब्दजात प्रगट करून, अन्न भक्षण करून, शरीरातील सर्व घाण बाहेर टाकणारा, मन-चित्त-बुद्धि यांना जाणणारा, प्रेरक रूपाने प्रेरणा उत्पन्न करून अंत:प्रेरणा व बहि:प्रेरणा यांना जाणणारा, त्वक्-रूपाने स्पर्श जाणणारा, साक्षिरूप असून, दृश्यादृश्यापासून वेगळा आहे. आत्मा दृश्यादृश्याला जाणू शकतो. आत्म्याला कोणचेही तत्त्व जाणू शकत नाही. आत्मा सर्वव्यापी असूनही आत्म्यापर्यंत कोणचेही तत्त्व जाऊन पोहचू शकत नाही. आत्मा हा सर्वव्यापी, दृश्यादृश्यादि आणि शब्दाशब्दादि तत्त्व-गुणात्मक द्वंद्वांना जाणणारा द्रष्टा असल्याने





दृश्यादृश्यापासून निराळा असलेला आत्मा हा पूर्णत्वाने नि:शब्द आहे, व त्या ठिकाणी उत्पन्न झालेल्या चंचळत्वाने सर्व गुणतत्त्वात्मक शब्दरूप उत्पन्न झाले आहे आणि आकाशतत्त्वाचे ठिकाणी दृश्यरूप प्रचीतीस येत आहे. अर्थात् सर्व तत्त्वे ही शब्दरूप असल्याने म्हणजे ज्याचा अनुभव शब्दांत येतो म्हणजे ' शब्द जो राहिला नादाते गिळोन ' या स्थितीत येतो, व ज्या तत्त्वांचा उगम या वर उल्लेखिलेल्या शब्दस्थितीत आहे, अशा ठिकाणी सर्व तत्त्वांचा उद्भव व नाश असल्याने ही तत्त्वे साक्षिरूप आत्म्यापर्यंत जाऊ शकत नाहीत.

आत्म्याचे पूर्ण स्वरूप म्हणजे परमात्मस्वरूप होय. साक्षिरूप आत्मरूपाची प्रचीति ही नि:शब्दरूप परमात्म्याचे ठिकाणी चिद्रूपाने उत्पन्न झालेल्या व्याकृत उपाधीतील जडांशी आणि सूक्ष्मांश तत्त्वांच्या मिळणीने उत्पन्न झालेल्या ध्वन्यशब्दातीत शब्दरूपाच्या मन:स्थितीत अनुभवास येणारी गूढ स्थिति होय. ध्वन्यशब्द आणि वर्ण्यशब्द[1] यांचे संयोगाने शरीरात मनाचे कार्य घडते.

आता संकल्पविकल्पात्मक[3] शब्द हे मन:स्थिति असल्याने व त्याचा जो साक्षी किंवा दृश्याचे जे अधिकरण आत्मा, त्याचे पूर्ण स्वरूप जे परमात्मतत्त्व, त्याला जाणून, त्याचा अनुभव घ्यावयाचा असेल तर प्रथमत: शब्दाचा ग्रास करावयास साधनाभ्यासाने शिकले पाहिजे. शब्दाचा ग्रास म्हणजे दृश्याचा ग्रास आणि दृश्याचा ग्रास म्हणजे दृश्यातीत अशब्दात्मक अदृश्य जगतातील जीवनस्थिति, जेथे भगवंताचे श्यामरूपाची पूर्णत्वेकरुन प्रचीति येते. याठिकाणी रक्त आणि श्वेत रंगांचा म्हणजे सूक्ष्म देहांचा ग्रास होतो.

---

१) वर्ण्यशब्द - संकल्पस्फुरणानंतर प्रत्यक्ष मुखाने उच्चार होण्यापूर्वीची अनुच्चारित स्थिति, अस्फुट उच्चार.

२) मन - शरीराच्यामार्फत इंद्रियांच्या द्वारा जीवाचे दृश्याशी होणारे तादात्म्य म्हणजे मन. चैतन्य व जड यांच्या संघर्षाचा परिणाम म्हणजे मन. म्हणून मनात चैतन्य व जड या दोहोंचे अंश आहेत. कशावरुन ? मन हे कधी बहिर्मुख तर कधी अंतर्मुख होऊ शकते.

३) कंपन (Vibration) म्हणजेच संकल्पविकल्प.

ज्या सूक्ष्म तत्त्वातून स्थूलाची उत्पति झाली ते सूक्ष्म तत्त्व चिद्रूप म्हणजे वायुरूप आहे. नि:शब्द अशा घन तत्त्वाच्या ठिकाणी जे चिद्रूपाचे योगाने चंचळत्व अगर चैतन्य निर्माण झाले, ते मूळ जीवाचे दृश्यपूर्व साक्षिभूत स्वरूप होय. आणि जे आकाश पाहिले तर नाहीच आहे किंवा खोटे आहे, जे चिदाकाशाचे ठिकाणी आभासरूपाने प्रचीतीस येते आहे, ते वायुतत्त्वामुळे प्रकृति निर्माण करण्यास कारणीभूत झाले आहे. शास्त्रीय दृष्टीने पाहिले तर पोकळी म्हणून या जगात काही नाहीच आहे; पण ती वायुरूपाने प्रतीतीस येत असून, दृश्य-द्रष्टा आणि दर्शन यासारखी त्रिपुटी वायुतत्त्वामुळेच उत्पन्न झाली आहे, असे म्हणावे लागेल. त्रिपुटी हा आत्म्याचा करमणुकीचा विषय आहे. तर आत्म्याला पहाताना ही त्रिपुटी कशी बरे उरेल ? तेव्हा आत्मरूपप्राप्तीचा अभ्यास करताना शब्द-ग्रास झाला असता, या रीतीने श्याम स्वरूपाचा अनुभव येतो. ही भूमिका शब्दस्थिति आणि त्या पलीकडील प्राप्त होणाऱ्या अशब्द स्थितीच्या पलीकडे असलेली शून्यरूप आहे. या ठिकाणी चिद्रूपाचे दोन प्रकार साधकास पहावयास सापडतात. चिद्रूप म्हणजे चंचळत्व. या कारणाने आत्मा नादरूपाने आणि प्रकाशरूपाने प्रचीतीस येतो. चंचळत्वाने नाद निर्माण होतो आणि घर्षणाने तेज निर्माण होते. यासच चिदाकाश म्हणता येईल. निजस्मरणप्रकाश हा प्रकृतिरूप बनला की तो जीवदशेत येतो व तो आपल्याच ठिकाणी पूर्ण झाला की परमात्मरूप होतो. या चिद्रूपापर्यंत आलेल्या अभ्यासूला दृश्यादृश्याचा सहजरीत्याच वीट येतो. या ठिकाणी ज्या योगाने चिदाचिदाचा प्रत्यय येतो अशी जी चित्कळा तिचा ग्रास होतो. ही चित्कळाच प्रकृतीच्या साहाय्याने जीवाचे जीवन तयार करते. या ठिकाणी नि:शब्दात्मक प्रकाशतत्त्व परमात्मरूप हे दृष्टीस पडते की ज्या योगे जीवाच्या कामक्रोधादि षड्वृत्ति याच पार नाहीशा होतात. जीवदशा ही पहाता पहाता तद्रूप होऊन जाते. पूर्णात अपूर्ण असे काही रहातच नाही. निजस्मरण पूर्ण स्वरूप नि:शब्द जे ब्रह्म तेच स्वत: अभ्यासू होऊन जाते की ज्या ठिकाणी भक्ताला सहज मौन प्राप्त होते. परमेश्वर आणि भक्त एकरूपाने एकपणाने भेटतात की जे भक्ताला नि:शब्दतेने मौनच प्राप्त होते. लौकिक दृष्टीने जरी पाहिले तरी कोणत्याही गोष्टीचा प्राप्त होणारा अनुभव हा नि:शब्द आहे; तो शब्दाने बोलता येत नाही;





बोलता आला तरी प्रात्यक्षिक प्रमाणाइतके तो समाधान देत नाही. प्रात्यक्षिक प्रमाण जरी पाहिले तरी त्याचा आनंद काही काल नि:शब्द स्थिति प्राप्त झाल्यावर होतो. मग हा परमात्मा तर नि:शब्दस्वरूपच आहे; मग त्याचा अनुभव नि:शब्दरूप असल्यास व ब्रह्मरूप होणाऱ्या भक्तास तो शांत आणि मौनरूप करीत असल्यास नवल ते काय ?

पण असे जरी आहे, तरी संतांनी चिद्रूपाचे ठिकाणी उत्पन्न होणाऱ्या प्रकाशाचे साहाय्याने त्या नि:शब्द ब्रह्माला निजस्मरणात्मक वाणीचे अतुल सामर्थ्याने शब्दाला नि:शब्दात्मक करून टाकून, ज्यामध्ये नि:शब्द ब्रह्म प्रगट होईल अशी निवृत्तपर शब्दरचना करून, त्या वाक्-ब्रह्माचे ठिकाणी नि:शब्द ब्रह्माला सहज कौतुकाने प्रकट करून ठेवले आहे; आणि हीच संतांची अनुपम हातोटी आहे.

कोणी म्हणेल की शब्द ब्रह्म हे केवळ थोतांड आहे. पण या शब्दाचे योगानेच ते नि:शब्द ब्रह्म दाखविले जाते. किंबहुना हे शब्द ब्रह्म म्हणजे संतांचे हे अनुभवाचे म्हणजे मुक्याचे बोलणे आहे. हे बोलणे मूक होऊन म्हणजे जेथे गेले असता निजस्मरणच तेवढे रहाते त्याचे ठिकाणी जे चिदाकाश आहे, त्याठिकाणी उत्पन्न होणारे जे शब्द की जे केवळ नि:शब्द ब्रह्मालाच तेवढे दाखवू शकतात व जेथे पुढे चिदाभासात्मक शब्दजाल म्हणजे गगन निर्माण झाले आहे, असे जे निजस्मरणाचे अनुभवाचे बोलणे ते शब्द ब्रह्म होय. हे शब्द ब्रह्म साधकाला दृश्यादृश्यापासून परावृत्त करते आणि सर्व शब्दांचा ग्रास करून, अक्षरतत्त्वात नि:शब्द ब्रह्म साक्षात् आपल्याच ठिकाणी प्रगट करते. हे शब्द ब्रह्म त्या नि:शब्दतत्त्वाचा आरसाच आहे असे म्हटले असता काही वाऊगे होणार नाही. शब्दाचे योगाने नि:शब्द दाखविले जाते व शब्दाचे पूर्णत्व म्हणजेच नि:शब्द. नि:शब्द हे चिद्रूपाचे पूर्ण रूप म्हणजे निश्चळ आणि घन आहे. यापेक्षा दुसरे सर्वव्यापी घन तत्त्व दाखविताच येणार नाही. नि:शब्द हे इतके घन आहे की याचे भाग कल्पनेनेही पाडता येणार नाहीत. ज्ञानदृष्टि, शास्त्रदृष्टि, यांत्रिक दृष्टि ही तर या ठिकाणी लंगडीच पडते. या नि:शब्दातून प्राप्त होणारा निजस्मरणाचा पूर्णानंद हाच ब्रह्मानंद आहे, याचा प्रत्यय साधनाभ्यासूला या रीतीने येतो आहे.

या नि:शब्द ब्रह्माला पहाता पहाता तद्रूपातच प्राप्त होते की त्या ठिकाणी पहाणेच रहात नाही, तर त्याचा ग्रास होऊन जातो. पहाणे हे कशामुळे उत्पन्न झाले आहे तर दृश्य वस्तूमुळे. जीवनतत्त्व, मन, डोळा आणि दृश्य या योगाने पहाणे झाले आहे. डोळा आणि दृश्य नसले तरी द्रष्ट्याचे ठिकाणी, साक्षिभूतरूपाचे ठिकाणी, पहाणे आहेच. पण या दोन्ही दृष्टींनी विचार करता पहाणे हे ग्रास पावते, हे कसे सत्य आहे याचाच आपणास पुढे आता क्रमश: विचार करणेचा आहे.

पहाणे हे दृश्यामुळे झाले व दृश्य हे नि:शब्द ब्रह्माचे ठिकाणी जे चंचळत्व निर्माण झाले त्यामुळे निर्माण झाले आहे. जलसंचयाच्या पातळीत डोळा ठेवून, एखादा मनुष्य बसला असता त्याला काही दिसणार नाही. पण वायूचे गुणधर्माने त्यावर एखादी लाट निर्माण झाल्यास, ती दृश्यरूपाने दिसू लागेल. तद्वत् चिद्गुणाचे योगाने जे दृश्य निर्माण झाले, त्यामुळे पहाणे निर्माण झाले. हे पहाणे ब्रह्माला पहाता पहाता नाहीसे होऊन, हे पहाणेच परब्रह्मरूप होऊन, दर्शनरूप होते. ते कसे ते पुढे पाहू. आता, एखादा मनुष्य आंधळा असला अगर त्याने आपला डोळा झाकला, तर त्याला दृश्य असून नसल्याप्रमाणेच होते. पण हे दृश्य अगर डोळा जरी नाहीसा झाला तरी पहाणे हे उरतेच. मला काही दिसत नाही, ही जाणीव ज्यामुळे उत्पन्न झाली असे काही दृश्य त्याला दिसतच असते. मग ते दृश्य अज्ञानजन्य किंवा दृश्याभाव-जन्य जरी असले तरी ते अज्ञान अगर तो दृश्याभावपणा अगर ते जरी एखादे अदृश्य तत्त्व असेल तर ते का होईना, पण डोळ्याचे भावाने जे काही पहाता येते, त्यावेळी चर्मचक्षूचा जरी अभाव असला तरी प्रज्ञाचक्षूचा लोप झालेला नसतो, व म्हणून ' मला यातील भ्रामक गोष्ट समजली. मला डोळे मिटूनही काही अदृश्य दृश्य दिसले. मला काही दिसत नाही', असे बोलले जाते. झोपेत प्रज्ञाचक्षु जागृत असल्याने स्वप्ने दिसतात. किंबहुना असेही म्हणता येईल की चिद्गुणाच्या योगाने उत्पन्न झालेले जे दृश्य, त्या दृश्याला दृश्यत्व देण्याचे सामर्थ्य उपाधियुक्त साक्षिभूत प्रज्ञाचक्षूचे ठिकाणी आहे; हा नसेल तर डोळा उघडा असूनही काही दिसणार नाही. तेव्हा आपणास एवढे कळले की पाहणे हे दृश्यामुळे उत्पन्न झाले. दृश्य चिद्गुणामुळे उत्पन्न झाले व





त्याचे ज्ञान उपाधिभूत आत्मतत्त्वाच्या ठिकाणी साक्षिभूत प्रज्ञाचक्षूने निर्माण केले. आता, जो द्रष्टा आपणाशीच म्हणजे आत्मतत्त्वाशी समरस होईल, तेथे पहाणे हे पहाणेपणाला मुकेल, यात संशयच नाही. आत्मा निश्चल आहे. तैथे आपण साधनाभ्यासाने चिद्-तत्त्वाच्या पलीकडे जाऊन स्थिर व्हावयाचे, म्हणजे त्यानेच आत्मसुख प्राप्त होईल. आम्ही त्या आत्मतत्त्वाशी समरस इतके होऊ की निराळे पहावयाचे म्हणून काही रहाणार नाही. चिद्-तत्त्वाचा ग्रास झाला की प्रज्ञा-चक्षु हा अखिल विश्वाला व्यापतो. अखिल विश्व हेच आत्मतत्त्व आहे याचा प्रत्यय येतो. चिद्गुणामुळे उत्पन्न झालेले दृश्य आपल्याच ठिकाणी मायोपाधि-रहित निश्चळ तत्त्वात समरस झालेल्या जीवाचे ठिकाणी दृष्टीपुढे रहात नाही, व सर्व गुण आणि तत्त्वे ही मुळात तत्त्वत: ब्रह्मरूपच आहेत, व त्यांचे दृश्यरूप हे चंचळत्वाने पार बदलून टाकले आहे.

आता, ज्या ठिकाणी चंचळ दृश्य हे दृष्टीपुढून निघाले आहे, ज्याचा प्रज्ञाचक्षु विश्वरूप झाला, ज्याचे पहाणे निश्चळ तत्त्वाच्या ठिकाणी निश्चळ म्हणजे ब्रह्मरूप झाले आहे, त्या ठिकाणी निजदृष्टीत निजरूप भरून गेले असल्यास नवल ते काय ? व या ठिकाणी दृश्यादृश्यापलीकडील दृश्यादृश्यास कारणीभूत असलेले शून्य, उपाधिभूत आत्मतत्त्वाचे ठिकाणी असणारे साक्षिभूत दृष्टिशून्य की ज्याने द्वैतीचे पहाणे निर्माण केले आहे, त्या दोन्ही शून्यांचा ग्रास केल्यावर, उरलेले जे अखंड पहाणे आहे की ज्यात अपूर्णत्व काही नाही व जे अभेद आहे, तेच आत्म्याचे दर्शन होय, असे म्हणण्यास तरी कोणती हरकत आहे ? यादृष्टीने निजस्मरणाचे पूर्ण स्वरूप जे नि:शब्द ब्रह्म तेच दृश्यादृश्याचे सार आहे असे दिसून येईल, व त्या ठिकाणी दिसणारे जे हे अपार दृश्य ते चिद्रूप आहे असे समजून येईल.

आता, याठिकाणी असा एक प्रश्न निर्माण होईल की ब्रह्म हे नि:शब्द का आहे ? तर परमात्मरूप हे सर्वव्यापी आणि घन आहे. आकाश हे सुद्धा सर्वव्यापी आहे; पण ते चिद्गुणामुळे उत्पन्न झालेले पोकळ आहे म्हणून नादरहित शब्द का होईना तो त्या ठिकाणी आहे. पण तशी वस्तुस्थिति ब्रह्माचे ठिकाणी नाही. ते सर्वव्यापी तर आहेच शिवाय ते घन आहे. म्हणून त्याठिकाणी नाद-रहित शब्दही नाही. ब्रह्म हे अभेद आहे;

पण त्या ठिकाणी जो भेद निर्माण झालेला दिसतो तो चंचलत्वामुळे. या ठिकाणी जे चिदाकाश आहे, त्या ठिकाणी अखिल विश्वाची प्रेरक शक्ति आहे. जीवांचा विकास अथवा ऱ्हास, क्रिया आणि प्रतिक्रिया यावर अवलंबून आहे. या दोन गोष्टी ज्या प्रेरणेवर अवलंबून आहेत ती प्रेरणा या चिदाकाशात स्फुरण पावते; यामुळे भेद निर्माण झाला आहे. हा भेद अभेद पाहण्यासाठी केला आहे. हा भेद नसता तर आत्मज्ञान प्राप्त करुन घेण्याला कोणी आत्म्यापासून वेगळा राहिलाच नसता. ज्या वस्तूचे ज्ञान आपण संपादितो, त्यापासून आपण वेगळे असतो. आपण तेच झालो तर ज्ञान कोणी व कोणाचे संपादन करावे अशी स्थिति होते व ते विज्ञानच होते. तेव्हा भेद म्हणजे अभेद पहाण्याचे साधन आहे. म्हणून भेदाला कमी महत्त्व देण्याचे कारण नाही. अनेक बिंदूंचे एक वर्तुळ झाले. ते वर्तुळ बिंदूंनीच दाखविले. वर्तुळ हे बिंदूंपेक्षा मोठे आहे, तरी बिंदूची योग्यता कमी ठरली काय ? नाही. त्याप्रमाणे भेदाचे महत्व कमी नाही. या बिंदूला पूर्णत्व दिले तर त्याचे वर्तुळ होईल. त्याप्रमाणे हा भेदच, यास पूर्णत्व दिले की अभेद होईल. अभेद हे निश्चळत्वात किंवा स्थिरत्वात सापडते. नि:शब्द हे निश्चळ आणि स्थिर आहे. त्यात निजत्व मिसळल्याने प्राप्त होणारा आनंद हा ज्ञानाच्याही अतीत की ज्या ठिकाणी त्रिपुटी रहात नाही आणि ज्या ठिकाणी द्वंद्व उरत नाही, असा विज्ञानाचा आनंद आहे. लौकिकातसुध्दा कोणचेही काम केल्यानंतर, जो आनंद प्राप्त होतो, तो मनुष्य काही काळ श्रमल्यामुळेच स्थिर झाला म्हणजेच होतो. त्याचप्रमाणे भेदाचे ठिकाणी अभेद पाहून, साधक साधनाभ्यासाने तेथे स्थिर होऊ लागला की मग तेथे सद्-तत्त्वाचा आनंद चिरकाल प्राप्त होऊ लागतो. आता, या सद्-तत्त्वाचे ठिकाणी जो भेद निर्माण झाला आहे, तो दृश्यामुळेच होय. आता, या दृश्याचीही मोठी अशी गंमत आहे की यात सर्वत्र गोलंकार पसरला आहे. या कारणाने अपूर्णाला पूर्णत्व, भेदाला अभेदत्व, आणि शब्दाला नि:शब्दत्व सहजरीत्याच प्राप्त होते. जमिनीवरील पाण्याची सूर्याच्या उष्णतेने वाफ होऊन ढगात रूपांतर व्हावयाचे व ते पाणी पावसाचे रूपाने पुन: भूतलावर यावयाचे, असे सातत्यधर्माने व्हावयाचेच. जीवाचे शून्यरूप स्थितीतून त्याचा विकास होत होत सहज ब्रह्मरूपता प्राप्त होते, आणि





पुन: तोच जीव प्रवृत्तिपर भेदवृत्तीने शून्यरूप जीवस्थितीत येतो. हा सातत्यधर्म सद्रूपाचे ठिकाणी चंचळ आणि वर्तुळाकृति जे चिद्गुणाचे स्वरूप आहे त्यामुळे निर्माण झाला आहे; त्या कारणानेच त्यामुळे निर्माण झालेले सर्व दृश्य गोलाकार आहे. आकाशामध्ये लाह्या फेकल्याप्रमाणे जी ब्रह्मांडे फेकली गेली आहेत, ती गोल आहेत. हवेमध्ये उत्पन्न होणाऱ्या लहरी गोल आहेत. जलाशयावर उत्पन्न होणाऱ्या लहरी या गोलच दिसतात. जलाचे जलबिंदू आणि हवेत तरंगणारे सूक्ष्म अणु-परमाणु, कोणच्याही धातूचे कण गोल आहेत. मनाच्या मनोवृत्ति सातत्यधर्माने संकल्पविकल्पात्मक अतएव गोलच आहेत. जीव ही परमात्म्याची अंशभूत स्वरूपे असल्याने व परमात्मा हा पूर्ण असल्याने, जीव हे गोलच आहेत. ते उपाधियुक्त दिसले तरी उपाधि ही चिद्गुणानेच दृश्यत्वास पावली आहे; ती परमात्म्याचे भेद दाखविते पण प्रत्यक्ष भेद झालेला नसतो. ती जीवदशेचा भास उत्पन्न करते, उपाधिरूप बनविते; पण प्रात्यक्षिक प्रमाणाने पहाता, जीव हा अभेदरूप आत्मतत्त्वच असतो. याकरता जीवाची भेदवृत्ति मावळली की आपण आपल्या ठिकाणी पूर्णत्वाने विकसित आहो, असे त्याच्या प्रत्ययास येऊन, बद्धता आणि मुक्तता या दोन्ही स्थितीपलीकडे होऊन तो स्वयंसिद्ध होतो.

आता, ज्या चिद्गुणामुळे दृश्य गोल उत्पन्न झाले, त्याची क्रमपरंपरा काय आहे, हे मोठे पहाण्याजोगेच आहे :- चिदाकाशाचे ठिकाणी नादरहित शब्दतत्त्व प्रगट झाले असून, ते चंचळ आहे. त्या कारणाने वायु निर्माण झाला. शब्दाला वाहविणारा वायूच आहे. वायूचे घर्षणाने तेज झाले असून, ते तेज वाहविणारा आणि प्रकाशाचे अस्तित्व दाखविणारा वायुच आहे; वायुलहरींमुळे प्रकाश दृश्यमान होतो. वायूमुळे शीत आणि उष्ण तेजे होतात. उष्णतेने शीततत्त्वाची वाफ होऊन, पाण्यात रुपांतर झाले आणि बाकी राहिलेले जे अणुपरमाणु ते एकत्रित होऊन, पृथ्वीत रुपांतर झाले. आणि हे सर्व चंचळ आणि वर्तुळाकृति निर्माण झाले असल्याने, दिसणारे सर्व दृश्य हे गोलाकारच झाले आहे. आणि सर्व दृश्य आणि अदृश्य डोळा आणि वस्तु लोपल्यानंतर राहिलेले जे अखंड पहाणे त्या ठिकाणी चिद्गुणाने नामारूपाला आले आहे, असे दिसून येईल. आणि म्हणूनच पहाण्याचे

ज्ञान अगर प्रत्यक्ष पाहिलेल्या गोष्टीचा अनुभव शास्त्रीय सिद्धांतानेही सर्वात अधिक श्रेष्ठ ठरला आहे. आत्मतत्त्वाचे ठिकाणी पहाणे हेच पहाणेपणाला म्हणजे दृश्यत्वाला आले आहे असे दिसून येईल. आता, या ठिकाणी सर्वत्र आपले रूप आपल्या ठिकाणीच जो कोणी पहातो, तो दृश्यादृश्यातीत होतो. आता, जे पहाणे म्हणजे लक्ष्य पहाणेपणाला आले आहे की जेथे दृश्य, डोळा, उपाधिभूत जीवतत्त्व आणि मन हे काही नाही, ते लक्ष्य अलक्ष्याचे ठिकाणीच व्याप्त आहे, असे दिसून येईल म्हणून निरुपाधिक अलक्ष्य तत्त्वाचे ठिकाणी जो कोणी लक्ष लावतो, तो आपल्या ठिकाणी पूर्णत्वाने नि:शब्दरूप आत्मतत्त्वाचे दर्शन घेण्यास अधिकारी होतो.

आत्मरूपाचे ठिकाणी जे चिदाकाश महाशून्य-तत्त्वात पसरले आहे, ते नाम आणि रूप यांचेमध्ये व्याप्त आहे. दृश्यात्मक नामरूपास चिदाकाशाने जिवंतपणा आणला आहे. चैतन्यच नसेल तर नाम आणि रूप असून तरी काय उपयोग ? काहीच उपयोग नाही. आता, आकाश जसे कोणाच्या हातात सापडत नाही व दोन्ही हातांनी सारून बाजूस करावे म्हटले असता वेगळे होत नाही, तद्वत्च चिदाकाशाची स्थिति आहे. चिदाकाशतत्त्व शरीरातून वेगळे काढून जरी दाखविता आले नाही, तरी ते बुद्धिगम्य आहे. यानेच नामरूपाची मिळणी साधली आहे. शास्त्रीय सिध्दांताप्रमाणे नाम आणि रूप आहे ते एकच आहे, त्यात भिन्नत्व नाही. आता, ज्या देहाला काही नाम आम्ही आमच्या बुद्धीने दिले आहे असे नाम, व ज्या देहाकृतीस आम्ही रूप समजतो असे रूप हे एक नाही, हे आतील चैतन्य निघून गेल्यावर शरीर पतन पावते आणि नामाचे नामपण आणि रूपाचे रूपपण उरत नाही, यावरुन हे सिद्धच होते आहे. या दृष्टीने, हे नामरूपाचे दृश्यस्वरूप खरे नसून,त्याचे सत्यस्वरूप वेगळेच आहे, हे उघड उघड आहे. सत्यभूत नामरूप निरुपाधिक असून, त्या दोन्हीत ऐक्यता आहे व त्याची मिळणी चिदाकाशाने साधली आहे. म्हणूनच चिदकाश हे सत्यभूत नामरूपाचे ठिकाणी व्याप्त आहे. या नामरूपैक्यतेचा संतांनी सिद्धसंप्रदायपरंपरेप्रमाणे परिपूर्ण साधनाभ्यास करून प्रात्यक्षिक प्रमाणाने अनुभव घेतला. हेच त्या आत्म्याचे विज्ञान होय. हे विज्ञान संतांची कृपा संपादन करून, त्यांच्या शिकवणुकीप्रमाणे योग्य त्या मार्गाने





अभ्यास केल्यास प्राप्त होणारे आहे. हे विज्ञान म्हणजे एखाद्या गोष्टीचे ज्ञान प्राप्त करून घेतल्यावर प्राप्त होणारी अनुभवजन्य स्थिति म्हणजे विज्ञान होय. तशीच स्थिति आत्मविज्ञानाची आहे. ज्ञान आणि विज्ञान यांची व्याख्या श्रीतुकाराममहाराज यांनी फारच बहारीची केली आहे. ती व्याख्या म्हणजे 'ज्ञान म्हणजे काय आपणा जाणणे । जाणोनी नेणणे विज्ञान ते,' अशी आहे. आपणच आपणाला म्हणजे आत्मतत्त्वाला जाणणे हे ज्ञान असून, तत्त्वरूप होऊन जाणीवेला विसरणे हे विज्ञानरूप होय. आता, ज्या विज्ञानात हे ज्ञान राहू शकत नाही, त्या ठिकाणी अज्ञान कसे बरे राहील ? रहाणे शक्यच नाही. अज्ञान हे बुद्धिशून्य आहे. ज्याला बुद्धिच नाही त्याला आपण अज्ञानी म्हणतो. ज्ञान हे जाणीवरूप आहे. जो जाणता आहे त्यालाच आपण ज्ञानी म्हणतो. विज्ञान हे नेणीवरूप आहे कारण ते ज्ञान प्रात्यक्षिक आहे. आत्म्याचे विज्ञान म्हणजे आत्माच होणे. याचा अर्थ आपण कोणीतरी दुसरेच आहो आणि महत्प्रयासाने आपण आत्मरूप व्हावयाचे आहे असा नाही. आपण तो परिपूर्ण आत्माच आहो; पण विस्मृतीने आणि उपाधीने युक्त झाल्याने, आपण देही झालो आहो. ते स्मृतीने तेच झालो की त्याठिकाणी स्मृति पूर्णत्वाला येते व मग ज्ञानाचे कामच उरत नाही. एक राजा होता. तो भ्रमिस्त झाल्याने, मी दरिद्री आहे म्हणून तो दु:खीकष्टी होऊ लागला. तेव्हा त्याच्या सल्लागारांनी तो राजाच आहे हे त्याच्या मनात संस्कार उत्पन्न करण्याचे काम झपाट्याने चालविले. पुढे उत्पन्न झालेली विस्मृति नाहीशी करण्याकरिता मी राजा आहे अशी जाणीव त्याला आपल्या अंत:करणात उत्पन्न करावी लागली. पुढे ती भ्रांति सरल्यावर, तो सहज मनात म्हणाला ' अरे, मी राजाच आहे आणि मी जर राजाच आहे तर हे स्मरण मला सतत कशास ठेवावयास हवे ?' म्हणजे ही स्मरणाची पूर्णावस्था होय. या ठिकाणी स्मरणाशी तद्रूपता झाल्याने, जाणीवेचे तेथे कारण रहात नाही. जाणीव हे विज्ञानाचे अपूर्ण रूप असून, विज्ञान अनिर्वाच्य आहे. सर्व कार्यकारणपरंपरेचे अधिष्ठान स्मरण आहे. स्मरण हे चिद्रूप आहे. मी मनुष्य आहे याचे आपणास सारखे स्मरण करावे लागते काय ? ही जाणीव सतत उत्पन्न करून घ्यावी लागते काय ? नाही; तर ती अखंड असते; उत्पन्न करून घ्यावी लागत नाही. हेच त्या मनुष्यत्वाचे

विज्ञान होय. जाणीवेचे येथे पूर्णत्व, अखंडत्व साधले; हेच नेणीवेचे स्वरूप होय. तेव्हा, यारीतीने आपण जेव्हा अज्ञान आणि ज्ञान या दोहोंचे पलीकडे जाऊ, तेव्हा आपण विज्ञानभूमिकेत येतो. लौकिक दृष्टीने, आपण एखादी गोष्ट प्रत्यक्ष पाहिली म्हणजे त्या गोष्टीचे विज्ञान झाले म्हणजे ते डोळ्याने पाहून तोंडाने बोलून सांगता येते. पण हे पारमार्थिक विज्ञान हे फारच निराळे आहे. येथे आपण अखंड स्मृतिरूप होऊन तेच व्हावयाचे आहे. येथे अनुभव शब्दरूप रहात नाही. कारण अज्ञान आणि ज्ञान हे दोन्ही शब्दरूप असून ते दोन्ही अव्यक्त म्हणजे नाहीसेच होऊन जातात, व त्या दोहोंचा ग्रास झाला की विज्ञान हे व्यक्त होते. शब्दाचे पूर्ण रूप म्हणजे नि:शब्द असल्याने, नि:शब्दात्मक अनुभवाची गोडी साधक चाखू लागतो. अनुभव शब्दाने बोलून दाखविता येत नाही. एकाने प्रत्यक्ष साखर तोंडात टाकली; त्याला ती गोड लागली अर्थात् साखरेचा अनुभव त्यास आलाच. दुसऱ्या इसमाने म्हणजे ज्याने साखर खाल्लेली नाही अशा इसमाने त्या अनुभव्यास विचारले ''साखर गोड कशी आहे ?'' तो म्हणाला 'गुळागत आहे.' तरी त्या जिज्ञासूचे काही समाधान झाले नाही. तो म्हणाला ''हे गुरो, माझे समाधान झाले नाही.'' मग तो अनुभवी म्हणाला ''अरे, त्यात काय आहे ? साखर मधागत आहे.'' तेव्हा तो म्हणाला 'मला समाधान झाले नाही.' तिसऱ्यांदा गुरुजींनी साखरेची चिमटच त्या अननुभव्याचे मुखात घातली. त्याबरोबर त्याने मिटक्या मारत ती खाऊन टाकली. गुरूंनी विचारले ''साखर गोड कशी आहे ? '' शिष्य गप्पच बसला. तरी गुरूचे वर्म त्या शिष्याला व शिष्याचे वर्म त्या उपदेशकाला बरोबर कळले. संतांचे बोलणे म्हणजे मिटक्या मारल्याप्रमाणे मुक्याचे बोलणे आहे. आणि मूक -स्थिति हा प्रात्यक्षिक अनुभव आहे. आत्म्याचे विज्ञान जाणीवेचा ग्रास करते. या ठिकाणी आत्म्याची जाणीव उत्पन्न करावी लागत नाही, तर ती सहज अखंड प्रगट होते. जाणीवेचे अखंडत्व म्हणजे अभेदरूप सहज स्मरणस्थिति; म्हणून त्या स्थितीला जाणीव म्हणता येत नाही.

आता, या विज्ञानात प्राप्त होणारा आनंद त्या नि:शब्द तत्त्वाशी स्थिर होऊन साधक राहिला की प्राप्त होतो. खाल्लेल्या अन्नाचे समाधान, ते अन्न पचून त्याचे रक्तात रूपांतर झाले की होते. काही वाचन केलेल्याचे





समाधान स्थिर होऊन वाचनाने मेंदूमध्ये उत्पन्न झालेल्या योग्य त्या जागतिक संस्कारांना कृतिरूप केले म्हणजे होते. पुष्कळ श्रम केले की थकवा येतो. पण तोच थकला भागलेला जीव काही काल निवांत, स्थिर जर होईल, तर तो विश्रांतिसुखाचा आनंद सेवन करील, यात संशयच नाही. यावरून कोणत्याही गोष्टीचा जरी आपण अनुभव घेतलेला असला तरी त्यात काही काल निवांतपणे स्थिर झाल्याशिवाय आनंद प्राप्त होऊ शकत नाही. मनुष्य झोपून उठला की प्रथम काही काल तो निर्विचार वृत्तीत असतो व त्या स्थितीत तो आनंद सेवन करतो. झोपेचा अनुभव तो झोपलेल्या स्थितीत घेतच असतो; तो अनुभव नि:शब्द असतो. पण जागृतावस्थेतही प्राप्त होणारी निर्विचार स्थिती जी प्रथमत: काही काल असते, ती स्थिरत्वाची भूमिका आहे. झोपेतील आनंद मनाला हा साम्याचा काल असून, तो आनंद पुढे शब्दावाटे क्वचित् बाहेर पडतो. मग सहजरीत्याच त्याचे तोंडून उद्‌गार निघतात की 'काल रात्री मला गाढ झोप लागली होती.' अर्थात् हे त्या अनुभवाचे शाब्दिक स्वरूप आहे. असो.

आता, साधक हा जो नि:शब्दात स्थिर होतो, तो त्या नि:शब्दाशी समरस झाल्यावाचून होऊ शकत नाही. या कारणाने हा जो स्वयंसिद्ध आत्म्याचा आनंद आहे, तो नि:शब्द-तत्त्वाशी अभेदरूप झाल्याशिवाय सेवन करता येत नाही. याकरिता आपण नि:शब्दरूप होण्याचा अभ्यास केला पाहीजे. याची जर अनुभवस्थिति जाणून घ्यावयाची असेल, तर शब्दाचा ग्रास केला पाहिजे. तो होण्यासाठी स्मरणाने स्मरणरूप होण्याचे प्रयत्न केले पाहिजेत. शून्याचे ठिकाणी मनाचे नादरूपाचे ठायी केंद्रीकरण केल्यास, आपणास स्मरणरूप होण्यास सुलभ होईल. या रीतीने अखंड सहज स्मरणात आपण आलो असता, स्वयंसिध्द स्वानंद प्राप्त होईल असे म्हटले आहे, ते कसे हेच आता आपण पाहू. हा आनंद स्वयंसिध्द आहे. याचे कारण हा आनंद ज्या नि:शब्दतत्त्वापासून घ्यावयाचा, ते स्वरूप घनानंद आहे. अर्थात् ज्याप्रमाणे फुलाचा धर्म सुवास, चंद्राचा धर्म शीतळपणा, आणि पाण्याचा धर्म पातळपणा असून, सूर्याचा धर्म प्रकाश आहे, त्याप्रमाणे आत्म्याचा धर्म आनंद हा आहे. नि:शब्दाचा अनुभव हा नि:शब्द. अर्थात् ते तत्त्व घन असल्याने, त्याचा आनंदही घन आहे. हा

आनंद अभेद्य असून, चिदाकाशापलीकडे प्राप्त होणारा आहे. ब्रह्माचे ठिकाणी भेद-अभेद या दोन्ही स्थिति नाहीत. पण या दोन्ही स्थिति ज्याने दाखविल्या जातात, ते चिदाकाश चिद् म्हणजे चंचळत्त्व या योगाने जे असंख्य गुण आणि तत्त्वे निर्माण झाली, त्यायोगाने हे भेद दृष्टोत्पत्तीस येऊ लागले. पण या सर्व गुणांचे आणि तत्त्वांचे पर्यवसान अनुभवजन्य दृष्टीने पाहिल्यास ते मूळ ब्रह्मातच होणारे असल्याने, हे सर्व अभेद आहे, असे म्हणावे लागते. 'चंचळ आकृति वर्तुळ हे फिरे । पुन: होय स्थिरे निश्चळातू' या उक्तीप्रमाणे पाहिल्यास; दृश्यादृश्य हे चिद्गुणधर्माने आणि सातत्यधर्माने दिसणारे असले तरी ते पुन: निश्चळ ब्रह्मात स्थिर होणारे असल्याने ते अभेद आहे, असे म्हटल्यास काय वावगे आहे ? आता, जे सतत अभेद आहे, जेथे भेदच नाही, तेथे भेद आणि अभेद या द्वैतमूल स्थिति बोलावयास रहाताहेत कोठे ? रहातच नाहीत. भगवान् सूर्यनारायणांना एकाने प्रश्न केला की 'भगवन्, आपण रात्री काय करता ?'सूर्यनारायण म्हणाले 'आधी रात्र म्हणजे काय ते मला सांग.' तेव्हा तो म्हणाला 'महाराज, रात्र म्हणजे अंधार.' सूर्यदेव म्हणाले 'हे भूदेव, आमचे कोशात अंधार हा शब्दच नाही. याचा अर्थ काय ते आपण मला सांगा.' त्याने विचार केला 'हा जेथे जाईल तेथे जर प्रकाश म्हणजे दिवस होणार, तर याला रात्र हा शब्द माहीत होणार कसा ? व ज्याला रात्र माहीत नाही की ज्या रात्रीमुळे दिवस हा शब्द योजला गेला, तो दिवस हा शब्दतरी यांना कसा माहीत असणार ? मग ज्या ठिकाणी दिवस आणि रात्र या दोन्ही स्थितीचे गम्य नाही, तेथे दिवसही नाही, तेथे रात्र म्हणजे अंधार आहे असे सांगून तरी काय उपयोग व्हावयाचा आहे ?' तो म्हणाला ''हे देवाधिदेवा, आपल्या ठिकाणी अंधार ही स्थितीच नाही तर विचारून काय फायदा ? माझा प्रश्न चुकीचा आहे,'' असे बोलून तो गृहस्थ स्तब्धच राहिला. असो. तेव्हा याप्रमाणेच जेथे भेद नाही व जेथे अखंड अभेद आहे, तेथे भेदाने दाखविल्या जाणाऱ्या अभेद शब्दाचे प्रयोजनच उरत नाही. मग तेथे भेदाभेदस्थिति, असे म्हणण्यास काय हरकत आहे ? काहीच नाही. तेव्हा ज्या ठिकाणी भेदाभेद नाही पण तो गुणतत्त्वात्मक भेदाभेद ज्याने दाखविला जातो, त्याला चिदाकाश म्हणतात; यानेच दृश्यादृश्य दाखविले जाते. या





दृश्यादृश्याला चिदाभास अशी शास्त्रीय संज्ञा आहे. हा चिदाभास चिदाकाशाचे ठिकाणी समरस झाला की हा साधक सत्-रूपास जाऊन मिळतो, व तेथे घनानंद प्राप्त होतो.

घनानंद हा पूर्णब्रह्माचा आनंद असल्याने, त्याठिकाणी निश्चळता असते. कारण नि:शब्द हे निश्चळच आहे. या कारणामुळे एरवी आनंदातून प्राप्त होणारे चंचळत्व या ठिकाणी उरत नसल्याने, जीवाला साहजिकच चिरकाल अशा शाश्वत आनंदाची प्राप्ति होते. किंबहुना 'आनंदो ब्रह्म' या उपनिषदातील वचनाप्रमाणे तो आनंदरूपच होतो. आणि हाच आत्मविज्ञानाचा निष्कर्ष आहे.

॥ आत्मविज्ञान समाप्त ॥

* * *

## श्रीनिंबरगीकरमहाराजांची आरती

आरती नारायणा । धन्य जगज्जीवना ।
सगुण ब्रह्म मूर्ती । काय तपोनिधाना ॥धृ॥

सद्गुरु काडसिद्ध । तुकाराम अवतार ।
साधन सांप्रदाय । वाढविला बडिवार ॥१॥

गुरुलिंगजंगम नावे । जगप्रसिद्ध जहाला ।
दासराम शरण येता । अंतरिये बोध केला ॥२॥

* * *

## श्रीदासराममहाराजांची आरती

आरती रामराया । करी कृपेची छाया ।
दावोनी दीनी दया । धन्य धन्य महाराया ॥धृ॥
सद्गुरु हनुमंत । पिता गोविंद संत ।
बोधी गुरुलिंग सिद्ध । धरुनि रूप सिद्धानंद ॥१॥
सिद्धसाधनाने । स्वये ब्रह्मचि झाले ।
भावादरे केशवाने । चरणी मस्तक ठेविले ॥२॥

* * *